
सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | सोमवार, १ डिसेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २७१ । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



# सीमेवरून दररोज २०० घुसखोरांची हकालपट्टी

## मतदारयादी पुनरावलोकन प्रक्रियेचा परिणाम

◆ **हकिमपूर, ३० नोव्हेंबर**

पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी विधानसभा निवडणूक होणार आहे. त्या अनुषंगाने राज्यात मतदारयादी पुनरावलोकन प्रक्रिया सुरू आहे. याचा परिणाम म्हणजे दस्तावेज नसल्याने कारवाईच्या भीतीने घुसखोर बांगलादेशला परतत आहेत. दररोज २०० च्या आसपास घुसखोर मायदेशी पलायन करीत आहेत.

पश्चिम बंगालमधील हकिमपूर चेक पोस्टवर दररोज शेकडो बांगलादेशी घुसखोर मायदेशी परतण्यासाठी येत आहेत. आतापर्यंत या घटनेकडे कुणाचे फारसे लक्ष नव्हते पण निवडणूक जवळ येत असताना भारतीय जनता पक्ष आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात राजकीय युद्धाला प्रारंभ झाला आहे.

उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील बोंगाव येथील सीमेवर कायदेशीर दस्तवेज नसलेल्या बांगलादेशी नागरिक सीमा पार करण्यासाठी येत असल्याची माहिती स्थानिक नागरिक आणि सीमा सुरक्षा दलाने सांगितले आहे. २० नोव्हेंबरपर्यंत बोंगाव सीमेवरून १७०० घुसखोर बांगलादेशात परतले आहेत. कधी १५० तर कधी २०० नागरिक दररोज सीमा पार करीत असल्याची माहिती सीमा सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान, यासंदर्भात वेगवेगळी मते व्यक्त केली जात आहेत.

बांगलादेशात घुसखोरी होत असल्याचे सत्य असले तरी ५० लाखांचा जो आकडा सांगितला जात आहे त्यात तथ्य वाटत नाही. चार-पाच हजार घुसखोर परत गेले म्हणजे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला फायदा होईल, असे वाटत नसल्याचे मत राजकीय विश्लेषक विश्वनाथ चक्रवर्ती यांनी व्यक्त केले.

(वृत्तसंस्था)



हकिमपूर चेकपोस्टवरून आठवडाभरात १७०० बांगलादेशी घुसखोरांना परत पाठविले

### भाजपा म्हणते, आमचा दावा खरा

सत्य अखेर बाहेर आले आहे. एसआयआर प्रक्रियेमुळे घुसखोरांचे धाबे दणाणले आहे. भीतीमुळे ते पश्चिम बंगाल सोडत आहेत. अवैध घुसखोरांमुळे गेल्या अनेक वर्षांपासून लोकसंख्येचे गणित बिघडले आहे,असे मत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य यांनी व्यक्त केले आहे.

### राजकीय फायद्यासाठी एसआयआर प्रक्रिया

तृणमूल काँग्रेसने एसआयआर प्रक्रियेला राजकारणाशी जोडले. हकिमपूर सीमेवर जे काही घडत आहे ते केवळ एसआयआरला योग्य ठरविण्यासाठी योग्य ठरविण्यासाठी केले जात आहे. परत जाणारे घुसखोर असते तर ते 'नो मॅन्स लँडस्' वरून का जात नाहीत? तसेच आतापर्यंत एकालाही का अटक केली नाही, असा प्रश्न तृणमूलचे प्रवक्ते क्रिष्णा मित्रा यांनी उपस्थित केला आहे.

# पंजाबमध्ये विवाह सोहळ्यात गोळीबार; दोघांचा मृत्यू

◆ **लुधियाना, ३० नोव्हेंबर**

येथील पखोवाल रोडवर विवाह सोहळा सुरू असताना दोन गटांमध्ये झालेल्या गोळीबारात दोन नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी दोन्ही गटांविरोधात प्राथमिक चौकशी अहवाल दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार विवाहासाठी दोन्ही गटांना आमंत्रित करण्यात आले होते. एक गट शुभनम मोत्ता तर दुसरा अंकुरच्या नेतृत्वात आला होता. दोन्ही गटात क्षुल्लक कारणावरून प्रथम शाब्दिक चकमक उडाली. त्यानंतर दोन्ही गटांनी एकमेकांवर गोळीबार करण्यास सुरूवात केली. एकमेकांवर जवळपास २५ राऊंड गोळ्या झाडल्या. यामध्ये वासू चोप्रा आणि नीरू या पाहुण्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर दोन्ही गटाचे सदस्य पसार झाले. याप्रकरणी सहा जणांना ताब्यात घेण्यात आले असून आणखी सात जण फरार आहेत, असे पोलिसांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# रशिया-युक्रेन युद्धबंदीसाठी ट्रम्प प्रशासनाचे जोरदार प्रयत्न

## लवकरच मास्को-कीव्ह सोबत चर्चेची शक्यता

◆ **वेस्ट पाम बीच, ३० नोव्हेंबर**

रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरू असलेले युद्ध थांबविण्यासाठी ट्रम्प प्रशासनाने कंबर कसली आहे. पुतिन आणि झेलेन्स्की यांच्याशी या आठवड्यातच चर्चा होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात दोन्ही गटांशी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो चर्चा करणार आहेत.

रशियन फौजांनी २०२२ मध्ये युक्रेनवर आक्रमण केले. तेव्हापासून दोन्ही देशात युद्ध सुरू आहे. युद्ध थांबविण्यासाठी ट्रम्प प्रशासनाने दोघांपुढे शांतता आराखडा सादर केला आहे. पुतिन आणि ट्रम्प यांच्यात अंतिम चर्चा होण्यापूर्वी लवकरच अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रूबियो, विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जारेड कुश्नेर हे युक्रेनच्या शिष्टमंडळासोबत या आठवड्यातच चर्चेसाठी बसण्याची शक्यता आहे. फ्लोरिडा येथे ही बैठक होण्याची चिन्हे आहेत.

मात्र, बैठकीपूर्वीच झेलेन्स्की यांनी लष्करप्रमुख आंद्रेई येर्माक यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून पदावरून काढून टाकले आहे. विशेष एका आठवड्यापूर्वी येर्माक यांनी रुबियो यांची भेट घेतली होती. आता चर्चेसाठी झेलेन्स्की यांनी शिष्टमंडळात तिन्ही दलांचे प्रमुख आंद्रेई नातोव्ह, आंद्रेई सिबिहा, परराष्ट्रमंत्री रुस्तेम उमेरोव्ह यांचा समावेश केला आहे. दरम्यान, रशियाने शनिवारी कीव्ह शहरावर जोरदार हल्ले चढविले असून यामध्ये तीन नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

(वृत्तसंस्था)

### ट्रम्प यांच्या प्रस्तावात सुधारणेसाठी युक्रेनचा आग्रह

डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धबंदीसाठी युक्रेन-रशियासमोर २८ कलमी कार्यक्रम ठेवला आहे. यामध्ये युक्रेनला सैन्य कपातीबरोबरच काही भूभागही गमवावा लागणार आहे. तसेच करार लागू होताच १०० दिवसांच्या आता निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. या प्रस्तावात सुधारण करण्याचा आग्रह युक्रेनकडून धरला जाण्याची शक्यता आहे.

# राज्य सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणा

## अरुण कदम, तेजश्री प्रधान, मधुरा वेलणकर, भूषण कडू यांना पुरस्कार जाहीर



◆ **मुंबई ३० नोव्हेंबर**

कलाक्षेत्रात पदीर्घकाळ सेवा दिलेल्या कलावंतांना सांस्कृतिक कार्य संचालनालय दरवर्षी सन्मानित करत असते. यावेळी अशा कलावंताना गौरविण्यासाठी पुरस्काराची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. २०२४ आणि २०२५ या दोन वर्षांचे पुरस्कार यावेळी जाहीर करण्यात आले.

कलेच्या विविध क्षेत्रात प्रतिवर्षी नाटक, कंठसंगीत, उपशास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत, मराठी चित्रपट, कीर्तन, समाजप्रबोधन, तमाशा, शाहिरी, नृत्य, लोककला, आदिवासी गिरीजन, कलादान, प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील अभ्यासक, लोकनृत्य, लावणी, संगीतबारी, भारुड, विधीनाटय, वाद्यनिर्मिती, झाडीपटटी, खडीगंमत, दशावतार, नमन खेळे, वहीगायन, दुर्मिळ प्रयोगात्मक कला, प्रयोगात्मक कलेशी संबधित संस्था, ध्वनीतंत्रज्ञ, संगीत संयोजन, व्हाईस ओव्हर या क्षेत्रांमध्ये ज्या कलाकारांनी प्रदीर्घ काळ सेवा केलेली आहे, अशा कलावंताना राज्य सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित करण्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज केली. ज्येष्ठ पुरस्कार तीन लक्ष, युवा पुरस्कार एक लक्ष प्रत्येकी मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे. सदरील पुरस्कार हे लवकरच मुंबई येथे सर्व कलाकारांना सन्मानपुर्वक प्रदान करण्यात येणार आहेत.

(तभा वृत्तसेवा)

# व्यापाऱ्याची फसवणूक; आरोपीला अटक

◆ **ठाणे, ३० नोव्हेंबर**

पोलिसांनी ठाणे जिल्ह्यातील एका स्थानिक सोने व्यापाऱ्याला बनावट चेकद्वारे विश्वासात घेऊन २७.५ लाख रुपयांची फसवणूक केली. या आरोपाखाली एकाला अटक करण्यात आली असल्याचे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले.

भाईंदर परिसरातील आरोपीने जुलैमध्ये एका ऑनलाइन रिअल इस्टेट मार्केटप्लेसद्वारे सोने व्यापाराशी मैत्री केली आणि त्याच्याकडून फ्लॅट खरेदीसाठी आगाऊ रक्कम म्हणून ६६ लाख रुपयांचा चेक देऊन त्याचा विश्वास संपादन केला. पीडिताचा विश्वास जिंकल्यानंतर, आरोपीने कोणतेही पैसे न देता त्याच्याकडून २७.५ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने खरेदी केले आणि नंतर मालमत्ता व्यवहारासाठी पूर्वी जारी केलेल्या चेकसाठी पैसे देण्याचे थांबवण्याचे निर्देश दिले. व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून, भाईंदर पोलिसांनी १६ सप्टेंबर रोजी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. आरोपीने नंतर आपली ओळख लपवली आणि अटक टाळण्यासाठी तो वारंवार दिल्ली, नोएडा आणि मुंबई येथे ठिकाणे बदलत होता.

अखेर पोलिसांना तो ठाणे शहरातील एका हॉटेलमध्ये सापडला आणि २७ नोव्हेंबर रोजी तेथून त्याला अटक केली. आरोपी सरायीत गुन्हेगार आहे. याच्याविरुद्ध ठाणे आणि मुंबईत आधीच फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

# मोफत योजना केवळ निवडणूक जिंकण्यासाठी

## माजी आरबीआय गव्हर्नर सुब्बाराव यांची स्पष्टोक्ती

◆ **नवी दिल्ली, ३० नोव्हेंबर**

देशातील वाढत्या रेवडी संस्कृतील आणि प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या घोषणांवर भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डी. सुब्बाराव यांनी कठोर टीका केली आहे. मोफत योजना तुम्हाला निवडणुका जिंकून देऊ शकतील, पण त्यातून देश उभा राहू शकणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

मोफत योजना देण्यामागे राजकीय वर्गाने जणू काही सर्व आर्थिक गणिते सामूहिकपणे बाजूला ठेवली आहेत. या घोषणा बहुतांश वेळा कर्ज काढून पूर्ण केल्या जातात. आजच्या उपभोगाचा भार उद्याच्या करदात्यांवर ढकलणे, हे या धोरणाचे गंभीर परिणाम आहेत.

सरकारे कर्ज घेऊन मोफत योजनांवर खर्च करत असल्याने शिक्षण, आरोग्य आणि भौतिक पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रांतील गुंतवणूक खुंटत चालली आहे. हेच क्षेत्र दीर्घकाळात नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास मदत करतात. प्रत्येक मोफत योजना ही राजकीय अपयशाची स्वीकृती आहे. याचा अर्थ नेता नागरिकांना सांगतोय की, मी तुम्हाला सन्मानजनक उपजीविका आणि नियमित उत्पन्न देऊ शकत नाही, अशी टीका सुब्बाराव यांनी केली.

(वृत्तसंस्था)

# लिव्ह-इन पार्टनरविरुद्धही पतीच्या क्रूरतेचा खटला दाखल करता येतो

## कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय

◆ **बंगळुरू, ३० नोव्हेंबर**

कर्नाटक उच्च न्यायालयाने लिव्ह-इन रिलेशनशिपबाबत एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ (पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून क्रूरता) केवळ वैध विवाहांनाच लागू होत नाही तर लिव्ह-इन रिलेशनशिप रद्द करण्यासाठी देखील लागू होते.

यायमूर्ती सूरज गोविंदराज यांच्या एकल खंडपीठाने हा निर्णय दिला. ही तरतूद आता भारतीय दंड संहितेच्या कलम ८५ आणि ८६ मध्ये हलवण्यात आली आहे, परंतु त्याचे सार तेच आहे. या प्रकरणात एका पुरुषाने त्याच्या दुसऱ्या पत्नीच्या तक्रारीवर दाखल केलेल्या ४९८अ खटल्याला रद्द करण्याची मागणी करणारी याचिका समाविष्ट होती. याचिकाकर्त्याचा पहिला विवाह वैध होता आणि त्या लग्नातून त्याला एक मुलगी होती. असे असूनही, त्याने २०१० मध्ये दुसऱ्या महिलेशी लग्न केले आणि २०१६ पर्यंत तिच्यासोबत पती-पत्नी म्हणून राहिला. नंतर, दुसऱ्या महिलेने हुंडा मागणी, मारहाण आणि क्रूरतेचा आरोप करत कलम ४९८अ अंतर्गत खटला दाखल केला.

### याचिकाकर्त्याच्या वकिलाचा युक्तिवाद

याचिकाकर्त्याच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की पहिले लग्न वैध असल्याने दुसरे कायदेशीररित्या अवैध होते. ते फक्त लिव्ह-इन रिलेशनशिप होते आणि म्हणूनच कलम ४९८अ लागू होत नाही. न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला आणि म्हटले की कायद्याचा उद्देश महिलांना क्रूरतेपासून संरक्षण देणे आहे. जर एखाद्या पुरुषाने एखाद्या महिलेला ती त्याची कायदेशीर पत्नी आहे असे मानण्यास दिशाभूल केली आणि नंतर क्रूरता केली, तर तो फक्त लग्न रद्दबातल असल्याचा दावा करून सुटू शकत नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की नात्याचे सार त्याच्या कायदेशीर वैधतेपेक्षा जास्त विचारात घेतले पाहिजे.

(वृत्तसंस्था)



ऑपरेशन सागर बंधू अंतर्गत दितवाह चक्रीवादळामुळे संकटात सापडलेल्या श्रीलंकेला मदत केली जात आहे. साहित्य घेऊन कोलंबोला रवाना होण्यासाठी सज्ज असलेले भारतीय हवाई मालवाहू विमान

# चित्रपट वार्ता

## वेबसीरिजमध्ये झळकणार एल्विश यादव



**मुंबई** : 'बिग बॉस ओटीटी २'चा विजेता एल्विश यादव आता अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण करत आहे. टीव्हीवर 'लाफ्टरशेफ'मध्ये सहभागी झाल्यानंतर आता त्याची पहिली वेबसीरिज येणार आहे. 'औकात के बाहर' असे या सीरिजचे नाव असून याचा ट्रेलर नुकताच समोर आला. ही एक कॅम्पस ड्रामा वेबसीरिज आहे. याविषयी एल्विशने सांगितले की, 'औकात के बाहर' ही सीरिज मला अतिशय आवडली. कारण यात केवळ प्रेमकथा नाही तर आत्मसन्मान, प्रामाणिकपणा आणि एका तरुणाच्या जिद्दीची कथा आहे. माझ्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात एमएक्स प्लेअरपासून रण्यातस मी अतिशय आतूर आहे. प्रेक्षक या नव्या रूपात मला स्वीकारतील, अशी आशाही एल्विशने व्यक्त केली.

## क्रिकेटपटूसोबत जोडले जातेय् मराठी अभिनेत्रीचे नाव



**मुंबई** : कित्येक दशकांपासून क्रिकेट आणि सिनेसृष्टीचे अतूट नाते राहिले आहे. अनेकांचे लग्नही झाले. आता एका लोकप्रिय मराठी अभिनेत्रीचे नाव क्रिकेटपटू श्रेयस अय्यरसोबत जोडले जात आहे. ती अभिनेत्री म्हणजे मृणाल ठाकूर. प्रत्यक्षात मृणालचे नाव एकीकडे रजनीकांतचा जावई राहिलेल्या धनुषसोबत जोडले गेले असताना आता श्रेयससोबतच्या तिच्या नात्याची समाज माध्यमांवर चर्चा सुरू आहे. यासंदर्भातील एक पोस्ट व्हायरल होते आहे. त्यात म्हटले की, या दोघांचे नाते प्राथमिक टप्प्यावर आहे. सध्या त्यांना ही बाब खाजगीतच ठेवायची आहे. मात्र, यावर नेटकऱ्यांनी ही जोडी ताबडतोब स्वीकारली. चाहत्यांनी दोघांचेही नाव जोडून हॅशटॅग श्रेयल असा खास कपल हॅशटॅगही तयार केला आहे. अद्याप श्रेयस किंवा मृणालने याविषयी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

## रणवीरसिंहवर धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप



**मुंबई** : अभिनेता रणवीरसिंह नुकताच इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियाचा भाग बनला होता. यावेळी मंचावर अभिनेत्याने 'कांतारा' चित्रपटात दाखवलेल्या चावुंडी (चामुंडा) देवीची खिल्ली उडवली, ज्यामुळे त्याच्यावर धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप होत आहे. फिल्म फेस्टिव्हलमध्ये रणवीरसिंहने चित्रपटाचे दिग्दर्शक आणि अभिनेता ऋषभ शेट्टी यांना सांगितले, ऋषभ, मी हा (कांतारा) चित्रपट थिएटरमध्ये पाहिला होता. ती एक उत्कृष्ट कामगिरी होती, विशेषतः जेव्हा स्त्री भूत तुमच्या शरीरात येते. ती कामगिरी, तो एक शॉट उत्कृष्ट होता. तुम्ही कांतारा पाहिला आहे का? जेव्हा तो शॉट येतो. पुढे रणवीर सिंगने स्वतः त्या पात्राची नक्कल करत खिल्ली उडवली.

# मुख्यमंत्र्यांच्या मुलाचे चक्क सामूहिक सोहळ्यात लग्न!

## डॉ. मोहन यादव यांनी प्रस्थापित केला नवा आदर्श



पुत्र अभिमन्यू व नववधूसह मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव

◆ **उज्जैन, ३० नोव्हेंबर**

आजकाल घरातील मुला-मुलींचे लग्न म्हणजे किमान पाच ते सहा दिवसांचे जल्लोषाचे सोहळे आणि लाखो रुपयांचा चुराडा, असे सार्वत्रिक चित्र आहे. अशा लग्नांमुळे सर्वसामान्यांवर या दिखाव्यासाठीच्या अवाढव्य खर्चाचा उगाचच ताण येतो. मात्र, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी आपल्या मुलाचे लग्न सामूहिक सोहळ्यात करून खर्चाच्या अरिष्ट परंपरेला तडा देत नवा आदर्श प्रस्थापित केला आहे.

रविवारी उज्जैनमधील शिप्रा नदीच्या पवित्र तीरावर परोपकार आणि परंपरेचा एक अनोखा संगम पाहायला मिळाला. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी त्यांचे पुत्र डॉ. अभिमन्यू आणि डॉ. इशिता यांच्यासह २१ मुलींच्या सामूहिक विवाह सोहळ्यात समाजासाठी मानवी मूल्यांचे उदाहरण मांडले. दिवसभर विवाहस्थळ शुभ नाद, उत्साह आणि आशीर्वादांनी भरलेले होते.

सकाळी आठ वाजता इम्पीरियल स्क्वेअर येथून लग्नाची मिरवणूक निघाली. ढोल-ताशे आणि लोकनृत्यांच्या गजरात, मुख्यमंत्र्यांसोबत केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आणि जलसंपदा मंत्री तुलसी सिलावत यांच्यासह अनेक मंत्री, आमदार, लोकप्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते. लग्नस्थळी पोहोचल्यानंतर, सर्व नवविवाहित जोडप्यांसाठी हार-मालमहोत्सवी समारंभ एका व्यासपीठावर पार पडला, त्यानंतर संपूर्ण कार्यक्रम टाळ्यांच्या कडकडाटात आणि शुभेच्छांनी दुमदुमून गेला.

यादव कुटुंबाने प्रत्येक नवविवाहित जोडप्याला संपूर्ण घरगुती वस्तू आणि मोटारसायकल भेट देऊन पाठिंबा दर्शविला, सोबत फक्त आशीर्वाद दिले. या कार्यक्रमाचे सर्वात खास भावनिक चिन्ह म्हणजे भेटवस्तू न घेता आशीर्वाद स्वीकारण्याची विनंती.

(वृत्तसंस्था)

### योगगुरू बाबा रामदेव, धीरेंद्र शास्त्रींची उपस्थिती

मध्यप्रदेशचे राज्यपाल मंगूभाई पटेल आणि योगगुरू बाबा रामदेव आशीर्वाद समारंभाला उपस्थित होते. सोबतच बारेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्रीदेखील हजर होते. राज्यपाल आणि बाबा रामदेव यांनी या कार्यक्रमाचे वर्णन सामाजिक जबाबदारी, मूल्ये आणि संवेदनशीलतेचे प्रेरणादायी उदाहरण म्हणून केले. त्यानंतर, विवाह आणि सप्तपदीचे विधी वैदिक मंत्रोच्चारासह २२ खास बांधलेल्या मंडपांमध्ये एकाच वेळी पार पडले.

> **शिप्रा नदीच्या काठावरील या अनोख्या कार्यक्रमाने सामाजिक सौहार्द, सहानुभूती आणि सामायिक आनंदाची अमिट आठवण सोडली. सनातन संस्कृतीशी आमचे नाते १६ विधींनी दर्शविले आहे. आम्ही पंतप्रधानांच्या "सबका साथ, सबका विकास" या मूळ तत्वज्ञानावर काम करत आहोत.**
>
> **डॉ. मोहन यादव,**
> मुख्यमंत्री, मध्यप्रदेश

# कन्नड अभिनेते उमेश कालवश

**बंगळुरू** : कन्नड अभिनेते म्हैसूर श्रीकांतय्या उमेश यांचे रविवारी निधन झाले. ८० वर्षीय रमेश कर्करोगाने आजारी होते. त्यांनी एकूण ३५० चित्रपटांमध्ये काम केले आहे. म्हैसूर येथे जन्मलेले उमेश यांनी वयाच्या चौथ्या वर्षापासून चित्रपट कारकिर्दीला प्रारंभ केला. १९६ मध्ये त्यांनी पहिला चित्रपट केला. जवळपास ५ दशके त्यांनी कन्नड चित्रपटसृष्टी गाजविली.


# दोन कारच्या धडकेत चार जणांचा मृत्यू

**भोपाळ** : मध्य प्रदेशातील भोपाळ जिल्ह्यात दोन स्पोर्ट्स युटिलिटी व्हेईकल्स समोरासमोर धडकल्याने चार जणांचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला, असे पोलिसांनी रविवारी सांगितले.

६० किमी अंतरावर असलेल्या बेरासिया पोलिस स्टेशन हद्दीत शनिवारी रात्री उशिरा हा अपघात झाला, असे त्यांनी सांगितले. एका एसयूव्हीमध्ये बसलेले सर्व जण शेओपूर जिल्ह्यातील रहिवासी होते. ही घटना घडली तेव्हा ते भोपाळहून परतत होते, असे पोलिसांनी सांगितले.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोमवार, १ डिसेंबर २०२५

## विचारपुष्प



कार्याची योजना करताना अनुकूल आणि प्रतिकूल अशा दोन्ही बाजूंनी परिस्थितीचा सांगोपांग विचार करूनच मग कार्य हाती घ्या. प्रतिकूल परिस्थिती ही प्रतिकूलच राहणार असे मानून निष्क्रिय राहू नका. ती परिस्थिती अनुकूल कशी होईल यासाठी प्रयत्न करीत राहा.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

नॅशनल हेरल्ड प्रकरण पुन्हा ऐरणीवर

# सोनिया-राहुल गांधींवर नवीन एफआयआर

### ईडीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल





◆ **नवी दिल्ली, ३० नोव्हेंबर**
दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने नॅशनल हेरल्ड प्रकरणात सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात नवीन एफआयआर दाखल केल्याचे वृत्त आहे. यात त्यांच्या व्यतिरिक्त इतर सहा लोक आणि तीन कंपन्यांची नावे समाविष्ट आहेत. या तीन कंपन्यांमध्ये एजेएल, डोटेक्स मर्चेंडाइज आणि यंग इंडियन यांचा समावेश आहे. या सर्वांवर असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड फसवणुकीने मिळवल्याचा आरोप आहे.

### न्यायालयाचा निर्णय तिसऱ्यांदा पुढे ढकलला

नॅशनल हेरल्ड प्रकरणात दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात सुनावणी पूर्ण झाली आहे. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीच्या आरोपपत्राची दखल घ्यावी की नाही, हे न्यायालयाला ठरवायचे आहे. मात्र, आता निर्णय तिसऱ्यांदा पुढे ढकलण्यात आला आहे. न्यायालयाने १४ जुलै रोजी युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर निर्णय २९ जुलैपर्यंत राखून ठेवला होता. त्यानंतर ८ ऑगस्ट आणि २९ नोव्हेंबर रोजी निर्णय पुढे ढकलण्यात आला. आता न्यायालय १६ डिसेंबर रोजी निर्णय देईल.

### सोनिया-राहुल यांची अनेक तास चौकशी

जून २०२२ मध्ये नॅशनल हेराल्ड प्रकरणात राहुल गांधी यांची पाच दिवसांत ५० तास चौकशी झाली होती. त्यानंतर २१ जुलै २०२२ रोजी नॅशनल हेरल्ड प्रकरणात सोनिया गांधी यांची तीन दिवसांत १२ तास चौकशी झाली होती. या काळात त्यांना १०० हून अधिक प्रश्न विचारण्यात आले. ईडीने जूनमध्ये राहुल गांधी यांचीही पाच दिवसांत ५० तासांपेक्षा जास्त वेळ चौकशी केली होती.

तक्रारीनुसार, २०१० मध्ये एजेएलकडे सुमारे २,००० कोटी रुपये किमतीची मालमत्ता होती. कोलकाता येथील डोटेक्स मर्चेंडाइजने यंग इंडियनला १ कोटी रुपये दिले, त्यानंतर यंग इंडियनने काँग्रेसला ५० लाख रुपये देऊन एजेएलवर नियंत्रण मिळवले. यंग इंडियनमध्ये राहुल आणि सोनिया गांधी यांची ७६ टक्के भागीदारी आहे.

३ ऑक्टोबर रोजी ईडीच्या हेडक्वार्टर्स इन्व्हेस्टिगेशन युनिटच्या तक्रारीवरून एफआयआर दाखल करण्यात आला होता. ईडीने २००८ ते २०२४ पर्यंतचा आपला तपास अहवाल शेअर केला होता, ज्याच्या आधारावर ही कारवाई झाली. याची माहिती शनिवारी समोर आली.

सूत्रांनुसार, या हस्तांतरणापूर्वी काँग्रेसने त्यांची परवानगी घेतली होती का, हे जाणून घेण्यासाठी दिल्ली पोलिस लवकरच एजेएलच्या भागधारकांना बोलावू शकते. काँग्रेसने या आरोपांना राजकीय सूडबुद्धीची कारवाई म्हटले आहे आणि त्यांना एफआयआरची माहिती नसल्याचे सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# पांगरीजवळ भीषण अपघात; पाच जण ठार तर दोघे जखमी

### जखमींना उपचारार्थ बार्शीतील जगदाळेमामा हॉस्पीटलमध्ये केले दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**
विवाहानंतर नवदांपत्यासह देवदर्शनासाठी पनवेलहून तुळजापूरकडे जाणाऱ्या कार गाडीचा पांगरी (ता. बार्शी) जवळील घारीपुरी फाट्याजवळ ट्रकशी धडक होऊन भीषण अपघात झाला. यामध्ये कारमधील सातपैकी पाच जण ठार झाले असून नवदांपत्य यातून वाचले असल्याची माहिती आहे. दोन जखमींवर बार्शीतील जगदाळे मामा हॉस्पीटलमध्ये उपचार सुरू असल्याचे सांगण्यात आले. ही घटना रविवारी दि.३० नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊच्या दरम्यान घडली.

गौतम भगवान कांबळे(वय-६५), जया गौतम कांबळे (वय-६०) तसेच नवरीची मावशी(नाव मिळाले नाही) (तिघे रा. पनवेल) तसेच सारिका संजय वाघमारे (वय-४५), संजय तुकाराम वाघमारे (वय-५०) (दोघे रा.मार्केड यार्ड,वाघ वस्ती, कुर्डूवाडी) असे मृत झालेल्यांची नावे आहेत. या अपघातातून अनिकेत गौतम कांबळे (वय-२८) व मेघना अनिकेत कांबळे (दोघे रा. पनवेल) हे नवदांपत्य वाचले असले तरी गंभीर जखमी झाले आहे.

२६ नोव्हेंबरला विवाहविधी झाल्यानंतर पनवेलहून हे कुटूंब तुळजापूरला देवदर्शनासाठी कारम धून जात होते. या कारमध्ये सात जण प्रवास करत होते. बार्शीतून तुळजापूरकडे निघालेल्या जीपला पांगरी जवळील घारीपुरी फाट्यानजिक ट्रकने जोरदार धडक दिली. त्यामध्ये जीप पलटी होत जवळील ओढ्यात पडल्याची माहिती मिळाली आहे. पागंरी पोलीस ठाण्यात रात्री उशीरापर्यंत या घटनेची नोंद करून घेण्यात येत होती. घटनास्थळी सोलापूरचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी तसेच सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर घटनास्थळी भेट देणार होते.

## महत्त्वाचे

### दालमिया सिमेंटला २६६ कोटींची कर नोटीस

**नवी दिल्ली :** दालमिया भारतची उपकंपनी डालमिया सिमेंट (भारत) लिमिटेडला तामिळनाडूच्या विक्रीकर विभागाने दोन मोठे कारणे दाखवा नोटीस पाठवल्या आहेत. एकूण कंपनीवर २६६.३ कोटी रुपयांच्या कर आणि दंडाचा दावा करण्यात आला आहे. कर विभागाला या दोन वर्षांत कंपनीच्या करपात्र उलाढालीत (म्हणजे विक्रीचा तो भाग ज्यावर लागतो) आणि इनपुट टॅक्स क्रेडिटमध्ये काही अनियमितता आढळली आहे. म्हणजे कंपनीने दर्शवलेली विक्री आणि दावा केलेले इनपुट क्रेडिट यात फरक दिसत आहे. याच संदर्भात नोटीस जारी करण्यात आली आहे. दालमिया भारतने स्टॉक एक्सचेंजला दिलेल्या माहितीत स्पष्टपणे सांगितले आहे की, या कारणे दाखवा नोटिसांचा कंपनीवर कोणताही आर्थिक परिणाम होणार नाही. म्हणजे कंपनीला पूर्ण विश्वास आहे की, ती आपली बाजू भक्कमपणे मांडेल आणि हे पैसे द्यावे लागणार नाहीत.

### भारताचा दक्षिण आफ्रिकेवर १७ धावांनी रोमहर्षक विजय

**रांची :** येथील जेएससीए आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रविवारी खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात विराट कोहलीचे (१३५) शतक, रोहित शर्मा (५७) व कर्णधार केएल राहुलच्या (६०) अर्धशतकांच्या बळावर भारताने दक्षिण आफ्रिकेवर १७ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला. भारताच्या ८ बाद ३४९ धावांना प्रत्युत्तर देताना दक्षिण आफ्रिकेने विजयासाठी भारताला झुंजविले. मॅथ्यू ब्रिट्झकी (७२), टोनी डी झोर्झी (३९), डेव्हाल्ड ब्रेव्हिस (३७), मार्को जॅन्सेन (७०) व कॉर्बिन बॉशने (६७) ने शर्थीचे प्रयत्न केले. परंतु, संपूर्ण संघ ४९.२ षटकांत ३३२ धावांतच गारद झाला. दक्षिम आफ्रिकेला रोखताना कुलदीप यादवने ४ बळी, तर हर्षित राणाने ३ बळी टिपले. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

# संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून

### विरोधक सरकारला घेरण्याच्या तयारीत



◆ **नवी दिल्ली, ३० नोव्हेंबर**
संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला उद्या सोमवारपासून प्रारंभ होत आहे. अधिवेशनाच्या आधल्या दिवशी आज संसदभवनात सर्वपक्षीय बैठक झाली. हिवाळी अधिवेशन वादळी होणार असल्याचे संकेत या बैठकीतून मिळाले.

या बैठकीत संसदेच्या सभागृहातील कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन सत्ताधारी पक्षातर्फे करण्यात आले. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला राज्यसभेचे नेते आणि आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल उपस्थित होते. विरोधी पक्षातर्फे काँग्रेसचे जयराम रमेश, प्रमोद तिवारी, के. सुरेश, तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओ ब्रायन, द्रमूकचे तिरुची सिवा, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

१२ राज्यात राबवण्यात येत असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणावर (एसआयआर) तसेच दिल्लीतील स्फोटाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्यावर संसदेच्या दोन्ही सभागृहात चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी या बैठकीत केली. राजधानी दिल्लीतील वायुप्रदूषणाच्या मुद्यावर चर्चेची मागणीही या बैठकीत करण्यात आली. सरकार लोकशाहीच्या मर्यादांचे तसेच सांसदीय परपरांचे उल्लंघन करत असल्याचा आरोप लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे उपनेते गौरव गोगोई यांनी केला.

विरोधी पक्षांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांची मर्यादा राखावी, तसेच कामकाजात अडथळे आणू नये, असे आवाहन सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीत केले. विरोधक उपस्थित करत असलेल्या सर्व मुद्यावर नियमानुसार चर्चा करण्याची सरकारची तयारी असल्याचे रिजिजू म्हणाले. *(तभा वृत्तसेवा)*

### कामकाज चालू न देण्याचा सपाचा इशारा

एसआयआरच्या मुद्यावर चर्चेची तयारी सरकारने दाखवली नाही तर सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही, असा इशारा समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव यांनी दिला.एसआयआर हा निवडणूक आयोगाचा निर्णय आहे, त्यामुळे या मुद्यावर चर्चा करण्यापासून सरकार पळ काढू शकत नाही. त्यामुळे या मुद्यावर चर्चेची आमची मागणी आहे. १९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात सभागृहाच्या १५ बैठकी होणार असून त्यात १० विधेयके सादर केली जाणार आहेत.

### चक्रीवादळ 'दितवाह'मध्ये तामिळनाडूत तीन जणांचा मृत्यू

◆ **चेन्नई, ३० नोव्हेंबर**
चक्रीवादळ दितवामुळे झालेल्या पावसाशी संबंधित घटनांमध्ये तामिळनाडूमध्ये तीन जणांचा मृत्यू झाला. तुतीकोरिन आणि तंजावरमध्ये भिंत कोसळून दोघांचा मृत्यू झाला, तर मयिलादुथुराईमध्ये विजेचा धक्का लागून एका २० वर्षीय मुलाचा मृत्यू झाला.

राज्यमंत्री के. रामचंद्रन यांनी सांगितले की, किनारी भागात २३४ झोपड्या, मातीच्या घरांचे नुकसान झाले आहे. याशिवाय, १४९ जनावरे मृत्युमुखी पडली आहेत. सुमारे ५७,००० हेक्टर शेती जमीन पाण्याखाली गेली आहे.

श्रीलंकेत झालेल्या कहरानंतर, दितवाह चक्रीवादळ रविवारी संध्याकाळी तामिळनाडू आणि पुडुचेरी किनारपट्टीवर धडकले. *(वृत्तसंस्था)*

# बारा राज्यांमध्ये एसआयआरला सात दिवसांची मुदतवाढ

### आता ११ डिसेंबरपर्यंत प्रक्रिया चालणार



◆ **नवी दिल्ली, ३० नोव्हेंबर**
देशातील १२ राज्यांमध्ये सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेची अंतिम मुदत सात दिवसांनी वाढवण्यात आली आहे. याची अंतिम तारीख ४ डिसेंबर होती. म्हणजेच, आता ही प्रक्रिया ११ डिसेंबरपर्यंत चालेल.

बिहारनंतर देशातील १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) २८ ऑक्टोबरपासून सुरू झाले आहे. या प्रक्रियेत मतदार यादी अद्ययावत केली जाईल. नवीन मतदारांची नावे जोडली जातील आणि मतदार यादीतील चुका सुधारल्या जातील.

विशेष बाब म्हणजे, पुढील वर्षी निवडणुका असलेल्या बंगालमध्ये होईल, परंतु आसाममध्ये होणार नाही. निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, आसाममध्ये नागरिकत्वाशी संबंधित नियम थोडे वेगळे आहेत, त्यामुळे तेथे ही प्रक्रिया वेगळ्या पद्धतीने चालेल. ज्या १२ राज्यांमध्ये एसआयआर होत आहे त्यात अंदमान निकोबार, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्यप्रदेश, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल यांचा समावेश आहे. *(वृत्तसंस्था)*

### एसआयआर म्हणजे काय?

ही निवडणूक आयोगाची एक प्रक्रिया आहे. यात मतदार यादी अद्ययावत केली जाते. यात १८ वर्षांवरील नवीन मतदारांची नावे जोडली जातात. ज्या लोकांचा मृत्यू झाला आहे, जे स्थलांतरित झाले आहेत त्यांची नावे वगळली जातात. मतदार यादीतील नाव, पत्त्यातील चुकाही दुरुस्त केल्या जातात. घरोघरी जाऊन स्वतः फॉर्म भरून घेतात. पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये झाले. अंतिम यादीत ७.४२ कोटी मतदार राहिले. या मतदारांनी ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान केले. एसआयआर असलेल्या १२ राज्यांमध्ये सुमारे ५१ कोटी मतदार आहेत.

# राज्यातील २१ नगरपरिषदांची निवडणूक लांबली

### वाशीम, दिग्रस, वणी, अंजनगाव सुर्जी, पांढरकवडा, घुग्गूस आदींचा समावेश

◆ **मुंबई, ३० नोव्हेंबर**
राज्य निवडणूक आयोगाने बारामतीसह महाबळेश्वर आणि फलटण नगरपरिषेदांसह राज्यातील तब्बल २१ नगरपरिषदांच्या निवडणुकांना अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरणांमुळे आयोगाने सदर निर्णय घेतला आहे. यामध्ये विदर्भातील नगरपरिषदांचाही समावेश आहे.

राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींची निवडणूक २ डिसेंबर रोजी होत आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने बारामतीसह महाबळेश्वर आणि फलटण नगरपरिषेदांची निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलली आहे. आता फलटण आणि महाबळेश्वर येथील मतदानप्रक्रिया अनुक्रमे २० आणि २१ डिसेंबर रोजी होणार आहे. जिल्हा न्यायालय निवडणूक प्रक्रियेबाबत याचिका दाखल करण्यात आली होती. यासाठी जिल्हा न्यायालयाने निकाल देण्यासाठी ८ दिवसांची वेळ मागून घेतली आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### यापूर्वी ३५ प्रभागांच्या निवडणुका पुढे ढकलल्या होत्या

छाननीदरम्यान निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांविरोधात संबंधित ३५ जागांवरील उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांवर २५ नोव्हेंबरपर्यंत निकाल लागणे अपेक्षित होते. मात्र, अंतिम निर्णय न झाल्याने आयोगाची पुढील कार्यवाही ठप्प झाली. न्यायालयाचे आदेश न मिळाल्याने या प्रभागांमध्ये उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटपच शक्य झाले नसल्याने मतदान पुढे ढकलले आहे.

### अमेरिकेत पुन्हा अंदाधुंद गोळीबारात चार ठार

◆ **वॉशिंग्टन, ३० नोव्होंबर**
अमेरिकेतील कॅलिफोर्नियातील स्टॉकटन येथील एका बँक्वेट हॉलमध्ये अंदाधूंद गोळीबार झाला. यात चार जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये मुलांचाही समावेश आहे. रुग्णालयात दाखल झालेल्या जखमींपैकी काही जणांची प्रकृती गंभीर आहे. हल्लेखोरांबद्दल अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही, असे सॅन जोक्विन काउंटी शेरिफ ऑफिसच्या प्रवक्त्या हीदर ब्रेंट यांनी सांगितले.

एका बँक्वेट हॉलमध्ये ही गोळीबाराची घटना घडली. या घटनेचा तपास सुरू आहे, परंतु प्राथमिक माहितीवरून असे दिसते की, हा लक्ष्य करून हल्ला केला आहे, असे ब्रेंट म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

# १ कोटी लखपती दिदी बनवणार, विकासाची ब्ल्यु प्रिंट तयार : मुख्यमंत्री फडणवीस

### मैंदर्गी, दुधनी, अक्कलकोटला निधी कमी पडू देणार नाही





**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० नोव्हेंबर-**
देवाभाऊ जोपर्यंत मुख्यमंत्री आहे तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. राज्यभरातील १ कोटी लखपती दिदी बनवायचे आहे. अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी नगरपालिकेच्या विकासासाठी मोठा निधी दिला आहे. शहर बदलाची ब्लु प्रिंट तयार आहे. या तीनही नगरपालिकेमध्ये भाजपाचा नगराध्यक्ष बहुमताने निवडा. विकास व परिवर्तनाकरिता निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नगरपालिका निवडणुक प्रचारार्थ अक्कलकोट येथील मंगरुळे प्रशाले जवळील प्रांगणात आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष पदरचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी, अतुल मेळकुंदे, अंजली बाजारमठ, मा. खा. डॉ.जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, नगरसेवकपदाचे उमेदवार महेश इंगळे, उत्तम गायकवाड, अविनाश मडीखांबे, सद्दाम शेरीकर, भिमराव उर्फ तम्मा शेळके, मैंदर्गी दुधनी नपाचे नगरसेवकचे उमेदवार उपस्थित होते. आ. कल्याणशेट्टी यांनी मित्रपक्ष शिंदे सेनेवर टीका करताना माझ्यावर वैयक्तिक टीका करण्यापेक्षा तुम्हीही सत्तेत आहात तर विकासाची कोणती कामे केलीत हे सांगण्याचे आवाहन केले.

मैंदर्गी, दुधनी, अक्कलकोट तीनही पालिका निवडणुकीत विरोधकांना स्वतःचे पॅनलही उभा करता आले नाही असे टीकास्त्र आ.कल्याणशेट्टीनी विरोधकांवर सोडले.

या सभेस सुनंदा स्वामी, कस्तुरा चौगुले, लक्ष्मीकांत धनशेट्टी, मुस्तफा गवंडी, मुस्तफा बळोरगी, रेश्मा शेख, अविनाश मडीखांबे, मंजना काम नूरकर, रेणुका राठोड, रमेश कापसे, अपर्णा शिंदे, यशवंत धोंगडे, नवीद डांगे, अमृता शिंदे, शैला स्वामी, महेश हिंडोळे, स्नेहा खवळे, सद्दाम हुसेन शेरीकर, सोनाली शिंदे, देविदास कवटगी, आरती गायकवड, ऋतुराज राठोड, भागुबाई कुंभार, अल्फिया कोरबू आदी उपस्थित होते.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घरकुल योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला

### शहरांच्या विकासासाठी मोठा निधी देणार






**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३० नोव्हेंबर -**
गावांचा व शहरांचा विकास झाला पाहिजे त्यासाठी केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात निधी देत आहे. प्रत्येक शहरात जलजीवन मिशन योजना राबवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घरकुल योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला आहे. ही योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगोल्यात केले.

नगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी, शेकाप, माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील गट यांचेकडून लढवित असलेल्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ ते रविवारी दि.३० नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित जाहीर सभेत बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सांगोला शहराच्या विकासासाठी सांडपाणी प्रश्न, घनकचरा, कचरा डेपो, कचऱ्यापासून खत निर्मिती, कोळसा निर्मिती, विद्युत निर्मिती, गॅस निर्मिती यासाठी भविष्यात सकारात्मक निर्णय घेतला जाईल. सांगोला शहर धूळमुक्त करण्यासाठी सिमेंट रस्ते बनवले जातील. तसेच उद्याने, मैदाने यावर भर दिला जाईल. शहराच्या विकासाचा आराखडा तयार करा त्यासाठी मोठा निधी देऊ. तसेच माजी सैनिकांचे योग्य संघटन करण्यासाठी माजी सैनिक भवन उभारले जाईल.

सर्व महापुरुषांचे पुतळे, स्मारके एकत्रित आणता येतील असे उद्यान निर्माण करा. हा देवाभाऊ सांगोला शहर व तालुक्याच्या विकासासाठी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील असे आश्वासन त्यांनी शेवटी दिले. यावेळी मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अग्रलेख...

# अखेर नखे बाहेर काढलीच!

भोपाळ येथे शनिवारी झालेल्या या घटनेने देशाचे लक्ष वेधले आहे. जमियत-उलेमा-ए-हिंद या संघटनेच्या राष्ट्रीय नियामक मंडळाची बैठक झाली. बैठकीत संघटनेचे देशभरातील सारे मौलाना आणि कार्यकर्ते उपस्थित होते. वास्तविक पाहता महमूद मदनी हे इतर मौलानांपेक्षा मवाळ आणि सर्व घटकांना सोबत घेऊन चालणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात. कधीकाळी ते सद्भावना संसदेचे आयोजन करीत असत आणि जेव्हा देशात दहशतवादी घटना व्हायच्या, तेव्हा ते दहशतवादविरोधी परिषदा घ्यायचे. पण, हा काळ काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचा होता. त्यांचे वडील मौलाना असद मदनी हे मुस्लिम समाजातील मोठे प्रस्थ होते. या मदनी घराण्याचा संबंध सहारणपूर येथील दारूल उलूम देवबंदशी आहे. असद मदनी हे तब्बल १७ वर्षे राज्यसभेचे खासदार होते. मुस्लिमांचे लांगूलचालन करण्यासाठी काँग्रेस आणि त्यांचे समविचारी पक्ष मुस्लिम धार्मिक नेत्यांना राज्यसभेवर पाठवायचे. महमूद मदनी हे असद यांचेच पुत्र आहेत. त्यांचे शिक्षण अर्थातच दारूल उलूम देवबंदमध्येच झाले. काँग्रेस आणि यूपीए सरकारच्या काळात धर्माच्या नावाने सतत दंगेधोपे व्हायचे. जाळपोळ, लुटालूट व्हायची. अशावेळी महमूद मदनी हे दहशतवादविरोधी परिषदा घ्यायचे तसेच सद्भावना संसदेचे आयोजन करून सर्व धर्मांच्या धार्मिक व्यक्तींना मंचावर बोलवायचे. दंगलीच्या काळात मुस्लिमांच्या विरोधात हिंदूच्या मनात उफाळलेल्या संतापाच्या आगीवर पाणी टाकण्याचे कार्य या माध्यमातून असद आणि महमूद मदनी करायचे. हिंदूंनी काहीही झाले तरी दंगलीचे घाव निमूटपणे सहन करीत शांत बसावे, असे हिंदू धर्मीयांच्या तोंडून वदवून घेण्याचे काम सद्भावना संसदेच्या माध्यमातून केले जात असे. मदनी यांच्या कार्यक्रमांना तत्कालीन सरकार मोठी प्रसिद्धीही देत असे. महमूद मदनी यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाची फळेही चाखली आहेत. उत्तर प्रदेशातून राष्ट्रीय लोकदलाने त्यांना खासदार केले होते. २०२३ मध्ये जगभरातील जे ५०० प्रभावशाली मुस्लिम धार्मिक नेते होते, त्यात महमूद मदनी यांचा समावेश होता. जॉर्डनमधील अम्मान येथील इस्लामिक संस्थेने जारी केलेल्या यादीत महमूद यांच्या नावाचा समावेश केला होता. २०१४ पूर्वी मदनी कुटुंबीयांसाठी सर्व काही ठीक होते; त्यानंतर मात्र, मदनी परिवाराला शासकीय पातळीवर कुणी विचारायला तयार नाही. जे हाल दिल्लीतील जामा मशिदीचे रखवाले बुखारी परिवाराचे सुरू आहेत, तेच हाल सध्या मदनींचे आहेत. देशवासीयांनी असाही काळ पाहिला की, निवडणूक आली की काँग्रेससह झाडून तथाकथित सेक्युलर पार्टीवाले बुखारींच्या पाया पडायला जायचे. लोडावर बुड टेकवून फतवे काढत, अमुक पक्षालाच मतदान करण्याचे आवाहन करवून घेण्याचे दिवस जागरूक आणि सुज्ञ मतदारांनी आता संपवले आहेत. झोपलेला बहुसंख्य हिंदू समाज, काही प्रमाणात का होईना, जागा होत आहे. कुठेच डाळ शिजत नसल्याने आणि काहीच मनासारखे होत नसल्याने महमूद मदनी यांची अस्वस्थता भोपाळ येथील जमियत-उलेमा-ए-हिंदच्या बैठकीत उफाळून आली. त्यांनी सर्वोच्च न्यायालयावरच थेट हल्ला चढविला. म्हणजे मनासारखे निर्णय आले, की न्यायालये चांगली आणि उलट निर्णय दिले की संविधान खतरे में! केंद्र सरकारवरही टीका करीत त्यांनी थेट जिहाद म्हणजेच धर्मयुद्धाची धमकी देऊन टाकली. सर्वोच्च न्यायालयाने जेव्हा १९८४ मध्ये शहाबानो प्रकरणात कायद्यानुसार निर्णय दिला होता, तेव्हा का लाखो मुस्लिम दिल्लीच्या रस्त्यावर उतरले आणि निर्णय बदलायला लावला? असे अनेक प्रश्न मदनीसारख्यांना विचारता येतील. जिहादची धमकी देऊन मदनी यांनी त्यांना मानणाऱ्या मुस्लिमांना एकप्रकारे चिथावणी दिली आहे. पण, याचे उलटे परिणाम होऊ शकतात, याची जाणीव त्यांनी ठेवायला हवी. तीन तलाक, बाबरी मशीद प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालांचे उदाहरण देत त्यांनी स्फोटक विधाने केलीत. अनेक मुस्लिम देशांमध्ये तीन तलाकची पद्धत नसताना धर्मनिरपेक्ष भारतात ती का असावी? कुठलाही सभ्य समाज अशाप्रकारचे सामाजिक बंधन स्वत:वर लादून घेणार नाही. बाबरीवर बोलताना मदनी यांनी एकप्रकारे बहुसंख्य समाजालाच अप्रत्यक्षरीत्या लक्ष्य केले. पण, अयोध्येतील राममंदिर तोडूनच बाबरीची निर्मिती करण्यात आली हे मदनी सोयीस्करपणे विसरतात. त्यांनी देशातील लोकसंख्येचेच विभाजन करून टाकले. वेगवेगळ्या कारणांमुळे का होईना, केवळ दहा टक्के नागरिक मुस्लिमांच्या बाजूने असून ३० टक्के विरोधात आहेत. आणि ६० टक्के नागरिक ना मुस्लिमांच्या बाजूचे आहेत ना विरोधात. त्यांनी लोकसंख्येची ही जी विभागणी केली, त्यातून त्यांना हेच सांगायचे असावे की काही राजकीय पक्ष केवळ सत्तेसाठी मुस्लिमांच्या बाजूने आहेत. ३० टक्के लोकसंख्या विरोधात आहे म्हणजेच ही जनताच दिल्ली कुणाच्या हाती असावी हे ठरविते आणि हे कोण आहेत हे सांगण्याची गरज नाही. समझने वालों को इशारा काफी होता है.

मुस्लिमांच्या विरोधात नकारात्मक धारणा देशात तयार होत असल्याचे विधान मदनी यांनी केले. पण, याला जबाबदार कोण आहे? दिल्ली बॉम्बस्फोटानंतर देशात संतापाची सुप्त लाट उसळली आहे आणि विविध समाजमाध्यमे आणि काही राजकीय, धार्मिक नेते ज्याप्रकारे दहशतवाद्यांचे उघडपणे समर्थन करीत आहेत, ते पाहून नकारात्मक भावना वाढणार नाही तर काय होणार? फिलिस्तीनसाठी रॅली काढणाऱ्यांनी दिल्ली बॉम्बस्फोटाच्या विरोधात एक तरी रॅली काढली का? सर्व काही डोळ्यासमोर दिसत असतानाही दहशतवाद्यांचे अप्रत्यक्षपणे समर्थन केले जात असेल तर बहुसंख्य समाजाच्या मनात शंका आणि राग उत्पन्न होणे नैसर्गिक आहे. या देशाच्या फाळणीचे कारण हे राजकीय किंवा आर्थिक नव्हते तर पूर्णपणे धार्मिक होते. फाळणीनंतर उरलेला देश कुणाचा हे उघड असतानाही बहुसंख्यकांच्या विरोधात विधाने करून मदनीसारखे नेते त्यांच्या समाजाचेच नुकसान करीत आहेत. आतापर्यंत महमूद मदनी जे दहशतवादविरोधी परिषदा आणि सद्भावना संसदेचे आयोजन करीत होते, ते सर्व फोल आणि दिखाऊपणाचे होते, हेच मदनी यांनी भोपाळमध्ये जे विषारी फूत्कार सोडले त्यावरून उघड झाले आहे. एसआयआर, बुलडोजर कारवाई आणि वक्फ सुधारित कायदा आदी मुद्यांचा आधार घेत एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य केले जात असल्याची ओरड त्यांनी केली. मतदारयादी पुनरावलोकन प्रक्रिया सर्वांसाठी लागू आहे. ती कुण्या एका समुदायासाठी नाही. खरे तर हे मतदारयाद्यांचे एकप्रकारे शुद्धीकरण आहे. पण, या प्रक्रियेलाही धार्मिकतेचा रंग दिला जात आहे. काही राज्यांनी लागू केलेले धर्मांतरविरोधी कायदे मदनी यांच्या पचनी पडलेले नाहीत. धर्मांतरविरोधी कायदे म्हणजे नागरिकांच्या धार्मिक अधिकाराचे उल्लंघन असल्याचे मदनींना वाटते. पण, असे कायदे करण्याची गरज का पडली यावर कुणीही बोलण्यास तयार नाही. उत्तर प्रदेशातील छांगुर बाबा प्रकरण पाहता, देशात असे कितीतरी छांगुर आहेत, जे हिंदू धर्माला पोखरण्याचे काम करीत आहेत. घरवापसीलाही मदनींनी विरोध दर्शविला. पण, हिंदूंचे धर्मांतर केले जात आहे त्याच्या विरोधात मदनी यांनी परिषदेत एक शब्दही उच्चारला नाही. जबरदस्ती किंवा आमिष दाखवून धर्म परिवर्तन केलेल्यांची हिंदू धर्मात घरवापसी केली तर मदनींच्या पोटात दुखण्याचे कारणच काय? खरे तर मदनी यांनी सर्वोच्च न्यायालय, सरकार आणि बहुसंख्य हिंदूंना लक्ष्य करीत स्वत:च्याच पायावर धोंडा पाडून घेतला आहे. त्यांनी जी विधाने केली आहेत, त्याचा फायदा बहुसंख्यकांच्या जागृतीसाठीच होणार आहे. मदनी ज्याप्रमाणे एकतर्फी विचार करतात, तसा हिंदू धार्मिक नेते आणि पुढारी करीत नाहीत. या देशात आता धर्माच्या आधारावर राजकारण करण्याचे आणि आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचे दिवस संपले आहेत. भोपाळमध्ये मदनी यांनी जी नखे बाहेर काढली आहेत, त्यामुळे त्यांनाच जखमा होणार आहेत, इतरांना नाही. बहुसंख्य समाज समंजस आहे. त्या समाजानेही त्यांचा असली चेहरा आता पाहिला आहे; तो सर्वांनी लक्षात ठेवावा एवढेच!

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# हिवाळी अधिवेशनात ‘चंदीगड’!

डिसेंबर महिन्यात प्रथमच सुरू होत असलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात वेगवेगळे विषय उपस्थित होणार असले तरी या अधिवेशनाचा केंद्रबिंदू- ‘चंदीगड’ हा राहण्याची चिन्हे आहेत आणि याचे कारण आहे या केंद्रशासित प्रदेशासाठी स्वतंत्र नायब राज्यपाल नियुक्त करण्यासाठी सरकारतर्फे मांडले जाणारे विधेयक.

चंदीगड हे देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या स्वप्नातील शहर म्हणून ओळखले जाते. फ्रान्सचा वास्तुविशारद ली कॉरबिसीयर याने या शहराची उभारणी केली. नंतर हे शहर वादाच्या भोवऱ्यात सापडले. हरयाणा आणि पंजाब ही दोन्ही राज्ये या शहरावर दावा सांगू लागली. आणि मग यावर तोडगा म्हणून चंदीगडला केंद्रशासित प्रदेश करण्यात आले आणि त्याचवेळी ते या दोन्ही राज्यांची राजधानी म्हणूनही काम करू लागले. दोन राज्यांची राजधानी असणारे हे देशातील एकमेव शहर आहे. मागील काही वर्षांत चंदीगडचा वाद थंडावला होता. त्या चंदीगडच्या संदर्भात केंद्र सरकारने या अधिवेशनात एक घटनादुरुस्ती विधेयक मांडण्याचा निर्णय घेतला आहे.

**१३१ वी घटनादुरुस्ती :** देशाच्या घटनेत १३१ वी घटनादुरुस्ती करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने मांडला असून, त्यात या शहरासाठी नायब राज्यपाल नियुक्त करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे. मात्र या केंद्रशासित शहराला विधानसभा असणार नाही. जम्मू- काश्मीर, पाँडेचेरी हेही केंद्रशासित भाग आहेत आणि तेथे विधानसभा असूनही नायब राज्यपाल अस्तित्वात आहेत. याउलट अंदमान- निकोबार, लक्षद्वीप, दादरा नगर हवेली, दमण-दीव या केंद्रशासित भागांना नायब राज्यपाल असले तरी तेथे विधानसभा अस्तित्वात नाही. चंदीगडसाठी नायब राज्यपाल नियुक्त केला जाणार असला तरी तेथे राज्य विधानसभा राहणार नाही.

**वाद सुरू :** सरकारतर्फे मांडल्या जाणाऱ्या या विधेयकाची माहिती समोर येताच पंजाबमधील राजकीय पक्षांनी त्यावर आक्षेप घेणे सुरू केले आहे. जेव्हा हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत मांडले जाईल, त्यावर वादंग होण्याची चिन्हे आहेत. चंदीगड शहराच्या जन्मापासूनच या शहराला वादविवादचा शाप लाभला असावा असे दिसते.

आजवर पंजाबचे राज्यपाल हेच चंदीगडचे प्रशासक म्हणून काम करीत असत. आता केंद्र सरकारने चंदीगडसाठी वेगळा नायब राज्यपाल नेमण्याचा निर्णय का घेतला आहे याचे स्पष्टीकरण सरकारकडून केले जाईल. हे विधेयक पारित झाल्यावर चंदीगड हे दोन राज्यपाल व एक नायब राज्यपाल अशा तिघांचे मुख्यालय असेल.



**वाद नको :** चंदीगडबाबत नवा वाद निर्माण होणे योग्य ठरणार नाही अशी सर्वसाधारण भावना व्यक्त केली जात आहे. सरकारच्या या निर्णयानंतरही चंदीगड पंजाबची राजधानी राहणार असली तरी, आपल्यापासून चंदीगड हिसकावून घेतले जात आहे असा विषारी प्रचार राज्यात सुरू केला जाण्याची शक्यता आहे. आणि पंजाब व जम्मू-काश्मीर ही दोन संवेदनशील राज्ये आहेत. या राज्यांबाबत निर्णय घेण्याचा भारत सरकारला पूर्ण अधिकार असला तरी त्याचे आंतरराष्ट्रीय पडसाद उमटतात हे अनुभवाने सिद्ध झाले आहे. भारत सरकारने लडाखला केंद्रशासित प्रदेश घोषित केले, त्यानंतर गल्वान घडले. लडाखच्या या भागात चीन-भारत सैनिकांमध्ये रक्तरंजित चकमक झडली. पंजाबमधील घटनांचे पडसाद ब्रिटन, कॅनडा, अमेरिकेत उमटतात. भारत सरकारने याचा सारासार विचार करूनच हे विधेयक मांडण्याचा निर्णय घेतला असावा असे मानले जाते.

**आणखी एक विधेयक :** संसदेच्या या अधिवेशनात आणखी काही विधेयके मांडली जाणार असली तरी यातील आणखी एक विधेयक वादाचे ठरण्याची शक्यता आहे आणि ते म्हणजे आण्विक ऊर्जा क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुले करण्याचा निर्णय. आण्विक ऊर्जा हा देशाच्या ऊर्जा निर्मितीचा एक महत्त्वाचा भाग असला तरी आजवर तो फक्त सरकारी नियंत्रणात होता. आता हे क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुले केले जाणार आहे. यात काही गंभीर धोके असल्याचे तज्ज्ञांना वाटते. सरकारी गोटातही याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आण्विक ऊर्जा प्रकल्पांसाठी सुरक्षेचे मानक फार जास्त असतात, त्याची अंमलबजावणी खाजगी क्षेत्रात केली जाऊ शकेल काय, याबाबत तज्ज्ञांमध्ये शंका व्यक्त केली जात आहे. कारण खाजगी क्षेत्राचा अनुभव फार समाधानकारक नाही. खाजगी क्षेत्रांमध्ये सुरू होणाऱ्या ऊर्जा प्रकल्पाच्या सुरक्षेत गडबड झाल्यास आण्विक उत्सर्जनाचा नवा धोका निर्माण होऊ शकतो.

**प्रश्न युरेनियमचा :** आण्विक ऊर्जा प्रकल्पात युरेनियमचा वापर केला जातो. यासाठी ५ ते ६ टक्के शुद्ध युरेनियम पुरेसे असते. मात्र, हेच युरेनियम ९० टक्के शुद्ध करण्यात आल्यावर त्याचा वापर आण्विक शस्त्रांसाठी केला जातो. खाजगी क्षेत्रासाठी हे क्षेत्र खुले करण्यात आल्यास या क्षेत्राला युरेनियम आयात करण्याची परवानगी द्यावी लागेल. हे युरेनियम चुकीच्या हाती लागणार नाही याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. या जोखमीच्या क्षेत्राला खाजगी क्षेत्रासाठी खुले करणे योग्य होणार नाही हे जे मत व्यक्त केले जात आहे त्यामागे हेही एक कारण असल्याचे म्हटले जाते. सरकारी गोटातून मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारने या साऱ्याचा सारासार विचार करून हा निर्णय घेतला आहे. यासाठी आवश्यक ते खबरदारीचे उपाय योजण्यात आले आहेत. या युरेनियमचा कोणताही गैरवापर होण्याची कोणतीही शक्यता सरकारला वाटत नाही.

**योग्य निवाडा :** सरन्यायाधीश पदावरून पायउतार होताना न्या. भूषण गवई यांच्या खंडपीठाने एक योग्य निवाडा देत सर्वोच्च न्यायालयाचाच एक निर्णय फिरविला. एप्रिल महिन्यात न्या. पारडीवाला यांच्या खंडपीठाने तामिळनाडू सरकार विरुद्ध राज्यपाल म्हणजे केंद्र सरकार या खटल्यात राष्ट्रपती व राज्यपालांवर त्यांच्याकडे आलेल्या विधेयकांना विशिष्ट कालावधीत मंजुरी देण्याचे बंधन घातले होते. तामिळनाडू विधानसभेने पारित केलेल्या काही विधेयकांना राज्यपाल रवि यांनी मंजुरी न देता त्यांना थंड्या बस्त्यात टाकले होते. त्या विरोधात तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. यावर निवाडा देताना न्या. पारडीवाला यांनी राष्ट्रपती व राज्यपालांनी त्यांच्याकडे आलेल्या विधेयकांना एका कालावधीत मंजुरी न दिल्यास, त्या विधेयकांना मंजुरी मिळाली आहे असे मानले जाईल असे म्हटले होते. या निर्णयावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कलम १४३ (१) अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाकडे अभिमत मागितले होते. ते देताना न्या. गवई यांच्या घटनापीठाने न्या. पारडीवाला यांच्या खंडपीठाचा निर्णय फिरविला. राष्ट्रपती व राज्यपाल यांच्यासाठी अशी कोणतीही कालमर्यादा घालून देता येणार नाही असे मत देताना घटनापीठाने म्हटले आहे, राज्यघटनेत अशी कोणतीही तरतूद नाही आणि ‘विधेयकाला मंजुरी मिळाली’ असे मानले जाईल हे तर कुठेच नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे ही भूमिका स्वीकारता येणार नाही. मात्र, त्याचवेळी राज्यपालांनी राज्य विधानसभांनी पारित केलेल्या विधेयकांची मंजुरी रोखून ठेवणे योग्य होणार नाही अशीही समतोल भूमिका घेतली. एकतर राज्यपालांनी विधेयकास मंजुरी द्यावी, विधेयक फेरविचारासाठी राष्ट्रपतींकडे सोपवावे वा मग राज्य विधानसभेकडे ते परत पाठवावे हे तीनच पर्याय घटनेत सांगण्यात आले आहेत. बेमुदत कालावधीसाठी विधेयक रोखून ठेवणे योग्य होणार नाही असे स्पष्ट प्रतिपादन घटनापीठाने आपल्या अभिमतात केले आहे. न्या. गवई यांच्या घटनापीठाने दिलेले हे अभिमत केंद्र व राज्य सरकारांसाठी मार्ग दाखविणारे ‘दीपस्तंभ’ ठरावे.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# १.७ कोटी मतदार निवडणार २८८ नगराध्यक्ष

महाराष्ट्रात सध्या नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. काही ठिकाणी चिन्ह वाटपास विलंब झाल्याने अपक्षांवर अन्याय होऊ नये म्हणून आयोगाने १ डिसेंबरच्या रात्री १० वाजेपर्यंत प्रचाराला मुभा दिली. राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या या निवडणुकीत २८८ नगराध्यक्ष आणि ६ हजार ८५९ नगरसेवक निवडले जाणार आहे. तब्बल १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार हक्क बजावणार असून यात ५३ लाख ७९ हजार ९३१ पुरुष तर ५३ लाख २२ हजार ८७० महिला मतदारांचा समावेश आहे. इतर ७७५ मतदारही मतदान करणार आहे. विशेष म्हणजे, ४० नगरपालिका आणि १७ नगरपंचायतींनी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने अशा ठिकाणच्या निवडणुकांना स्थगिती न देता या निवडणुकांचे निकाल जानेवारीत होणाऱ्या न्यायालयाच्या निकालाच्या अधीन राहील, असे सांगितल्याने येथेही निवडणुका होत आहे. परंतु, काही ठिकाणी तांत्रिक कारणांमुळे निवडणुका रद्द होण्याची शक्यता आहे.

भाजपाचे १०० नगरसेवक आणि ३ नगराध्यक्ष याआधीच अविरोध निवडून आले आहे. २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबरला मतमोजणी असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे. बहुतांश ठिकाणी युती आणि आघाडी नसल्याने उमेदवारांची संख्या वाढली आहे. त्यातही नाराजी-नाट्य रंगल्याने नेमका कोण निवडून येईल, हे निकालानंतरच स्पष्ट होईल. भाजपा, काँग्रेस, शिवसेना, राकाँ अजित पवार, राकाँ शरद पवार, उबाठा, वंचित बहुजन आघाडी, बसपा आणि अन्य अनेक छोट्या-मोठ्या पक्षांनी आपापले उमेदवार रिंगणात उतरविले आहेत. शिवाय मोठ्या संख्येने अपक्ष नशीब आजमावत असल्याने या निवडणुकीत गोंधळाची स्थिती आहे. प्रत्येकच प्रभागात उमेदवारांची संख्या प्रचंड वाढली आहे. कुठे डझनभर तर कुठे त्यापेक्षाही अधिक उमेदवार रिंगणात आहे. विदर्भात भाजपाकडे मोठा जनाधार आहे. परंतु, सोबत मित्र पक्षांचे उमेदवारही रिंगणात असल्याने मतविभागणीची शक्यता आहे. अशाही परिस्थितीत बहुतांश ठिकाणी भाजपा आणि काँग्रेस या दोनच पक्षांत थेट लढत असल्याचे जाणकार सांगतात. २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० ही मतदानाची वेळ आहे. १३ हजार ३५५ केंद्रांवर मतदान होणार असून १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिट उपलब्ध करण्यात आले आहे. या निवडणुकीसाठी ६६ हजार ७७५ अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यात आले आहे. भाजपाच्या अविरोध ठरलेल्या नगरसेवकांमध्ये विदर्भ ३, मराठवाडा ३, कोकण ४, उत्तर महाराष्ट्र ४९ आणि पश्चिम महाराष्ट्रातील ४१ नगरसेवकांचा समावेश आहे. ही निवडणूक नागपूर विभागातील ५५ नगरपालिका व नगरपंचायती, अमरावती ४५, पुणे ६०, नाशिक ४९, संभाजीनगर ५२ आणि कोकण विभागातील २७ नगरपालिका व नगरपंचायतींसाठी होत आहे. भाजपाने या निवडणुकीतही आपली सर्व शक्ती पणाला लावली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभांमुळे उमेदवारांना विजयाची हमी वाटत आहे. स्टार प्रचारक प्यारे खान आणि जमाल सिद्दिकी हे अल्पसंख्यक समाजापुढे भाजपाची पारदर्शक भूमिका पटवून देण्यात यशस्वी झाले आहे. दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही आपल्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी ताकद लावली आहे. भाजपा, शिवसेना आणि अजित पवार यांच्या राकाँकडून विकासाच्या नावावर मते मागितली जात आहेत. दुसरीकडे काँग्रेस, राकाँ शरद पवार आणि उबाठाने आपले पारंपरिक मुद्दे पुन्हा प्रचारात आणले आहे. या निवडणुकींनंतर महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहे. एकूणच आगामी तीन-चार महिने संपूर्ण महाराष्ट्रात निवडणुकांचे वातावरण राहणार आहे.




९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# कर्ममार्ग सांगणारी भगवद्गीता

कुरुक्षेत्रावरील युद्धाच्या सुरुवातीला अर्जुन भगवंताला म्हणतो, ‘‘आमच्याच कुटुंबीयांना मारून आम्ही सुखी कसे होऊ शकतो? कुळाचा नाश केल्यामुळे जे पाप आम्हाला लागणार आहे, त्यापासून आम्ही निवृत्त का होऊ नये? कुळाचा नाश झाल्याने निरंतर चालत आलेले कुलधर्म नष्ट होतात आणि धर्माचा नाश झाल्याने उरलेल्या संपूर्ण कुळाला अधर्म नष्ट करतो.’’ पुढे तो म्हणतो, ‘‘ही खूप आश्चर्याची आणि दु:खाची गोष्ट आहे की, आम्ही फार मोठे पाप करण्याचा निश्चय केला आहे. राज्य आणि सुखाच्या लोभाने आपल्या स्वजनांना मारण्यासाठी आम्ही तयार झालो आहोत.’’ असे म्हणून, शोकाकुल मन असलेला अर्जुन बाणासहित धनुष्याचा त्याग करून युद्धभूमीत रथाच्या मध्यभागी बसतो. अशाप्रकारे, रथामध्ये बसलेल्या, भीतीने ग्रस्त झालेल्या आणि डोळ्यांमध्ये अश्रू आल्यामुळे जो बघूही शकत नाही, अशा अर्जुनाला भगवान म्हणाले, ‘‘अरे! या अशा प्रसंगी तुला ही भीती जिचे श्रेष्ठ पुरुष कधीही सेवन करत नाहीत, जी स्वर्ग देणारी नाही, कीर्ती देणारी नाही, ती कशी काय प्राप्त झाली?’’ आणि म्हणून ते त्याला म्हणतात ‘‘क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप!’’ हे अर्जुना, या नपुंसकतेचा अंगीकार करू नकोस, तुझ्यासाठी हे योग्य नाही. अंत:करणातील या तुच्छ दुर्बलतेचा त्याग करून युद्धासाठी उभा राहा! पुढे ते अर्जुनाला म्हणतात-

‘‘हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।

तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय, युद्धाय कृतनिश्चय:।’’ जर युद्धात तू मारला गेलास तर तुला स्वर्गाची प्राप्ती होईल आणि जर युद्धात तुझा विजय झाला तर तू पृथ्वीचे राज्य भोगशील. म्हणून, हे कुंतीनंदन, तू युद्धासाठी निश्चय करून सज्ज हो.

व्यक्तीसुद्धा आपल्या जीवनामध्ये अनेक वेळा, आपल्या सुखदु:खांप्रमाणे किंवा लाभ-हानीप्रमाणे, धर्माचा त्याला अपेक्षित असलेला अर्थ काढत असतो. अनेक वेळा, तो कर्तव्यापासून पलायन करणे हे कसे श्रेयस्कर आहे, ते स्वत:ला व इतरांना पटवून देण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये अतिशय नि:संदिग्धपणे कर्तव्याचा मार्ग सांगितला आहे.

आज गीता जयंती सर्वत्र साजरी करण्यात येत आहे. कुरुक्षेत्रावर युद्धाच्या प्रसंगी अर्जुनाला उपदेश करताना भगवद्गीता प्रकट झाली. काही दिवसांपूर्वी नागपुरात एक कार्यक्रम झाला त्यामध्ये ज्यांना लोक पत्रकार आणि विचारवंत समजतात अशी एक व्यक्ती म्हणाली की, इतकी मोठी भगवद्गीता युद्धाच्या प्रसंगी सांगणे कसे शक्य आहे? वास्तविक पाहता भगवद्गीतेमध्ये एकूण ७०० श्लोक आहेत. यामध्ये अर्जुनाने विचारलेले सुद्धा काही प्रश्न आहेत. त्यामुळे हा संवाद होण्यासाठी दोन तास पुरेसे आहेत. दुसरी गोष्ट अशी आहे की त्यावेळेस युद्ध सुरू झालेले नव्हते. युद्धासाठी दोन्ही सैन्य एकमेकांच्या समोर उभे राहिलेले होते. युद्ध सुरू झालेले नसल्यामुळे युद्धासाठी अर्जुनाला तयार करताना जर दोन तास गेले तर काही फार बिघडणार नव्हते. जगातील सर्वच भाषांमध्ये ज्या भगवद्गीतेचे भाषांतर झालेले आहे अशा ज्ञानाच्या अमोघ साठ्याबद्दल हे पत्रकार आणि विचारवंत असे बोलतात यावरून त्यांच्या बुद्धीची कीवच केली पाहिजे.

किंकर्तव्यमूढ होणे ही अवस्था आहे. ही अवस्था व्यक्तीच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या कोणाच्याही जीवनामध्ये उद्भवू शकते. त्यामुळे अशा अवस्थेच्या प्रत्येक माणसाला मार्गदर्शनाची आवश्यकता असते. आज आपण ऐन परीक्षेच्या वेळी ड्रॉप घेणारे म्हणजे परीक्षा न देणारे विद्यार्थी बघतो. ऐन मुलाखतीच्या वेळेला जे भयग्रस्त होतात व मुलाखत नीट देऊ शकत नाही असे पण विद्यार्थी बघतो. जीवनामध्ये कुठलेही भयाचे, क्रोधाचे, मोहाचे प्रसंग निर्माण झाल्यावर जे कर्तव्यच्युत होतात असेही लोक आपण बघतो. ज्याप्रसंगी जी कामगिरी करायला पाहिजे होती ती कामगिरी जे लोक करू शकत नाही असेही लोक आपण बघतो. या सर्वांसाठी भगवान श्रीकृष्णांचा उपदेश अत्यंत मौलिक आहे.

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात की, अर्जुना, तू क्षत्रिय आहेस. तुझा धर्म युद्ध करणे आहे. धर्मासाठी युद्ध करणे आहे. त्यामुळे तू कोणाशी युद्ध करतो आहे हे बघू नकोस, तर तू तुझ्या कर्तव्यावर लक्ष केंद्रित कर. आज सर्वत्र कर्तव्याचीच बोंब आहे. सर्वांना अधिकार पाहिजे आहेत. परंतु कर्तव्य नाही. अधिकारासाठी मोर्चे काढणारे लोक आहेत पण आम्ही आमचे कर्तव्य बजावू यासाठी बैठक घेणारेसुद्धा नाहीत. मोठ्या अधिकारपदावरची व्यक्ती आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून योग्य उमेदवाराला नियुक्त न करता तिच्या जवळच्या, नात्यातल्या उमेदवारांना नियुक्त करते. हे कर्तव्यच्युततेचे उदाहरण आहे. भगवद्गीतेचे हे श्लोक सरकारी व खाजगी कार्यालयांमध्ये तसेच महाविद्यालयांमध्ये सुद्धा शिकविले गेले पाहिजेत. अर्जुनविषादयोग या अध्यायामध्ये भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाचे मन तयार केलेले आहे. कारण असे म्हटलेले आहे ‘‘मन के हारे हार, मन के जीते जीत’’ किंवा ‘‘हारे मन से कोई खडा नहीं होता’’ हरलेल्या मनाने कुठलेही युद्ध जिंकले जाऊ शकत नाही, हे भगवान श्रीकृष्णाला माहिती होते. म्हणून त्यांनी अर्जुनाचे मन सर्वप्रथम तयार केलेले आहे. भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात ‘‘यदा यदाही धर्मस्य’’ ज्या ज्या वेळेला धर्माला ग्लानी येते त्या त्या वेळेला मी अवतार घेईल. आणि माझ्या अवताराचा प्रमुख उद्देश काय असेल तर साधू लोकांचे रक्षण म्हणजे सज्जनशक्तीचे रक्षण आणि जे दुर्जन आहेत या दुर्जनशक्तीचा संहार. त्यामुळे सज्जनशक्तीचे रक्षण हा प्रत्यक्ष भगवंताचा संकल्प आहे. दुर्जनशक्तीचा संहार हे प्रत्यक्ष भगवंताचे वचन आहे. त्यामुळे धर्म- अधर्माच्या लढाईमध्ये आपण कोणाचे पक्षधर आहोत, आपण कोणत्या बाजूने उभे आहोत हे बघणे अतिशय आवश्यक आहे. संघाच्या प्रार्थनेमध्ये सुद्धा ‘‘विधायास्य धर्मस्य संरक्षणम्’’ असे म्हटलेले आहे. म्हणजे धर्माचे संरक्षण करणे हे आमचे प्रथम कर्तव्य आहे. हे आपण समजून घेतले पाहिजे.

मार्गशीष शुद्ध एकादशी या दिवशी भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला गीता सांगितलेली होती. त्यामुळे हा दिवस गीता जयंती म्हणून साजरा केला जातो. अनेक साधू-संत हे कार्य करीत असतात. परंतु भगवद्गीता संस्कृतमध्ये असल्यामुळे सुद्धा अनेक लोक त्याला वाचायला धजत नाही. परंतु आम्ही हे लक्षात घेतले पाहिजे की, आज आमचे विद्यार्थी फाडफाड इंग्रजी बोलू शकतात. अनेक विद्यार्थी जर्मन, जपानी, फ्रेंच इत्यादी भाषांचा सुद्धा अभ्यास करतात. एकेकाळी जगातील विद्वान भारतामध्ये येऊन भारतातील विविध ग्रंथांचा अभ्यास करायचे. त्यासाठी त्यांना संस्कृत भाषा शिकावी लागायची. संस्कृत आमचीच भाषा आहे. ही भाषा आम्ही शिकली पाहिजे. एकमेकांना शिकविली पाहिजे. भगवद्गीता हा आमचा ग्रंथ आहे. ती आम्ही शिकली पाहिजे व इतरांना शिकविली पाहिजे. जगाची एक पंचमांश लोकसंख्या आमची आहे. शंभर कोटी लोक जर भगवद्गीता शिकतील तर संपूर्ण जगच भगवद्गीता शिकेल व ‘‘कृण्वन्तो विश्वमार्यम्’’, आम्हाला संपूर्ण जगाला श्रेष्ठ बनवायचे आहे, ही आमच्या पूर्वजांची घोषणा सार्थक ठरेल.

९५५२५३५८१३
(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-८९

सोमवार, १ डिसेंबर २०२५

### उचलतो म्हणूनि बेलभंडार

उचलतो म्हणूनि बेलभंडार ॥धृ.॥

यवनांनी थैमान मांडुनी, स्वदेश लुटिला दोन हातांनी
प्रतिकाराला पुढे न कोणी उच्छेदाचे सत्र चालले चहूकडे अनिवार ॥१॥

दास्याचा ये संतत प्रत्यय, कर्तृत्वाचा करुनी विक्रय
शक्तियुक्तिने बांधव निर्भय यवनांचे उभविती मनोरे काय विचित्र प्रकार ॥२॥

परतविण्या ही लाट यावनी, रजपूत बांधव मेले लढुनी
शिंपियली रक्ताने अवनी व्यर्थचि कां ते जाऊ द्यावे भगिनींचे जोहार? ॥३॥

सत्तेचा जंव उलटे फासा, बुडे धर्म संस्कृती स्वभाषा
दिसे जीवनी कुणा न आशा फुलवायाला पुन्हा सजे मी स्वत्वाचा अंगार ॥४॥

तन मन धन हे सर्व समर्पून, ध्येयास्तव झिजविणार जीवन
विश्रांतीचे विचार सोडून क्रान्तीने स्वातंत्र्यदेविचे घुमविणार प्राकार ॥५॥

टाकिन भंगुनि रिपुसिंहासन धूलिमलिन ध्वज उंच उभारिन
हिंदुयशाचा डंका घुमविन काय कमी रायरेश्वरा तव असल्यावर आधार ॥६॥

## निवडणुकीत कशाला हवा डीजे?

नगर परिषद, नगर पंचायतची निवडणूक २ डिसेंबरला होणार आहे. त्याचा प्रचार शिगेला पोचला आहे. प्रचाराकरिता आजकाल डीजेचा सर्रास वापर प्रत्येक पक्ष करीत आहे. यात इतक्या मोठ्या आवाजारत निवडणुकीची गाणी वाजवतात की लोक बहिरे होण्याची वेळ आली आहे. त्या आवाजाने लोकांच्या घरातील भांडी पडतात, आजारी, वृद्ध लोकांच्या हृदयाची धडधड वाढते, अभ्यास करणाऱ्याचे लक्ष विचलित होते. यामुळे मतदार हैराण झाला आहे. त्यात आता प्रचाराची मुदत १ डिसेंबरपर्यंत करण्यात आली आहे. म्हणजे अजून एक दिवस (रात्री १० पर्यंत) कानठळ्या बसणारा आवाज सहन करावा लागेल. मुदतवाढ देताना डीजेचा त्रास मतदारांना होईल याचा विचार कोण करणार?



**प्रमोद वाडी**/९५६१७०११७२

## वाचक पत्रे

### साधुग्राम : तंबू खोडांभोवतीच उभारावेत

नाशिकमध्ये २०२६-२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्याकरिता साधू-महंतांच्या निवासव्यवस्थेसाठी १२०० एकर जागेवर साधुग्रामची उभारणी प्रस्तावित असून त्यासाठी तेथील १८२५ झाडांवर कुऱ्हाड चालविण्यात येणार, अशी बातमी आहे. त्याविरोधात वृक्षप्रेमी, पर्यावरणप्रेमींनी आंदोलन सुरू केले असून ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे हेदेखील त्यात सहभागी होत आहेत. साधुग्राममध्ये २२० कोटींच्या पीपीपी तत्त्वावरील प्रस्तावित कमर्शियल पार्क प्रकल्पासाठी ठेकेदाराला तपोवनातील जागा उपलब्ध करून देण्यासाठीच वृक्षतोडीचा घाट घातल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र ही प्रस्तावित वृक्षतोड टाळण्यासाठी एक साधा उपाय आहे. गावखेड्यांतून एसटी स्टॅण्डच्या जवळपास अशी काही हॉटेल्स, रसवंतीगृहे असतात, ज्यांचे छत एखाद्या झाडाच्या खोडा/बुंध्याभोवतीच तयार केलेले असते. हा देशी जुगाड (चांगल्या अर्थाने) अनुकरणीय आहे. काही ठिकाणी तर सिमेंट काँक्रीटची स्लॅबदेखील झाडाच्या खोडाभोवती, योग्य ती काळजी घेऊन साकारलेली असते. अशा प्रकरणांत झाड संरक्षित राहतेच, पर्यावरणाचे रक्षण होते, शिवाय झाडाच्या सावलीचा छतांना उपयोग होतो. अशी उदाहरणे डोळ्यांसमोर ठेवण्यात यावीत आणि साधुग्राम/तपोवनातील एकही छोटे मोठे वृक्ष न तोडता साधू-महंतांसाठी तंबू, राहुट्या, कुटीर इत्यादी निवासस्थाने वृक्षांच्या खोडांभोवतीच उभारण्यात यावीत. झाडांखालील जमिनींचे सपाटीकरण, समतलीकरण करावे लागेल, ते करतानासुद्धा जिथे झाडांची मुळे जमिनीच्या वर आलेली असतील तिथे त्यांना धक्का न लावता ते काम करता येईल. रस्ते, महामार्ग इत्यादी बांधताना वा त्यांचे रुंदीकरण करताना झाडे पाडणे अनिवार्य व समर्थनीय असते, मात्र निवासस्थाने तयार करण्यासाठी झाडे पाडणे अजिबात आवश्यक नाही. तेव्हा शासनाने वरील मार्गाचा अवलंब करून एकही वृक्ष न तोडण्याचे ठरविल्यास इच्छुक ठेकेदार आणि संबंधित प्रशासनातील व लोकप्रतिनिधींमधील टक्केवारीसम्राट नाराज होतील. पण शासनाने त्यांच्याकडे दुर्लक्ष करून व्यापक देशहिताचा, समाजहिताचा आणि पर्यावरण रक्षणाचा विचार करून वृक्षतोड टाळावी.

**अविनाश वाघ**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

# मी सहकार महर्षिंचा नातू आहे, धमक्यांना घाबरणारा नाही

## खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांचा घणाघात



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३० नोव्हेंबर-**

अकलूज नगरपरिषद निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आल्यावर खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी लाव रे तो व्हिडिओ.. ही स्टाईल वापरत अकलूजमधील दहशतीच्या मुद्द्यावर राम सातपुते आणि जयकुमार गोरे यांच्या भाषणाच्या काही क्लिप्स दाखवत अकलूजमध्ये कोण दहशत पसरवत आहे असा प्रश्न उपस्थितांना केला. मला आत टाकण्याच्या धमक्या देतायं, मी पण सहकार महर्षिंचा नातु आहे.तुमच्या धमक्यांना घाबरत नाही आत टाकुन तर बघा सोलापूर जिल्ह्याच्या व अकलूजच्या जनतेसाठी आत जाऊन बसेन, असा घणाघात खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार व शिवसेना उध्दव ठाकरे मित्रपक्षाच्या प्रचाराची सांगता सभा येथील विजय चौकात पार पडली. या सभेस माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, जयसिंह मोहिते-पाटील, आ. उत्तम जानकर, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, वसंतनाना देशमुख, संभाजी शिंदे,नामदेव वाघमारे, दत्ता पवार, स्वप्नील वाघमारे उपस्थित होते.

नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु झाल्यापासून भाजप कडून पालकमंत्री गोरे व माजी आ.सातपुतेसह आनेकांनी मोहिते-पाटीलांनवर अनेक आरोप करत टिकेची झोड उठवली होती.अखेर सांगता सभेत शरद पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भाजप आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून झालेल्या प्रत्येक आरोपाला सडेतोड उत्तर दिले. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांना प्रत्युत्तर देण्यासाठी अकलूज नगरपालिकेच्या निवडणुकीत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी लाव रे तो व्हिडिओ ही स्टाईल वापरली.अकलूज मधील दहशतीच्या मुद्द्यावर राम सातपुते आणि जयकुमार गोरे यांच्या भाषणाच्या काही क्लिप्स स्क्रिनवर दाखवत. अकलूजमध्ये कोण दहशत पसरवत आहे याचे उत्तर मोहिते पाटील यांनी व्हिडिओच्या माध्यमातून दिले. आपल्याला जेलमध्ये टाकण्याच्या धमक्या दिल्या जातात. मात्र, आपण धमक्यांना घाबरत नाही, असे सांगत धैर्यशील मोहिते-पाटील यांनी थेट भाजपला इशारा दिला.तसेच पालकमंत्र्यांनी व माजी आमदारांनी स्वतः किती संस्था उभ्या केल्या किती जणांना रोजगार दिला हे जनतेला सांगावं व या निवडणुकीत तुम्ही ज्यांना सोबत घेवून फिरता त्यांनी किती पतसंस्था बुडघेतला, गणपतीचे पैसे खाल्ले, रस्त्याची कामे आवडली ते विकासाच्या गप्पा मारतहेत असे म्हणत माने-पाटलांचा समाचार घेतला खा.मोहिते-पाटील यांनी घेतला.

# संत नामदेवांचा पालखी सोहळा पंढरीत विसावला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० नोव्हेंबर-**

अलंकापूरी आळंदी येथे कैवल्य साम्राज्य श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा साजरा करून परतीच्या दिशेने निघालेल्या संत नामदेव महाराज पालखी सोहळ्याचे शनिवारी पंढरीनगरीत आगमन झाले.

उत्पत्ती एकादशी (शनिवार दि. १५ नोव्हेंबर ) रोजी व सोमवार (दि.१७ नोव्हेंबर ) रोजी आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा साजरा झाला. या सोहळ्यासाठी संत-महंतांच्या पालख्यांसह लाखो भाविक आळंदीत दाखल झाले होते. अमावस्येपर्यंत पालखी सोहळ्यांचा मुक्काम आळंदी येथील श्री विष्णु मंदिर येथे होता. गुरुवार दि.२० नोव्हेंबर रोजी अमावस्येनिमित्त काल्याचा कार्यक्रम झाल्यानंतर संतांच्या पालखी सोहळ्यांनी परतीच्या दिशेने प्रवास सुरु केला. दरम्यान शनिवार दि.२९ नोव्हेंबर, मार्गशीर्ष शु. ९ दिवशी पालखी सोहळ्यांचे दुपारी चार वाजता इसबावी येथील विसावा मंदिराजवळ आगमन झाले. याठिकाणी महाराज मंडळी, मानकरी व नागरिकांनी दर्शन घेवून पालखी सोहळ्याचे स्वागत केले. याठिकाणी अभंग व आरती करण्यात आली. पालखी रथ फुलांनी सजविण्यात आला. त्यानंतर शाही लवाजम्यासह सनई-चौघड्याच्या निनादात, ज्ञानोबा-तुकाराम, नामदेव-जनाबाईचा गजर करत पालखी सोहळा कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, सरगम चौक, भोसले चौक, भादुले चौक, महाद्वार यामार्गे संत नामदेव पायरी येथे आला. यावेळी अभंग, आरती करण्यात आली. त्यानंतर पालखी सोहळा संत नामदेव मंदिरात विसावला. नामदास परिवारातील सुवासिनी महिलांनी पालखीचे औक्षण केले. याठिकाणी श्री केशवराज, संत नामदेव-जनाबाई यांची आरती झाल्यानंतर मानकऱ्यांना श्रीफळ प्रसाद देण्यात आला. पालखी सोहळा यशस्वी होण्यासाठी ह.भ.प. माधव महाराज, मुकुंद महाराज, केशव महाराज, कृष्णदास महाराज, ज्ञानेश्वर महाराज नामदास यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथ महाराज, विठ्ठल महाराज, हरि महाराज, निवृत्ती महाराज, मुरारी महाराज, केदार महाराज, भावार्थ महाराज, आदित्य महाराज यांच्यासह नामदास महाराज परिवार व फडकऱ्यांनी परिश्रम घेतले.



### वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप

संत नामदेव महाराज पालखी सोहळ्यातील वारकर्यां ना क्रांतीसिंह नाना पाटील चौक येथे संत नामदेव शिंपी समाज, युवक संघटनेच्या वतीने चहा व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. यावेळी शिंपी समाजाचे अध्यक्ष अध्यक्ष गणेश उंडाळे, विश्वस्त राजेश धोकटे, संजय चांडोले, जयवंत कांबळे, सेवक राजाभाऊ जवंजाळ, बाळासाहेब चांडोले, गोविंद वेल्हाळ, रत्नाकर पिसे यांच्यासह वारकरी, समाज बांधव उपस्थित होते.



# ऐन निवडणुकीच्या तोंडावर शहर काँग्रेसला खिंडार

**श्रीदेवी फुलारेंचा पतीसह भाजपामध्ये प्रवेश**

**मुख्यमंत्री फडणवीस यांची विमानतळावर घेतली भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या ऐन तोंडावर काँग्रेस पक्षाला सोलापुरात मोठा धक्का बसला आहे. दोन टर्म नगरसेविका असलेल्या श्रीदेवी फुलारे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, माजी महापौर दिलीप कोल्हे यांच्या उपस्थितीत आपले पती जॉन फुलारे यांच्यासह भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजप प्रवेश केल्यानंतर श्रीदेवी फुलारे यांनी विमानतळावर जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. वर्षापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत फुलारे हे भाजपमध्ये जाणार होते. परंतु त्या अगोदरच त्यांचे पारंपारिक विरोधक अंबादास करगुळे आणि माजी नगरसेविका वैष्णवी करगुळे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे काँग्रेसवर नाराज असलेल्या फुलारे यांनी शेवटी त्यावेळचे काँग्रेस उमेदवार चेतन नरोटे यांच्या प्रचारात उत्स्फूर्त सहभाग नोंदवल्याचे दिसून आले.

दरम्यान, प्रभाग १५ मध्ये अनुसूचित जाती महिला हे आरक्षण असल्याने काँग्रेस पक्षाकडून श्रीदेवी फुलारे यांची वाट मोकळी आहे. पण यापूर्वीच वैष्णवी करगुळे हे भाजपमध्ये गेल्याने त्या ठिकाणी आता फुलारे हे सुद्धा भाजपमध्ये गेले आहेत. यामुळे प्रभाग १५ मधील अनुसूचित जाती महिलांच्या उमेदवारीसाठी निश्चितच रस्सीखेच पाहायला मिळणार आहे. काँग्रेस नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांच्यासह पती जॉन फुलारे व विराज फुलारे यांचा पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे व भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्या उपस्थित भाजपा मध्ये प्रवेश झाला. यावेळी भाजपा पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. या प्रवेशानंतर फुलारे यांनी सोलापूर विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. भाजपाचे काम आपण निष्ठेने करणार असल्याचे सांगितले.

# ‘माध्यमिक’च्या गतीमानतेला जगदंबा फाऊंडेशनचा हातभार

## सीएसआर फंडातून पाच संगणक, एक प्रिंटर, एक स्कॅनर भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात संगणकांच्या कमतरतेमुळे कामे संथगतीने होत होती. कर्मचाऱ्यांकडून विविध कारणे सांगून चालढकल करण्यात येत होती. माध्यमिक शिक्षण विभागातील ही अडचण दुर करण्यासाठी बार्शी येथील सासुरे गावातील जगदंबा उत्कर्ष फाऊंडेशनने सीएसआर फंडातून माध्यमिक शिक्षण विभागाला पाच संगणक, एक प्रिंटर, एक स्कॅनर भेट दिले. त्यामुळे आता माध्यमिक शिक्षण विभागाची कामे गतीने होणार आहेत. माध्यमिक शिक्षण विभागाच्या गतीमानतेला जगदंबा उत्कर्ष फाऊंडेशनने हातभार लावल्याने शिक्षण विभागातील कर्मचारीसह शिक्षकांमधून कौतुक करण्यात येत आहे.



जगदंबा फाऊंडेशनचे प्रमुख डॉ. अजयकुमार करंडे आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांची भेट झाल्यानंतर माध्यमिक शिक्षण विभागात संगणकांची कमतरता असल्याने संगणक संच देण्याची विनंती शिक्षणाधिकारी जगताप यांनी केली होती. त्यांच्या मागणीची तत्काळ दखल घेऊन जगदंबा फाऊंडेशनने माध्यमिक शिक्षण विभागाला साहित्य दिले. त्यामुळे माध्यमिक विभागातील कामे जलदगतीने होणार असून शिक्षक व कर्मचाऱ्यांचे हेलपाटे कमी होणार आहेत.

यावेळी उपशिक्षणाधिकारी सुरेश वाघमारे, अनिल बनसोडे, अनिल पाटील, प्रकाश कोरे, फिरोज शेख, तात्यासाहेब करंडे, रामचंद्र आवारे, प्रशांत भारती, बापूसाहेब नेमाने आदी उपस्थित होते.



# ‘सिंहगड’मध्ये संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून झाली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करत स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूलभूत तत्त्वांप्रती दृढ निष्ठा व्यक्त केली. शिक्षकांनी संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, त्याचे महत्व आणि नागरिक म्हणून प्रत्येकाने पाळावयाची कर्तव्ये या विषयांवर मार्गदर्शन केले. संविधान दिनानिमित्त शाळेमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पहिली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ‘उद्देशिका लेखन स्पर्धा’ घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी हस्ताक्षर आणि आकर्षक मांडणीद्वारे उद्देशिका लिहून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. तर ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी ‘फलक सजावट स्पर्धा’त भाग घेतला. संविधानातील मूल्यांवर आधारित संदेश, चित्रे आणि घोषवाक्यांचा सुंदर संगम साधत विद्यार्थ्यांनी अर्थपूर्ण आणि सजावट सादर केली. याप्रसंगी मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले उपस्थित होते.

# पुंडलिक वरदे हरि विठ्ठल..च्या गजरात कासेगावात नामसप्ताहास सुरूवात

**हभप नरसू वाडकर यांच्या हस्ते झाले वीणापूजन; रामहरी चौगुले, संजय पवार यांच्या हस्ते ध्वजपूजन**

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव,दि.३० नोव्हेंबर-**

पुंडलीक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानेदव तुकाराम...च्या जयघोषात कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील अखंड हीरनाम सप्ताह व गाथा परायणाची रविवार दि. ३० नोव्हेंबर रोजी हभप नरसू वाडकर यांच्या हस्ते वीणापूजनाने सुरूवात झाली.

श्रीसंत सावता माळी मंदिर वर्धापन तसेच जगद्गुरू तुकोबारायांचे वंशज वै. श्रीगुरू सोपानकाका देहूकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर दरम्यान श्रीसंत तुकाराम महाराज गाथा पारायण तसेच अखंड हरिनाम सप्ताह होत आहे. याची सुरूवात रविवारी सकाळी झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वज, ग्रंथ, टाळ, मृदंग, पूजन करण्यात आले. दरम्यान माजी सैनिक शिवाजी खारे व माजी ग्रामपंतचायत सदस्य संतोष भोजने यांच्या हस्ते कलश स्थापना व मूर्तीपूजन करण्यात आले. यावेळी सरपंच यशपाल वाडकर यांनी गळ्यात वीणा घेत नामस्मरणासह ग्रामस्वच्छतेची गरज सांगितली. यावळी हभप श्याम महाराज जोशी, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष संजय पवार, माजी अध्यक्ष रामहरी चौगुले, अल्लाऊद्दीन शेख, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर रोकडे, भरत जाधव, संभाजी चौगुले, सत्यपाल वाडकर, प्रकाश हेडे, माजी चेअरमन तुकाराम कारभारी, चंद्रकांत चव्हाण, जनार्दन काळे, हणमंत काळे, तानाजी हेडे, अरूण काटकर, पांडू माळी, शिवदास वाडकर, हभप धर्मराज वाडकर, हभप अर्जून हुडकर, हभप सागर सुतार, मंदीर समितीचे अध्यक्ष दत्तात्रय काटकर, श्याम इटूकडे, सुधाकर काळे आदीसह भाविक उपस्थित होते. पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा अक्कलकोट पंचायत समितीचे विस्तार अधिकारी हभप संजय महाराज पाटील यांची झाली. समचरण दृष्टी विटेवरी साजिरी.. या अभंगावर त्यांनी निरूपण केले. त्यांनी संतांच्या भूमिकेतून स्वच्छतेचे महत्वही विषद केले.



# किरकोळ भांडणातून २० वर्षीय तरुण बेपत्ता; कोणाला आढळल्यास संपर्काचे पोलिसांचे आवाहन



**सोलापूर,दि.३० नोव्हेंबर-**

येथील न्यू पाच्छा पेठेतील प्रविण गणेश चौगुले (वय-२०) हा तरूण राहत्या घरातून किरकोळ भांडण झाल्याने दि.२९ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता निघून गेला आहे. तो अद्याबप घरी न आल्याने गौरी गणेश चौगुले (वय-४०) यांनी जेलरोड पालीस ठाण्यात बेपत्ता झाल्याबाबत लेखी अर्ज दिला आहे. काळासावळ वर्ण, १६५ सेमी ऊंची, मराठी, तेलगु, हिंदी, वडार भाषा बोलणार तरूण सापडल्यास जेल रोड पालीस ठाण्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संपर्कासाठी मो.नं. ९७६४००३३०२ किंवा फो.नं. ०२१७-२७४४६३१

## निधन वृत्त...

### भुवनेश्वरी आमणगी



**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

माजी नगरसेवक शैलेद्रें मल्लिनाथ आमणगी यांचे मातोश्री श्रीमती भुवनेश्वरी मल्लिनाथ आमणगी (वय ७२) यांचे आज सकाळी अल्पश्या आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर वीरशैव लिंगायत रुद्रभुमी, तुळजापूर वेस येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### शरद लोहकरे



**अकलूज, दि. ३० नोव्हेंबर-**

येथील शरदराव विश्वंभर लोहकरे (वय ८८) यांचे आज रविवारी ३० नोव्हेंबर रोजी दुपारी १२:३० वाजता वृध्दपकाळाने निधन झाले आहे. अकलूज येथील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. राजीव लोहकरे व प्रेस फोटोग्राफर संजय लोहकरे यांचे वडील होत.



# पत्रकार रविंद्र चिंचोलकर यांचे राजकीय पत्रकारितेवरील पुस्तक आवर्जून वाचा

## माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

राजकारण आणि पत्रकारिता हे डॉ. रवींद्र चिंचोलकर यांचे पुस्तक राजकारण आणि पत्रकारितेच्या क्षेत्राचे चांगले विश्लेषण करणारे आहे. विद्यार्थी तसेच राजकीय क्षेत्रातीललोकांनी आवर्जून वाचावे व विविध विद्यापीठांच्या अभ्यासकमासाठी निवडले जावे असे मत भारत सरकारचे माजी गृहमंत्री सुशीपकुमार शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या सभागृहात या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा झाला त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुशीलकुमारी शिंदे बोलत होते .प्रमुख वक्ते म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सुधीर गव्हाणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र . श्रीकांत येळेगावकर, पुस्तकाचे लेखक डॉ रवींद्र चिंचोलकर, राजकीय विश्लेषक राजा माने, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलगुडे तसेच संभाजीनगर येथील विद्या बुक पब्लिशर्सचे शशिकांत पिंपळापुरे यांची उपस्थिती होते. पुस्तकाचे लेखक डॉ.रवींद्र चिंचोलकर म्हणाले की, पत्रकारितेत बदल घडविण्याची शक्ती आहे. सोलापुरातील पत्रकारांनी मिरवणुकातील डॉब्लीचा वापर बंद करण्याबाबत जागरूकता निर्माण केली त्यामुळे त्या कार्यास यश मिळाले . तरुणांनी राजकारणाचा तिटकारा न करता चांगले राजकीय नेते होऊन पुढे यावे. पत्रकारितेने राजकारणावर अंकुश ठेऊन त्याला योग्य दिशा देण्याचे कार्य करावे. अध्यक्षीय भाषण प्रा श्रीकांत येळेगावकर यांनी केले. प्रारंभी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक राजा माने यांनी डॉ. चिंचोलकर यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याचा आढावा घेतला डॉ. चिंचोलकर यांनी सोलापुरात पत्रकारांची पिढी घडविली असेही ते म्हणाले. मुद्रित ते डिजिटल पत्रकारिता या प्रवासात पत्रकारितेत मोठे बदल घडल्याचेही ते म्हणाले.

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**
६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२
फोन -०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे जाहीर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विकी अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बैंक ती. सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६९ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०० मधील तरतुदीनुसार दि. २३/०५/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार नवकार ट्रेडर्स प्रोप्रा सोनाली संजय बल दोटा ना. १०८ बालाजी कॉलनी सोलापूर रोड, बार्शी व जामीनदार यांना पाठवून रक्कम रु ३७,८९,५२३.१९ यावर दिनांक ०१/१२/२०१२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत दाद१४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार पांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६९ च्या नियम १०% मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहोत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

**कर्जदार -**
नवकार ट्रेडर्स प्रोप्रा सोनाली संजय बलदोटा
**जामीनदार -**
१. ऋषभ संजय बलदोटा रा १०८, बालाजी कॉलनी सोलापूर रोड, बार्शी

| मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत |
|---|---|---|
| सोनाली संजय बलदोटा | डी व सब डी सोलापूर पैकी ता. बार्शी नगर पालिका हद्दीतील<br>गट नं. १४१०/६/अ/१४१०/७/१३६४/३/२/९३<br>क्षेत्र २०७.०५ आर. चौ.मी. आकार १३७.००<br>चतुसिमाः<br>पूर्वस - प्लॉट नं.९२ दक्षिणेस - प्लॉट नं.१४<br>पश्चिमेस - ९ मी रुंदीचा रस्ता उत्तरेस - ९ मी. रुंदीचा रस्ता | रु. १८,९३,६८१/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक, ली, सोलापूर<br>६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२<br>बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक - ०२/०१/२०२६<br>वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत<br>निविदा उघडण्याची तारीख व वेळ- दि. ०३/०१/२०२६ सायंकाळी ५.०० वाजता | |
| ३१.१०.२०२५ अखेर येणेबाकी | रु. ६८,२९,५४८/-दि. ०१.११.२०१५ पासून पुढील व्याज, दंडव्याज व इतर खर्च | |

**टिप-** लिलावात भाग घेणार यांनी राखीव किंमतीच्या १०% बयाणा रक्कम दि.०१/०१/२०२६ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट/आर.टी. जी.एस अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. २. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील. ३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. ४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - ०१/१२/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी 'सुपरहिट महिना' : मोदी



**नवी दिल्ली** : मन की बात च्या १२८ व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी 'सुपरहिट महिना' म्हणून वर्णन केलेला हा महिना साजरा केला. त्यांनी विविध क्रीडा प्रकारातील खेळाडूंनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या मालिकेचे कौतुक केले. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात प्रथम भारतीय महिला क्रिकेट संघाचे आयसीसी महिला विश्वचषक जिंकल्याबद्दल अभिनंदन केले आणि टोकियो येथे झालेल्या डेफलिम्पिकमध्ये भारताच्या आतापर्यंतच्या सर्वोत्तम कामगिरीवर प्रकाश टाकला, जिथे देशाने २० पदकांची प्रभावी संख्या मिळवली. भारतीय महिला कबड्डी संघाने विश्वचषक विजेतेपद पटकावले. भारताने सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्पर्धेत वर्चस्व गाजवले. संघाने आपले सर्व गट साखळी सामने जिंकले आणि नंतर उपांत्य फेरीत इराणला ३३-२१ ने हरवून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले व तिथे त्यांनी चीन तैपेईला ३५-२८ ने हरवले. भारताने ग्रेटर नोएडा येथे झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध चषक फायनल्समध्येही चमक दाखवली व ९ सुवर्णपदकांसह २० पदके जिंकली. संपूर्ण स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट कामगिरीने खेळाडूंनी प्रत्येक भारतीयाचे मन जिंकले, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

### आंद्रे रसेल आयपीएलमधून निवृत्त



**कोलकाता** : १६ डिसेंबर रोजी होणाऱ्या मिनी लिलावापूर्वी आक्रमक अष्टपैलू आंद्रे रसेलने रविवारी इंडियन प्रीमियर लीगमधून निवृत्तीची घोषणा केली आणि तो तीन वेळा विजेत्या कोलकाता नाईट रायडर्सच्या प्रशिक्षक चमूमध्ये सहभागी होणार आहे. आयपीएल २०१४ पासून केकेआर संघाचा अविभाज्य भाग असलेला ३७ वर्षीय रसेल २०२६ च्या आवृत्तीपूर्वी त्यांच्या प्रशिक्षक चमूमध्ये ''पॉवर कोच'' म्हणून सहभागी होणार आहे. आयपीएलचा लिलाव अबू धाबी येथे लिलाव होणार आहे. मी आयपीएलमधून निवृत्त होत आहे... पण तो अहंकार नाही. आयपीएलमध्ये किती छान प्रवास होता - आठवणींचे १२ हंगाम आणि कुटुंबाकडून भरपूर प्रेम मिळाले, असे रसेल म्हणाला. मी अजूनही जगभरातील इतर प्रत्येक लीगमध्ये षट्कार मारत राहीन व बळी टिपत राहीन. तुम्ही मला केकेआरच्या सपोर्ट स्टाफमध्ये २०२६ चा पॉवर कोच म्हणून एका नवीन भूमिकेत पहाल. नवीन अध्याय. तीच ऊर्जा कायम आहे, असे तो म्हणाला.

### अभिषेक शर्माचा विक्रम पंजाबचा बंगालवर विजय



**हैदराबाद** : अभिषेक शर्माने केलेल्या विक्रमी १४८ धावांच्या बळावर पंजाबने रविवारी येथे सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धेत क गटाच्या साखळी सामन्यात मोहम्मद शमीच्या नेतृत्वाखालील बंगालवर ११२ धावांनी विजय नोंदविला. अभिषेकने ५२ चेंडूंत १४८ धावा ठोकल्या आणि ५० धावांत एक बळी टिपून आपल्या अष्टपैलू खेळाची चमक दाखविली. यात अभिषेकने १६ षट्कार ठोकले व ८ चौकार मारले. अभिषेकने १२ चेंडूत अर्धशतक ठोकले, जे पुरुषांच्या टी-२० क्रिकेटमध्ये संयुक्तपणे तिसरे सर्वात जलद अर्धशतक आणि संयुक्तपणे दुसरे सर्वात जलद अर्धशतक आहे. अनुभवी मोहीमपटू शमी आणि चपळ आकाश दीप यांच्या नेतृत्वाखालील आक्रमक आक्रमणाविरुद्ध त्याच्या स्फोटक खेळीमुळे, पंजाबने प्रथम फलंदाजी करताना पाच बाद ३१० धावा केल्या. कर्णधार अभिमन्यू ईश्वरनने ६६ चेंडूत ८ षट्कार व १३ चौकारांसह १३० धावांची खेळी केली. बंगालला २० षटकांत ९ बाद १९८ धावांवर रोखण्यात आले.

# गायत्री-त्रिशाचे दुहेरीचे जेतेपद कायम

### सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन ● किदाम्बी श्रीकांत उपविजेता



विजेतेपदाच्या चषकासह गायत्री गोपीचंद व त्रिशा जॉली




उपविजेता किदाम्बी श्रीकांत

◆ **लखनौ, ३० नोव्हेंबर**

रविवारी येथे सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत गतविजेत्या त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंदने जपानच्या काहो ओसावा व माई तानाबे या जोडीवर तीन गेममध्ये संघर्षपूर्ण विजय मिळवत महिला दुहेरीचे विजेतेपद राखले.

एक तास १६ मिनिटांच्या रोमांचक अंतिम सामन्यात अव्वल मानांकित भारतीय जोडीने पहिला गेम गमावल्यानंतर शैलीदार आक्रमक खेळ करत जोरदार मुसंडी मारली आणि जगातील ३५ व्या क्रमांकाच्या जपानी जोडीला १७-२१, २१-१३, २१-१५ असे पराभूत केले.पाच महिन्यांच्या खांद्याच्या दुखापतीतून गायत्री परतल्यानंतर भारतीय जोडी केवळ दुसरी स्पर्धा खेळत होती.

अंतिम सामन्याची सुरुवात ४९-शॉट रॅलीने झाली, त्यामुळे प्रारंभापासूनच सामना चुरशीचा झाला. दोन्ही जोड्यांनी दांडगेपणाने झुंज दिली आणि त्यानंतर ओसावा-तानाबे जोडीने ६-३ अशी आघाडी घेतली. त्यानंतर भारतीय जोडीने बरोबरी साधली व पुढे ८-६ अशी आघाडी मिळविली. तथापि, जपानी खेळाडूंनी मध्यांतरात पुन्हा संघटित होऊन आघाडी घेतली आणि सामन्यावर आपली पकड कायम ठेवत १८-१५ अशी आघाडी घेतली व पहिला गेम जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये भारतीय खेळाडूंना सूर गवसला व त्यांनी ९-२ अशी आघाडी घेतली. ब्रेकवर त्यांनी ११-५ अशी आघाडी राखली. त्रिशा व गायत्रीने रॅलीजवर नियंत्रण मिळवत राहिले आणि १७-९ अशी आघाडी घेतली. भारतीय खेळाडू २०-११ असा आघाडीवर पोहोचले व नंतर सामन्यात बरोबरी साधली.

तिसऱ्या गेममध्ये भारतीय संघ ७-४ असा आघाडीवर होता. ओसावा-तानाबेने तूट १२-१४ पर्यंत कमी केली, परंतु उत्साही त्रिशाने आणखी एक छुपा नेट शॉट मारला आणि गायत्रीने एक जोरदार स्मॅश मारला, त्यामुळे ही भारतीय जोडी विजेतेपदाच्या जवळ पोहोचली. जपानी खेळाडूंच्या वाईट फटक्यांमुळे भारताला सहा मॅच पॉइंट्स मिळाले आणि त्यांनी आपला मुकुट कायम ठेवला. ◂(वृत्तसंस्था)

#### जेसन गुनावानकडून श्रीकांतचा पराभव

२०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्यपदक विजेता व माजी विजेता किदाम्बी श्रीकांत ६७ मिनिटांच्या रोमांचक सामन्यात जागतिक क्रमवारीत ५९ व्या स्थानावर असलेल्या हाँगकाँगच्या जेसन गुनावानकडून १६-२१, २१-८, २०-२२ असा पराभव पत्करावा लागला. ३२ वर्षीय खेळाडूने २०१७ मध्ये फ्रेंच ओपनमध्ये शेवटचे विजेतेपद जिंकले होते आणि या वर्षाच्या सुरुवातीला तो मलेशिया मास्टर्स सुपर ५०० मध्ये उपविजेता राहिला होता.

# कोहलीने मोडला सचिनचा विक्रम

### रोहितने पाकिस्तानच्या शाहीद आफ्रिदीचा




◆ **रांची, ३० नोव्हेंबर**

विराट कोहली आणि रोहित शर्माने रविवारी येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात दमदार फलंदाजी करत भारताला ८ बाद ३४९ धावांचा मोठा डोंगर उभारून दिला. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एक मोठे लक्ष्य ठेवताना विराट कोहलीने शतक झळकावित मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा शतकाचा विक्रम मोडला, तर रोहितने पाकिस्तानच्या शाहीद आफ्रिदीचा सर्वाधिक वन-डे षट्कारांचा विक्रम मोडीत काढला.

विराट कोहलीने १२० चेंडूंत ११ चौकार व ७ षट्कारांसह १३५ धावांची खेळी केली, या खेळी बरोबरच त्याने महान सचिन तेंडुलकरचा विश्वविक्रम मोडला. कोहलीने ५२ वे एकदिवसीय शतक ठोकून इतिहासात आपले नाव कोरले.

५२ वे एकदिवसीय शतक ठोकून कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या एकाच स्वरूपात सर्वाधिक शतके ठोकण्याचा सचिनचा विश्वविक्रम मोडला. यापूर्वी, तो ५१ शतकांसह मास्टर ब्लास्टरशी बरोबरी करत होता. सचिनने कसोटी स्वरूपात ५१ शतके ठोकली होती.

दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांना कठोर परीक्षेचा सामना करत या जोडीने दुसऱ्या गड्यासाठी १३६ धावांची शानदार भागीदारी केली.

**सर्वाधिक षट्कार मारण्याचा विक्रम रोहितच्या नावावर**


दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या वन-डे सामन्यात सलामीवीर रोहितने ५१ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह ५७ धावांची अर्धशतकी खेळी केली. या खेळीबरोबरच रोहितने पाकिस्तानच्या शाहिद आफ्रिदीचा इतिहासात सर्वाधिक एकदिवसीय षट्कार मारण्याचा विक्रम मोडला.

रोहित शर्माने एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक ३५२ षट्कार ठोकून पाकिस्तानच्या शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडीत काढला.

रोहितने या मालिकेपूर्वी ३४९ षट्कार ठोकले होते आणि आता तीन षट्कार ठोकत त्याने आफ्रिदीच्या विक्रमाला मोडीत काढले. आफ्रिदीने १९९६ ते २०१५ दरम्यान एकदिवसीय क्रिकेटमध्ये ३९८ सामन्यांमध्ये ३५१ षट्कार मारले होते. ३८ वर्षीय उजव्या हाताच्या फलंदाजाने एकदिवसीय क्रिकेटमध्ये आपले ६० वे अर्धशतक पूर्ण केल्यानंतर लगेचच हा विक्रम केला. रोहितने २००७ मध्ये पदार्पण केलेल्या भारतासाठीच्या त्याच्या २७८ व्या एकदिवसीय सामन्यातील केवळ २७० व्या डावात ही कामगिरी केली. ◂(वृत्तसंस्था)

# विदर्भाचा ओडिशावर विजय

### सय्यद मुश्ताक अली टी-२० क्रिकेट



◆ **लखनौ, ३० नोव्हेंबर**

अमन मोखाडे व ध्रुव शोरीच्या दमदार फलंदाजीच्या बळावर विदर्भाने ओडिशावर ३१ चेंडू शिल्लक ठेवत ७ गड्यांनी मात करून सय्यद मुश्ताक अली चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत आपला पहिला विजय नोंदविला. विदर्भाचा तीन सामन्यातील हगा पहिला विजय ठरला. ४० चेंडूंत नाबाद ७३ धावांची खेळी करणारा अमन मोखाडे सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

ओडिशा संघाचा कर्णधार बिपलाव सामंतरायने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ओडिशाने ६ बाद १६० धावा काढून विदर्भासमोर विजयासाठी १६१ धावांचे लक्ष्य ठेवले. अमन मोखाडे व ध्रुव शोरीने नाबाद खेळी करून विदर्भाला विजय मिळवून दिला. विदर्भाने १४.५ षटकांत २ बाद १६३ धावा केल्या.

ओडिशाकडून संबित बारट (४६) व प्रयाश सिंगने (नाबाद ४०) थोडीफार झुंज देत संघाला सन्मानजनक धावसंख्या उभारून देण्यात योगदान दिले. विदर्भाकडून दर्शन नळकांडेने २ बळी, नचिकेत भुते, हर्ष दुबे व अध्ययन डागाने प्रत्येकी एक बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना विदर्भाची सुरुवात निराशाजनक झाली. विदर्भाने अथर्व तायडे (१६) व अध्ययन डागा (०) हे दोन महत्त्वपूर्ण मोहरे तिसऱ्या षटकांत २४ धावांत गमावले. मात्र त्यानंतर अमन व ध्रुवने नाबाद खेळी करत विदर्भाला एकहाती सामना जिंकवून दिला. अमनने ४० चेंडूत ५ चौकार व ५ षट्कारांसह नाबाद ७३ धावांची, तर ध्रुवने ३९ चेंडूंत ६ चौकार व ३ षट्कारसह नाबाद ६९ धावांची खेळी केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १३९ धावांची भागीदारी केली, ही विदर्भाची टी-२० मध्ये तिसऱ्या गड्यासाठीची सर्वोच्च भागीदारी आहे, ◂(वृत्तसंस्था)

# शालिना सय्यर सिद्धीने जिंकले कांस्यपदक

### खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धा




प्रतिस्पर्धीविरुद्ध खेळताना शालिना सय्यर सिद्धी

◆ **भरतपूर, ३० नोव्हेंबर**

सिद्दी समुदायातील कुस्तीगीर शालिना सय्यर सिद्धीने खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ५७ किलो फ्रीस्टाइल कुस्तीमध्ये कांस्यपदक जिंकले. यामुळे खेलो इंडिया उपक्रमाची समावेशकतेची वचनबद्धता पूर्ण झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

कर्नाटक विद्यापीठ, धारवाडचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शालिनानेया स्पर्धेत आपल्या अंतिम गट लढतीत हरयाणाच्या भगत फूल सिंग महिला विद्यापीठाच्या भानूचा २-१ असा पराभव करून कांस्यपदक मिळवले.

सिद्दी हे आफ्रिकन वंशाचे आहेत आणि अनेक शतकांपूर्वी समुद्रमार्गे भारतात आले होते. तेव्हापासून ते येथे राहत आहेत आणि आता ते इतरांसारखेच भारतीय आहेत, पूर्णपणे सुसंस्कृत आहेत. सिद्दींना मागासवर्गीय मानले जाते आणि अनेक राज्यांमध्ये ते 'अनुसूचित जमाती' श्रेणीत येतात.

शालिनाची कामगिरी कौतुकास्पद आहे, पण खेलो इंडिया व्यासपीठाशिवाय ती हे करू शकली नसती. या व्यासपीठाने तिच्यासारख्या खेळाडूंना उत्कृष्ट कामगिरी करण्याची संधी दिली.

मी खेलो इंडिया युथ गेम्समध्ये भाग घेतला आहे. पण हा माझा पहिलाच खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा आहे. मी खूप आशा घेऊन आली होती. मी पदक जिंकेन, अशी आशा होती, परंतु ते कोणत्या रंगाचे असेल खात्री नव्हती. पदक जिंकून मला खूप आनंद झाला आहे, असे शालिना म्हणाली. ◂(वृत्तसंस्था)

# मिश्र सांघिक विश्वचषकात चीनचे जेतेपद कायम

**चेंगडू** : दोन वेळा विजेता चीनने २०२५ आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस फेडरेशन (आयटीटीएफ) मिश्र सांघिक विश्वचषकाला रविवारी चेंगडू येथे पुन्हा गवसणी घातली. ऑलिम्पिक विजेते वांग चुकिन आणि सन यिंगशाने मिश्र दुहेरीत वोंग चुन टिंग आणि डू होई केम यांना १२-१०, ११-८, १२-१० असे हरवून चीनला तीन गेमची आघाडी मिळवून दिली. 'प्रत्येक सामन्यात केवळ तीन गेम असल्याने, या स्पर्धेत प्रत्येक गुण अधिक महत्त्वाचा आहे, असे वांग चुकिन म्हणाला. आम्ही सामन्यात पिछाडीवर होतो पण हळूहळू स्वतःला पुन्हा वर आणण्यासाठी स्वतःला समायोजित केले, असे तो म्हणाला.

गत ऑलिम्पिक सायकलमध्ये आम्ही वोंग आणि डू यांच्याविरुद्ध खेळलो होतो आणि आम्ही एकमेकांना ओळखतो. ते खरोखरच कठीण खेळले आणि पहिला गेम थोड्या फरकाने जिंकल्यानंतर आम्हाला खूप बरे वाटले, असे सन म्हणाली. महिला एकेरीत झू चेंगझूवर ११-४, ११-९, ९-११ असा विजय मिळवून कुई मानने चीनला आणखी पुढे नेले.

# महाराष्ट्राला सायकलिंगमध्ये ८ पदके

### सिद्धी, मंगेशला सुवर्ण, आदिती, सिद्धेश, मंथनला रौप्य, योगेश्वरी, सायलीला कांस्य




सायकलिंग शर्यतीमधील पदकविजेते मंथन लाटे, सिद्धी शिर्के, मंगेश ताकमोगे, सिद्धेश पाटील,अदिती डोंगरे, सायली आंरडे, योगेश्वरी कदम

◆ **जयपूर, ३० नोव्हेंबर**

खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील सायकलिंग ट्रॅकमध्ये महाराष्ट्राच्या सायकलपटूंनी दमदार कामगिरी करत ८ पदके जिंकलीत. पुणे विद्यापीठाच्या सिध्दी शिर्के, मंगेश ताकमोगे यांनी सुवर्णपदके जिंकून दिवस गाजविला. अदिती डोंगरे, सिद्धेश पाटील, मंथन लाटेने रौप्य, तर कोल्हापूरच्या योगेश्वरी कदम एक व सायली आंरडेने दोन कांस्यपदके जिंकून महाराष्ट्रासाठी पदकाची अष्टमी साजरी केली.

सवाई मानसिंग क्रीडा संकुलातील सायकलिंग ट्रॅकवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खेळाडूंनी सायकलिंग स्पर्धेची सुवर्ण सांगता केली. २० कि.मी पॉईंट शर्यतीत पुणे विद्यापीठाच्या १९ वर्षीय सिद्धी शिर्केने ६५ गुणांची कमाई करीत सुवर्णयश संपादन केले. लव्हली विद्यापीठाच्या रिंकु भानूने ३८ गुणांसह रौप्य तर कोल्हापूर विद्यापीठाच्या योगेश्वरी कदमने २७ गुणांसह कांस्यपदक मिळविले.

पुरूषांच्या पाच फेऱ्यांच्या एलिट शर्यतीत पुणे विद्यापीठाच्या मंगेश ताकमोगेने सुवर्ण, तर मंथन लाटे रौप्यपदक पटकावले. पुरूषांच्या २० कि.मी पॉईंट शर्यतीत कोल्हापूरच्या सिद्धेश, पाटीलचे सुवर्णपदक एका गुणाने हुकले. ४२ गुणांसह केरळ विद्यापीठाच्या आदित्य संकरने सुवर्ण पटकावले सिद्धेशला ४१ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

महिलांच्या स्क्रैच प्रकारात अदिती डोंगरेने २८:०६.६१३ मिनिटांची वेळ नोंदवून रूपेरी यश संपादन केले. ◂(वृत्तसंस्था)

# आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत भारताला दोन पदके




यशस्वी खेळाडूंसोबत डॉ. रणवीरसिंग राहल व इरशाद खान

◆ **अमरावती, ३० नोव्हेंबर**

नुकत्याच जापानमधील टोकियो शहरात झालेल्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी सुवर्ण व रौप्य दोन पदकांची कमाई केली.

१५ ते २६ नोव्हेंबर दरम्यान जपान येथे डेफ ऑलम्पिक्स गेम्स ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कुस्ती स्पर्धेत फ्रीस्टाईल पद्धतीत भारतीय डफ कुस्ती संघाने आंतरराष्ट्रीय सहभागाकरिता राष्ट्रीय डफ कुस्ती स्पर्धेचे आयोजन करून संपूर्ण भारतातून ६ वजन गटात ६ कुस्तीगीर खेळाडूंची निवड केली होती. हेच खेळाडू जपानला गेले होते. भारतीय कुस्ती संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून डॉ. रणवीरसिंग राहल व प्रशिक्षक इरशाद खान राऊफ खान यांची निवड करण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत भारतीय डफ कुस्ती संघाने सर्वोत्तम कामगिरी करून एक सुवर्ण पदक व एक रौप्य पदक जिंकले. फ्री स्टाईलमध्ये सुमित दहियाने ९७ किलोमध्ये सुवर्ण पदक व अमित क्रिष्ण दलाल यांनी ८६ किलोमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. या यशाबद्दल संपूर्ण भारतीय क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले व भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केले. तसेच केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया, युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार दिल्ली आणि भारतीय क्रीडा प्राधिकरणाद्वारे डॉ. रणवीरसिंग राहल व इरशाद खान राऊफ खान तसेच पदक विजेते खेळाडू यांचा सत्कार करण्यात आला. यापूर्वी डॉ. रणवीरसिंग राहल यांनी सतत आठ वर्षापासून भारतीय कुस्ती संघाचे प्रमुख कुस्ती प्रशिक्षक म्हणून किर्गीस्तान, मलेशिया, इस्तंबूल तुर्की, उझबेकिस्तान, इराण, चायनीज ताईपाई, रशिया, बल्गेरिया, झग्रेब या देशात यशस्वीपणे भारताचे नेतृत्व केले. इरशाद खान रऊफ खान हे सुद्धा सहा वर्षापासून कुस्ती प्रशिक्षक म्हणून कार्य करीत आहे, तसेच त्यांनी सात वेळा विदेशात जाऊन भारताचे डफ कुस्ती प्रशिक्षक म्हणून प्रतिनिधित्व केले आहे. हे दोघेही प्रशिक्षक अमरावतीचेच रहिवासी आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

# मेस्सीचा इंटर मियामी अंतिम फेरीत

### एमएलएस चषक फुटबॉल ● ईस्ट फायनलमध्ये न्यू यॉर्क सिटी एफसीवर ५-१ ने विजय



मेजर लीग फुटबॉलच्या ईस्ट फायनलमध्ये विजय नोंदविल्यानंतर आनंद साजरा करताना लियोनेल मेस्सी

◆ **फोर्ट लॉडरडेल, ३० नोव्हेंबर**

इंटर मियामीने शनिवारी रात्री न्यू यॉर्क सिटी एफसीवर ५-१ असा विजय मिळवला आणि ईस्टर्न कॉन्फरन्स जेतेपद मिळवले आणि मेजर लीग फुटबॉल (एमएलएस)चषक स्पर्धेच्या कप फायनलमध्ये स्थान मिळवले.

लियोनेल मेस्सी आणखी एका ट्रॉफीसाठी खेळेल. जॉर्डी अल्बा व सर्जियो बुस्केट्स सुद्धा निवृत्ती घेण्यास तयार नाहीत हे स्पष्ट आहे.

या सामन्यात तादेओ अलेंडेने तीन गोल केले. अल्बा आणि बुस्केट्स हे मेस्सीचे दीर्घकालीन सहकारी या हंगामाच्या अखेर निवृत्त होणार असून त्यांनी पहिल्या दोन गोलमध्ये सहाय केले होते.

माटेओ सिल्वेट्टीने इंटर मियामीसाठी ६७ व्या मिनिटाला गोल केला, मेस्सीने सहाय्य केले. क्लब आणि देशासाठी त्याच्या कारकिर्दीतील ४०५ वा सहाय्य असून हा सामान्यतः फुटबॉल इतिहासात सर्वात जास्त मानला जातो. ८३ व्या मिनिटाला अल्बाच्या एका पासवर टेलास्को सेगोव्हियाने गोल करून संघाला धावगतीमध्ये रूपांतरित केले आणि ८९ व्या मिनिटाला अलेंडेने हॅट्ट्रिक पूर्ण केली.

आम्ही पुढे जाण्याच्या भावनेने अंतिम फेरीत पोहोचलो आहोत, असे इंटर मियामीचे प्रशिक्षक झेव्हियर मास्चेरानो म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# फुले महाविद्यालयाचा संघ ठरला उपविजेता

### मुलींची आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा




मुलींचा यशस्वी खो-खो चा संघ आपल्या प्राचार्य व प्राध्यपकांसोबत

◆ **अमरावती, ३० नोव्हेंबर**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या मुलींच्या आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळद्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या खो खो संघाने उपविजेतेपद प्राप्त केले. मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात तेथील प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे व केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडीया यांच्या हस्ते उपविजेत्या चमूला स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या खो खो मुलींचा संघ चिखलदरा येथे झालेल्या झोन अंतिम स्पर्धेत सिपना महाविद्यालयाच्या चमूला नमवून विजयी ठरला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती येथे झालेल्या अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात केशरबाई लाहोटी महाविद्यालयासोबत झालेल्या सामन्यात महात्मा ज्योतिबा फुलेचा संघ हा उपविजयी ठरला.

पुरस्कार वितरण सोहळ्याला अमरावती विद्यापीठाच्या खो-खो संघाच्या निवड समितीचे अध्यक्ष डॉ. गजेंद्र रघुवंशी, प्रा. डॉ. विलास ठाकरे, प्रा. अमोल वाडवे, डॉ. नितीन चव्हाळे व अनेक विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी उपविजेत्या आणि विजेत्या चमूचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. या चमूत सानिका सोलव, ऋतुजा वानखेडे, तृप्ती लाधे, ईश्वरी ठाकरे, प्रियंका दहीहांडे, गौरी लाधे, नेहा रिठे, नेहा अटाळकर, जान्हवी अटाळकर, गायत्री पाटील, समीक्षा वानखडे या विद्यार्थिनींनी प्रा. डॉ. धाकुलकर यांच्या मार्गदर्शनात सहभाग घेतला. ◂(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर

# तरुण भारत

आयोजित

यादी क्रमांक ६

## "मला हवंय आदर्श सोलापूर"

## या विषयावरील निबंध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची यादी...

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | धनश्री धाकपाडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| २ | आर्या गुळवे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ३ | आरुषी चौरे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ४ | तंजीला शेख | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ५ | कशब शेख | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ६ | श्रद्धा जाधव | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७ | श्रद्धा बिराजदार | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ८ | मृणाली पवार | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ९ | जानवी मुडके | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १० | आदिती मोरे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११ | दिया तोलानी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२ | पूर्वा अग्निहोत्री | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३ | आरोही इचगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४ | आरोही कामतकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५ | आरोही रामदासी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १६ | अविनाश ढोले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १७ | तन्मयी कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १८ | इशानी सलगर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १९ | वेद म्हेत्रे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २० | अनुष्का बिराजदार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २१ | आर्या घाटकर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २२ | स्नेहा कोनाळे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २३ | राजनंदीनी जनुरे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २४ | प्राप्ती नुणे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २५ | प्रगती फडतरे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २६ | अश्विनी शिरकुल | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २७ | समृद्धी बगले | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २८ | संस्कृती झुरळे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २९ | अंकिता पवार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ३० | स्तुती शिंदे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ३१ | श्रवण सुतार | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३२ | प्रणिती वाघमारे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३३ | प्रियदर्शिनी जाधव | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३४ | प्रिती नडखांबे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३५ | अंजली इनामदार | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३६ | प्रणाली जाधव | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३७ | संयोगिता धायगुडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३८ | अक्षरा भोसले | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३९ | संचिता ससाने | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ४० | आकांक्षा माळगे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ४१ | आदिती अडकुल | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ४२ | सुची कांबळे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ४३ | श्रावणी राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ४४ | आदर्श साखरे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ४५ | शानवी ओल्लला | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ४६ | कुमुद राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ४७ | मनस्वी जंगीड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ४८ | शुभ्रा पवार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ४९ | ऋचा पवार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ५० | तनीष्का टिक्के | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ५१ | जान्हवी रणखांबे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५२ | अजय पुजारी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५३ | शिवराज पवार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५४ | श्रेयश पवार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५५ | शिवराज पवार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५६ | श्रेयश काटगावकर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५७ | अमृता चिंचोळकर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५८ | मुक्ता गोडसे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५९ | काव्यांजली बिराजदार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६० | इशरत शेख | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६१ | श्रुती बिच्चल | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६२ | अर्पिता रणदिवे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६३ | विजया गोरसे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६४ | रितेश धप्पाधुळे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६५ | विनय बिराजदार | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६६ | सम्यक गायकवाड | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६७ | प्रणव गायकवाड | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६८ | साई कल्याणी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६९ | स्तनेश आरकल | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७० | ओंमकार गड्डम | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७१ | आरोही काळे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७२ | हर्षदा धिंदळे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७३ | आराध्या जाधव | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७४ | राधिका राठोड | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७५ | जानवी दळवे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ७६ | साईराज जाधव | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७७ | अनिकेत चव्हाण | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७८ | तनिष्का बोराडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७९ | आयुष तुळसे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ८० | श्लोक बिराजदार | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ८१ | सुप्रिया बददाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ८२ | भक्ती देशमुख | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ८३ | अनिश बुरुगवार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ८४ | श्रावणी कांबळे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ८५ | अमृता जाधव | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ८६ | स्वरुपा लांबतारे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ८७ | आराध्या नरोटे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ८८ | अमेय कलबुर्गी | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ८९ | तन्वी राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ९० | सतिश कलशेट्टी | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| ९१ | कार्तिकी चव्हाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९२ | अजिंक्य बिराजदार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९३ | वीर कस्तुरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९४ | अनुजा भालस्कर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९५ | श्रुती काळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९६ | साईराज घोडके | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९७ | तेजश्री फुलारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९८ | सार्थकी कोळेकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९९ | सृष्टी विधाते | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०० | निहारिका मंगलपल्ली | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | हृजुता बोरामणी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २ | सोहम टिकुटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३ | त्रिशा झंपा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४ | समिहान पात्रुटकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५ | प्राची कलखंबकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६ | तारुण्या कोटापल्ली | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७ | समृद्धी टिपणे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८ | वेदांत जहागिरदार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९ | सार्थक कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १० | सारंग लोणारकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११ | लक्ष्मी चौगुले | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १२ | निहारिका चिम्मण | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १३ | अक्षता यळमेल्ली | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १४ | वेदिका कुलकर्णी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १५ | राजनंदिनी जेनुरे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १६ | श्रावणी रूपनर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १७ | आर्या घाटेकर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १८ | स्नेहा कोव्वाळे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १९ | सोहम् काकडे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २० | संकल्प गंगे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २१ | श्रेयश कोळी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| २२ | सुफीयान कुरेशी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २३ | आरमान शेख | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २४ | जैद बागवान | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २५ | पियुष बंदपट्टे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २६ | भास्कर बल्ला | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २७ | वसुंधरा ढगे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २८ | समृद्धी गुन्नाल | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २९ | निहारिका सामलेटी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३० | भावना वड्डेपल्ली | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३१ | ऋतुजा कापसे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३२ | अनुदि चव्हाण | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३३ | अदिती श्रीखंडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३४ | मृणाली अक्कलकोटे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३५ | वैष्णवी गदगीमठ | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ३६ | गौरी चव्हाण | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ३७ | ओमकार मल्लुटे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ३८ | ज्ञानेश्वरी पवार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ३९ | आर्यन बेनुरे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४० | गणेश विजापुरे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४१ | स्वरूप धनवडे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४२ | शिवानी जावळे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४३ | तोष्वी जाधव | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४४ | रिद्धी शिंदे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४५ | शर्वरी गुज्याडकर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४६ | मृणाल कुलकर्णी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४७ | शौर्य बसुदे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४८ | शालिनी माने | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ४९ | दिव्या कुंभार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५० | सोनाक्षी धनश्री | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५१ | हर्षदा मिली | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५२ | आराध्या माडा | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५३ | समृद्धी जोगदे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५४ | श्रृती चव्हाण | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५५ | भारती ईटकर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५६ | मिथीलेश मेटी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५७ | अर्पिता म्हेत्रे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५८ | वैष्णवी बिराजदार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५९ | आर्या दुलंगे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ५० | अमृता घुगरे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६१ | अक्षता चिंचोळीकर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६२ | प्रतिक्षा बंडगर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६३ | अंजली व्हनमाने | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६४ | श्लोक होनपाखरे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६५ | प्रियंका भिंगारे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६६ | श्रद्धा सलगर | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६७ | आर्या सरसंबे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६८ | उपासना देऊ | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ६९ | प्रतिक्षा यळयेली | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ७० | सनिदी हलसंगी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ७१ | रणवीर परदेशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७२ | रुही क्षीरसागर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७३ | इरा शहा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७४ | कामाक्षी विन्नू | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७५ | अखिल अरकाल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७६ | भुवनेश्वर औरंगाबादकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७७ | विश्वेश्वर पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७८ | ओजस्वी गोरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७९ | तेजश्री ख्रिस्ते | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८० | परिणीती राजदेव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८१ | रुग्वेद बच्चुवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८२ | विहान बिराजदार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८३ | रणविर मोहीते | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८४ | हमजा उटकूर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८५ | चिन्मय चंदनशिवे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८६ | अलिना जमादार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८७ | मृणमयी लवाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८८ | देवांश जंगीद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८९ | आशिष कुकरेजा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९० | आरव लाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९१ | आदित्य मिस्त्री | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९२ | श्रेयश येतनाळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९३ | अनन्या गुंड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९४ | शनाया हिरेमठ | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९५ | स्वरा केनडोले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९६ | शर्वरी नाईक | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९७ | अनिका पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९८ | प्रणव्या मेघनाथन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९९ | शार्वी राऊत | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०० | आनंदी उकरंडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०१ | अनघा उंबरदंड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०२ | रेयांश क्षीरसागर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०३ | देवांश लोणीकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०४ | पार्थ पामनानी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०५ | अनिश पवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १०६ | सायली मोरे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १०७ | मानसी पाटील | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १०८ | अनुश्री चव्हाण | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १०९ | श्रद्धा  जाधव | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११० | अंकिता कांबळे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १११ | श्रुती गायकवाड | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११२ | सोनम कांबळे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११३ | शबनूर शेख | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११४ | परिणीती माने | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११५ | सौम्या उबाळे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११६ | स्वप्नील चव्हाण | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११७ | ओंकार सातम | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११८ | हरिदास कांबळे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११९ | असद शेख | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२० | ऋतांजली सरवदे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२१ | अंकिता गुरव | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२२ | ऋतुजा उपाडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२३ | सानवी ढोबळे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२४ | गायत्री बनसोडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२५ | आरुष वाघमारे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२६ | यशराज गुडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२७ | प्रिया भांगरे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२८ | श्रावणी निचळ | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२९ | राजनंदिनी भोरे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३० | अमृता जाधव | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३१ | विद्या माने | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३२ | गायत्री कळके | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३३ | ईश्वरी कुचेकर | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३४ | गणेश पिस्के | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३५ | श्लोक विभूते | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३६ | नेहा बेलभंडारे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३७ | समृद्धी गायकवाड | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३८ | प्रतीक्षा खारे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३९ | श्रुती निचळ | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १४० | श्रावणी बिराजदार | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |

# पावसाची कृपा : ५ वर्षानंतर यंदा दुष्काळी पट्ट्यात उसाची लागवड

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.३० नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्याचा पश्चिम भाग हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. या भागातील जमीन ही मध्यम स्वरुपाची असल्याने व शेतीक्षेत्र पूर्णता निसर्गावर अवलंबून असल्याने या भागात ज्वारी, बाजरी, मका, कांदा पिके घेतली जातात. अनेक वर्षानंतर समाधानकारक पाऊस झाल्याने व अद्यापही ओढ-नाले ओसंडून वाहत असल्याने यावर्षी अनेक वर्षानंतर या भागातील शेतकरी उसाची लागवड करीत असल्याचे दिसून येत आहे.

यावर्षी राज्यात सरासरीपेक्षा दुप्पट पाऊस झाला असून माळशिरस तालुक्यातही सरासरी पेक्षा जास्त पाऊस झाला आहे. सर्वच नाले ,ओढे ओसंधून वाहत आहेत .दुष्काळी पत्तातील सर्वच पाझर तलाव,



मका,कांदा आदींना हमीभाव नसल्याने पिक घेणे परवड नाही .यावर्षी पाऊस झाल्याने अद्यापही नाले ओढे वहार असल्याने बंधारे, तलाव भरले असल्याने अनेक वर्षानंतर उसाची लागवड केली.आहे आमच्या भागातील जमिनी हलक्या असून त्यांना सातत्याने पाणी द्यावे लागते यावर्षी विहिरीनाही पाणी असल्याने पाण्याची शास्वता आहे. **- समाधान चोरमले, शेतकरी, जळभावी (माळशिरस)**



बंधारे पूर्ण क्षमतेने भरले आहेत.पश्चिम भागातील शेती क्षेत्र पाउसावर अवलंबून आहे. या भागातील शेतकरी शेती बरोबर मेंढपाळाचा व्यवसाय करतात. या भागात ज्वारी ,बाजरी ,मका कांदा पिके घेतली जातात.गेले पाच सहा वर्षापूर्वी पाऊस होत होता परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे या भागातील शेतकऱ्यांना दुष्काळाचा सामना करावा लागत होता. पाण्याची श्वास्वती नसल्याने उसाची लागवड केली जात नव्हती. परंतु यावर्षी पाण्याची शास्वता झाल्यामुळे ,मका ,कांदा यांना हमी भाव मिळत नसल्याने चार वर्षानंतर प्रथमच शेतकरी वर्ग उसाची लागवड करीत असल्याचे दिसून येत आहे.

# झेडपी शाळांमधील बोगस हजेरीला बसणार लगाम

## ऑनलाईन हजेरी यशस्वी होणार?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.३० नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील अनेक शाळेत विद्यार्थी हजर नसतानाही हजर असल्याचे दाखविण्यात येते. मात्र आता विद्या समीक्षा केंद्र ॲपद्वारे झेडपी अर्थात जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची हजेरी घेण्यात येणार आहे. यासाठी शाळांनी नोंदणी करावी, असे आदेश प्राथमिक शिक्षण विभागाने दिले आहेत. ऑनलाईन हजेरी यशस्वी होणार का? अशा नोंदणीमुळे गैरप्रकारांना खरंच आळा बसणार का? याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

जि.प.शाळांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर व्हावा, या हेतुने विद्यार्थ्यांची हजेरी ऑनलाईन स्वरुपात घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याद्वारे सकाळ व दुपारच्या सत्रातील हजर व गैरहजर विद्यार्थ्यांची संख्या एका क्लिकवर कळणार आहे. दरम्यान, या प्रणालीत अनेक त्रुटी असून ऑनलाईन हजेरीऐवजी ई लर्निंगसाठी शाळांना संगणक व इतर सोईसुविधा पुरविण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

शिक्षकांना दररोज सकाळी आणि दुपारी विद्यार्थ्यांची उपस्थिती मोबाईल ॲपवर नोंदवावी लागणार आहे. ही माहिती थेट जिल्हा शैक्षणिक कार्यालयाच्या नियंत्रण कक्षात पोहोचणार असून गैरहजर विद्यार्थी स्पष्ट होण्यास मदत होणार आहे.

### अशावेळी काय करावे?

हजेरीवेळी मोबाईलला रेंज नसल्यास, वर्गशिक्षक गैरहजर असल्यास, विद्यार्थी हजेरीनंतर आल्यावर, शिक्षकांच्या कागदावर हजेरी असल्यास वा शिक्षक प्रशिक्षण व रजेवर गेल्यानंतर काय करावे? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर

शिक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा वाढता वापर जिल्हा परिषदेच्या शाळेत व्हावा, या उद्देशाने शासनाने विद्यार्थ्यांची हजेरी ऑनलाईन घेण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील अनेक शाळेत विद्यार्थी हजर नसतानाही हजर असल्याचे दाखविण्यात येते. ऑनलाईन हजेरी नोंदणीमुळे अशा प्रकारांना आळा बसणार आहे, असे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

# भाजपाच्या जुन्या, नव्या कार्यकर्त्यांनी विजयासाठी एकदिलाने काम करावे

## माजी संघटन सरचिटणीस शंतनु दंडवते यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० नोव्हेंबर -**



कधी नव्हे ते एवढ्या मोठ्या संख्येने पंढरपूर नगरपरिषेच्या निवडणूकीत नगराध्यक्ष आणि बहुसंख्य नगरसेवक पदाचे उमेदवार प्रथमच भाजपाच्या कमळ चिन्हावर उभे आहेत. त्यामुळे भाजपाच्या जुन्या आणि नव्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आपले सर्व हेवेदावे बाजूला ठेवून भाजपाचे येथील नेते प्रशांत परिचारकांच्या नेतृत्वाखाली केवळ भाजपासाठी एकदिलाने काम करावे असे आवाहन येथील भाजपाचे माजी संघटन सरचिटणीस तसेच विद्यमान क्रियाशील नेते तथा उद्योगपती शंतनु दंडवते यांनी केले आहे.

यावेळी पत्रकारांशी बोलताना दंडवते म्हणाले, पक्ष मोठा व्हावा, त्याचा विस्तार व्हावा एवढेच नाही तर पक्षाची अगदी नगरपरिषदेपासून सर्वत्र सत्ता यावी हे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे स्वप्न असते. असेच स्वप्न भाजपाच्या स्थापने पासून येथे भाजपाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी पाहिलेले आहे. प्रत्यकाने त्याच्या कार्यकाळात पक्षवाढीसाठी तन,मन आणि धनाने प्रयत्न केलेले आहेत. मात्र आज पर्यंत येथील नगरपरिषदेच्या निवडणूकीत यंदा एवढ्या मोठ्या संख्येने उमेदवारांनी भाजपाच्या अधिकृत कमळ या चिन्हावर कधीही निवडणूका लढविल्या नाहीत. त्यामुळे भाजपा स्थापनेपासून पंढरपूरातील भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी पाहिलेले जे स्वप्न होते. ते स्वप्न यावेळी सत्यात उतरत आहे. कारण पंढरपूर नगरपरिषदेच्या गेल्या निवडणूकीमध्ये पाच नगरसेवकांनी भाजपाच्या कमळ या चिन्हावर निवडणूक लढवित होती. तर उर्वरित नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांनी प्रशांत परिचारक यांच्या पंढरपूर-मंगळवेढा विकास आघाडीच्या चिन्हावर निवडणूक लढविली होती. मात्र यंदा पुर्णपणे चित्र उलटे आहे. कारण या निवडणूकीत परिचारकांनी पुर्णपणे भाजपाचा झेंडा हाती घेतलेला आहे. त्यामुळे नगराध्यक्ष आणि ३२ नगरसेवक पदाचे उमेदवार भाजपाच्या कमळ चिन्हावर उभे केले असून केवळ चार नगरसेवक आपल्या शहर विकास आघाडीव्दारे निवडणूक लढवित आहेत. या निवडणूकीमध्ये भाजपाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शामल शिरसाट आणि भाजपा,मित्रपक्ष आणि स्थानिक आघाडीकडून निवडणूकीच्या मैदानातील सर्व नगरसेवकपदाचे उमेदवार मताधिक्यांनी विजयी होतील यात शंका नाही. येथील स्थानिक जुन्या, नव्या नेत्यांचे भाजपा पक्ष पंढरपूरात तळागाळापर्यंत नव्हे तर शेवटच्या माणसापर्यंत रुजविण्याचे जे स्वप्न पाहिलेले होते पहिल्यांदाच सत्यात उतरत असल्याचे सकारात्मक चित्र सध्या आकारास येताना दिसत आहे.

येथील जुन्या पदाधिकाऱ्यांनी कोणतेही हेवेदावे समोर आणू नयेत. उमेदवारी देताना उमेदवाराचा नागरिकांशी असलेला थेट संपर्क, केलेले काम, त्याची सामाजिक प्रतिष्ठा, आत्तापर्यंत त्याने केलेले काम, त्याचा येत्या काळातील करावयाच्या कामांचा अजेंडा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे निवडून येण्याची त्याची क्षमता आदी सर्वकष गोष्टींचा विचार केला जात असतो. त्यामुळे कोणताही गैरसमज करुन घेऊ नये. आपल्यातील हेव्यादाव्याने विरोधकांचा फायदा होईल अशी वक्तव्ये करु नये. मंगळवारी दि.२ डिसेंबर रोजी कार्यकर्त्यांनी आपसपल्या बुथवर थांबून मतदारांना मतदानासाठी केंद्रावर नेवुन मतदानाचा टक्का वाढवावे, असेही त्यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय सत्तेतील राष्ट्रवादीला महापालिकेत मिळणार का सत्ता?



## विधानसभेचे उपसभापती अण्णा बनसोडे यांच्या दौऱ्यानंतर वारे फिरण्याच्या चर्चांना जोर

## अबकी बार ७५ चा नारा ठरणार का खरा?

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर -**

विधानसभेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर शहर जिल्हा सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे हे तीन दिवस सोलापूर दौऱ्यावर होते. या दौऱ्याच्या निमित्ताने सोलापुरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा भक्कम पाया रचण्याची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बनसोडे यांच्या खांद्यावर सोपवली होती. अण्णा बनसोडे यांनी देखील आपले आजोळ आणि मनाच्या जवळ असणाऱ्या सोलापूरसाठी येणाऱ्या महापालिका निवडणुकीत जीवाचे रान करू आणि पालिकेत सत्ता मिळवू, अशी ग्वाही जरी दिली असती तरी, भाजपचा बालेकिल्ला बनलेल्या सोलापूर शहर जिल्ह्यात पुन्हा एकदा राष्ट्रवादीचा झेंडा फडकवणे वाटते तितके सोपे नाही. त्यामुळे राज्यस्तरीय सत्तेत असलेल्या राष्ट्रवादीला महापालिकेत सत्ता मिळणार का? अब की बार ७५ चा नारा खरा ठरणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

पूर्वापार परंपरेनुसार सोलापूर शहर जिल्हा हा काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून सुपरिचित आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून काँग्रेस आणि राष्ट्रवादीचा हा बालेकिल्ला ढासळत आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातील अनेक दिग्गज नेते पराभूत झाल्यानंतर भाजपच्या झेंड्याखाली डेरेदाखल झाले आहेत. तर काहींनी राजकारणापासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला असल्याने, सोलापूर शहर जिल्ह्यात भाजपचे वर्चस्व वाढत आहे. अनेक आजी-माजी आमदार, विद्यमान लोकप्रतिनिधी भाजपची वाट धरत आहेत. अशा परिस्थितीत सत्तेतील सहभागी असणारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट हा देखील गेल्या काही दिवसांपासून अस्वस्थ जाणवत आहे.

महायुतीमध्ये होत असलेले बेबनाव दस्तुरखुद्द केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यापर्यंत पोहोचले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वीच अमित शहा यांची दिल्लीत भेट घेऊन, आगामी निवडणुकासंदर्भात महायुतीमध्ये होत असलेल्या कुरघोडीचा पाढाच वाचून दाखवला. तर दुसरीकडे सत्तेतील दुसरा पक्ष अजित पवारांच्या राष्ट्रवादीला देखील याचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे महायुतीमधील अनेक घटक पक्ष आपापल्या ताकदीनुसार निवडणूक लढवण्याचा चंग बांधलेले दिसत आहेत. राष्ट्रवादीने पिंपरी चिंचवडचा हवाला देत, सोलापूर शहर हे पिंपरी-चिंचवडच्या धर्तीवर विकसित केले जाईल, असे ठोस आश्वासन अण्णा बनसोडे यांच्यामार्फत दिले आहे. त्यामुळेच अण्णा बनसोडे यांच्या दौऱ्यानंतर सोलापूर शहरातील वारे नक्कीच उलट दिशेने वाहतील, अशी आशा राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना लागलेली आहे.

राज्याची सत्ता भोगणाऱ्या तिन्ही पक्षांच्या उमेदवारांना आपल्याच घटक पक्षातील अनेक उमेदवारांशी आगामी महापालिका निवडणुकीत दोन हात करावे लागणार आहे. त्यामुळे अनेक नेते गेल्या अनेक दिवसांपासून तयारीला लागले आहेत. तर काही नेते पडद्यामागे गोळा बेरजेच्या राजकारणात व्यस्त असलेले दिसत आहेत. सोलापूर महापालिका निवडणुकीत गतवर्षी भाजप हा मोठा पक्ष म्हणून उदयास आला. त्यामुळे आपसूकच सत्तेच्या चाव्या भाजपकडे गेल्या. माजे महापौर स्व.महेश कोठे यांच्या कृपेमुळे उध्दवसेना विरोधी बाकावर राहिली. परंतु भाजपला या कार्यकाळात अनेक चढ-उतार पाहावे लागले. विकासाची ठोस कामे म्हणाव्या तितक्या प्रमाणात करता आली नाहीत. त्यामुळे सोलापूर शहरवासीय सत्ताधाऱ्यांवर नाराज असलेले विविध मुद्दयांवरुन दिसून आले.

नेमक्या याच शिदोरीवर विरोधी तसेच शिंदेसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी देखील भाजपची कोंडी करण्याचा प्रयत्न करत असताना दिसत आहेत. यंदाच्या निवडणुकीत हाच प्रश्न मुद्दयाचा विषय बनवत आहेत. अण्णा बनसोडे यांच्या दौऱ्यात गतपाच वर्षातील भाजपने केलेली विकास कामे कोणती? हाच प्रश्न वारंवार उपस्थित करण्यात आला.

विरोधक देखील हीच दुखती नस पकडत भाजपवर हल्लाबोल करत आहे. अशा परिस्थितीत मतदार आणि सोलापूरवासीय नेमके कोणत्या पक्षाच्या पारड्यात आपले मताचे वजन टाकून विजयी करतात? कोणत्या पक्षाचे मत विभाजन करून त्या पक्षाला घरी बसवतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### इलेक्टिव मेरिट आणि स्वबळाचा नारा

इलेक्टिव्ह मेरिटवर निवडणूक लढवण्यासाठी महाविकास आघाडीने प्रयत्न सुरु केला आहे. तर सत्ताधारी भाजप महायुतीने स्वबळाचा नारा देत आपल्या ताकदीवर निवडणूक लढवण्याचा चंग बांधला आहे. एकूणच महापालिकेवर आपल्या पक्षाचा झेंडा फडकवण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी मोट बांधण्यास सुरुवात केलेली दिसत आहे. त्यावरच महापालिका निवडणुकीची यशाची गुरुकिल्ली अवलंबून असणार आहे एवढे मात्र नक्की !

# जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुकीत भाजपचे २०० जागांचे टार्गेट!

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

अनगरच्या नगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीने बिनविरोध विजय मिळविला आहे; त्याच धर्तीवर जिल्ह्यातील जनतेच्या सहकार्याने राहिलेल्या ११ नगरपालिकांवरही भारतीय जनता पार्टीचाच नगराध्यक्ष आणि सदस्यपदांच्या २०० जागा पटकावणार असल्याचा आत्मविश्वास भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, चेतनसिंह केदार-सावंत यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केला. दरम्यान, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीचीही भाजपची तयारी पूर्ण झाल्याचाही निर्वाळा त्यांनी दिला.

पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी नवीन मेगा भरती करणे गरजेचे होते म्हणून अनेक नवे शिलेदार आम्ही पक्षात घेतले आहेत. याचा मोठा फायदा भाजपला होणार आहे. या प्रचारकाळात आमच्या पक्षाच्या उमेदवारांनी अक्षरशः पायाला भिंगरी लावून प्रचार केला. स्टार प्रचारकांच्याही सभा गाजल्या. इतर पक्षीय नेत्यांना भाजपच्या कामकाजाची पध्दत, पक्षशिस्त पटू लागल्याने अनेकांनी पक्षप्रवेश केला. इतकेच नाहीतर त्यांचे अनेक कार्यकर्तेही पक्षात आले आहेत.

## भाजपच्या दोन्ही जिल्हाध्यक्षांचा आत्मविश्वास





यामुळे पक्षाचे संघटन मजबूत तर झालेच मात्र याचा फायदा निवडणुकीतही होणार आहे. राज्याचे स्टार प्रचारक तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर नवीन प्रवेश दिले जात आहेत. त्याच धर्तीवर जिल्ह्याचे प्रवेश झाले आणि चालू आहेत. आम्ही जुन्या-नव्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून आणि योग्य त्या समन्वयातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत योग्य अशा कार्यकर्त्यांना उमेदवारी देत आहोत; त्यांचे राजकारणातील आजतागायत केलेल्या कामाची चाचपणी करूनच उमेदवारी फायनल केली आहे.

ज्या-त्या भागातील त्या कार्यकर्ते-पदाधिकाऱ्याचे वजन पाहूनच उमेदवारी देण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींनी घेतला आहे; आता या सर्वच उभारलेल्या उमेदवारांना निवडून आणण्याची जबाबदारी आमची आहे. यासाठी रात्रीचा दिवस आम्ही करणार आहोत. सध्या आमच्यापुढे सर्वच नगरपालिका ताब्यात घेण्याचे ध्येय आहे; आणि त्या ध्येयापर्यंत आम्ही जनतेच्या माध्यमातून जाणार आहोत.

आमचे स्टार प्रचारक जयाभाऊही फार परिश्रम घेत असल्याचे त्यांनी आवर्जुन सांगितले. आमचे सर्वच उमेदवार निवडून येणार आहेत, असे सांगायलाही शशिकांत चव्हाण चेतन केदार-सावंत हे विसरले नाहीत.

### जिल्ह्यात स्टार प्रचारकांनी गाजविल्या सभा

भाजपाने जिल्ह्यातील सर्वच नगरपालिकांत तगडे उमेदवार दिले आहेत. या उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री आशिष शेलार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ.गोपीचंद पडळकर यांच्यासह स्टार प्रचारक तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या जाहीर सभा झाल्या आणि याचा फायदा उमेदवारांना होणार आहे, असे भाजपाचे जिल्हाध्यक्षद्वय शशिकांत चव्हाण व चेतनसिंह केदार–सावंत यांनी सांगितले.

## कामाची चाचपणी करूनच उमेदवारी फायनल

## सर्वच नगरपालिका ताब्यात घेण्याचे ध्येय

### बहुतांश ठिकाणी महायुतीतील मित्रपक्षातच लढत

बहुतांश ठिकाणी महायुतीतील मित्रपक्षांमध्येच लढत होत आहे. त्यामुळे सत्ताधारी व विरोधी पक्ष दोन्हीही महायुतीतीलच राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे. भाजपने पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे अधिकार दिले आहेत तर शिंदेसेनेची जबाबदारी शहाजीबापू पाटील, जयवंतराव जगताप, सिद्धाराम म्हेत्रे, उत्तमप्रकाश खंदारे यांच्या खांद्यावर आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची जबाबदारी माजी आमदार संजयमामा शिंदे व जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या खांद्यावर आहे. काँग्रेसचा धुरा सध्या तरी खासदार प्रणिती शिंदे याच सांभाळत आहेत.

### ४ लाख ४३ हजार ४८४ मतदार करणार फैसला

सोलापूर जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ११ नगरपरिषदेसाठी अध्यक्षपदासाठी ६६ उमेदवार तर २७९ सदस्यपदासाठी ८९३ उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी १५२ प्रभागातील २ लाख २२ हजार २४७ महिला, २ लाख २१ हजार १४३ पुरूष आणि इतर मतदार ९४ असे ४ लाख ४३ हजार ४८४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. अनगर ही नगरपालिका अविरोध झाली असून, इतर ३ तालुक्यातही ३ सदस्य बिनविरोध निघाल्याने जिल्ह्यात २० सदस्य आणि १ नगराध्यक्षपदाची बिनविरोध निवड झाली आहे.

### शिंदेसेना, उध्दवसेनेचीही प्रचारात मुसंडी

जिल्हयातील नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात प्रमुख सहा पक्षांचे उमेदवार रिंगणात आहेत. त्यात सर्वाधिक उमेदवार भाजपकडून नशीब अजमावत आहेत तर दुसऱ्या स्थानी शिंदेसेना, उद्धवसेना आहे. तर राष्ट्रवादीचे अजितदादा गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कमीच उमेदवार दिल्याचे दिसून येत आहे. सांगोला वगळता इतर सर्व ठिकाणी नगराध्यक्ष पदासाठी भाजपचे उमेदवार 'कमळ' या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. दरम्यान, आता सत्ता कोणाला द्यायची? हे मात्र मतदार बांधवच ठरविणार आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## विदर्भातील गुणवंत सामाजिक कार्यकर्त्यांच्या सन्मानाची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३० नोव्हेंबर -**
महाराष्ट्र लोकविकास मंच या स्वयंसेवी संघटनेतर्फे २०२५ सालासाठी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विदर्भातील कर्तृत्ववान मान्यवरांची निवड जाहीर करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक कार्यात आयुष्य वाहिलेल्या व्यक्तींना मानपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा ३ डिसेंबर २०२५ रोजी, कै. मधुकर धस यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून दिलासा संस्था, घाटंजी (जि. यवतमाळ) येथे होणार आहे.

हा कार्यक्रम महाराष्ट्र लोकविकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ (अण्णा) तोडकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. तसेच संघटक रमाकांत कुलकर्णी, उपाध्यक्ष एम.एन. कोंडाळकर, तसेच विदर्भीय पुरस्कार संयोजन समितीतील विजया धस, रंजीत बोबडे, बंडू आंबटकर, संगीता गायकवाड उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन कोमल धस करणार असून, महाराष्ट्रातील सर्व सामाजिक कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे सचिव भूमिपुत्र वाघ यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

### नळदुर्ग पोलिसांची कारवाई : प्रतिबंधित गुटखा जप्त

**नळदुर्ग, दि.३० नोव्हेंबर -**
नळदुर्ग पोलिसांनी दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८ वाजता हंगरगा नळ (ता. तुळजापूर) येथे छापा टाकून राज्य शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आणि तत्सम तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले. या प्रकरणी अप्पू ऊर्फ बासु राठोड (रा. हंगरगा नळ) या व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस पथकाने विक्रीसाठी बाळगलेले विमल पान मसाला, डायरेक्टर पान मसाला, शॉट ९९९ गुटखा असा एकूण ६० हजार ६०० रूपये किमतीचा प्रतिबंधित माल जप्त केला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



### कळंब पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल

**कळंब, दि.३० नोव्हेंबर -**
दत्तनगर परिसरात किरकोळ कारणावरून तरुणाला मारहाण केल्याप्रकरणी एकावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी विजय हेमंत नाईकनवरे (वय २१ वर्षे, रा. दत्तनगर, कळंब) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री अंदाजे ९ वाजता, आरोपी अभिषेक शिवाजी भाकरे (रा. दत्तनगर, कळंब) याने 'दारातून गाडी घेऊन जाण्याच्या' कारणावरून फिर्यादीला शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्यांनी आणि काठीने मारहाण करून जखमी केले तसेच फिर्यादीला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी फिर्यादीने दि.२९ नोव्हेंबर रोजी कळंब पोलीस ठाण्यात दिलेल्या प्रथम खबरीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास कळंब पोलीस करत आहेत.



### होर्टी शिवारातून पाणबुडी मोटार चोरी

**नळदुर्ग, दि.३० नोव्हेंबर -**
होर्टी (ता. तुळजापूर) शिवारातील शेतातून अज्ञात चोरट्यांनी पाण्याची पंपमोटार चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अंकुश महादेव भोसले (वय ३०, रा. होर्टी) यांनी दिलेल्या माहितीनुसार, गट क्र. ४३६ मधील त्यांच्या शेतातील विहिरीत बसवलेली लाडा कंपनीची ५ एचपी क्षमतेची इलेक्ट्रिक पाणबुडी मोटार, किंमत सुमारे १० हजार रूपयांची अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. फिर्यादीच्या २९ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# नळदुर्ग निवडणूक शिगेला; कोण बाजी मारणार याकडे शहरवासियांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.३० नोव्हेंबर -**
नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीमुळे शहरातील राजकीय वातावरण अक्षरशः ढवळून निघाले आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी, मोठ्या नेत्यांच्या सभा, डिजिटल प्रचार आणि बहुरंगी राजकीय समिकरणांमुळे ही निवडणूक अतिशय रंगतदार बनली आहे. त्यामुळे शहराचा नगराध्यक्ष कोण होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

निवडणूक आता पूर्णपणे अंतिम टप्प्यात पोहोचली असून मुख्य चार आघाड्यांमध्ये थरारक संघर्ष पहायला मिळत आहे.

भाजप - शिवसेना (शिंदे गट) महायुती, काँग्रेस - शिवसेना (ठाकरे गट) युती, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट), एमआयएम या आघाड्या आहेत.

नगराध्यक्ष पदासाठीही चुरशीची लढत असून प्रमुख उमेदवार अशोक जगदाळे - काँग्रेस, बसवराज धरणे - भाजप, संजय बताले - राष्ट्रवादी, काँग्रेस (अजित पवार गट), शहेबाज काझी - एमआयएम या सर्वांमध्ये 'कांटेकी' लढत होत असून कोण विजयी ठरणार याचा अंदाज सध्या येत नाही. नळदुर्गमध्ये सर्व प्रमुख पक्षांचे मोठे नेते प्रचारासाठी दाखल झाले.



रॅली, पदयात्रा, प्रचार सभा आणि कॉर्नर सभांना नागरिकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत असल्याने सर्वच पक्षांचे उत्साह वाढला आहे. प्रत्येक पक्षाच्या प्रचार यंत्रणेत डिजिटल माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर होताना यंदा प्रथमच दिसत आहे.

प्रचार सभा आणि कॉर्नर सभांमध्ये उमेदवारांनी एकमेकांवर शाब्दिक हल्ले चढवले. काही ठिकाणी प्रचारासाठी आलेल्या नेत्यांनीही प्रतिस्पर्धी नेतृत्त्वावर खालच्या पातळीवर टीका केली.

### २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला निकाल

नळदुर्ग नगरपालिका निवडणूक आता केवळ दोन दिवसांवर आली आहे. दि. २ डिसेंबर मतदान, दि. ३ डिसेंबर मतमोजणी आहे. त्यामुळेच खऱ्या अर्थाने नळदुर्गचा पुढील नगराध्यक्ष कोण? आणि २० नगरसेवकांची नव्या पिढीची टीम कोण असणार? याचा फैसला ३ डिसेंबरलाच होणार आहे.

त्यामुळे या निवडणुकीतील प्रचाराची पातळी घसरल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

सर्वच पक्षांच्या रॅली आणि सभांना मिळणारा जंगी प्रतिसाद पाहता उमेदवारही चक्रावले आहेत. सध्याच्या परिस्थितीत कोणत्या पक्षाचा पलडा जड आहे, हे कोणालाच स्पष्टपणे सांगता येत नाही.

## मांजरा शुगर (कंचेश्वर) कारखान्याचा गाळप हंगाम जोमात

### शेतकऱ्यांना एफआरपीचा पहिला हप्ता खात्यात जमा

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.३० नोव्हेंबर -**
महाराष्ट्राचे माजी मंत्री तथा सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्याचा तिसरा गाळप हंगाम २०२५-२६ उत्साहात सुरू आहे. दि.२९ नोव्हेंबरपर्यंत कारखान्यात १,०३,४९० मेट्रीक टन उसाचे गाळप पूर्ण झाले आहे.



दि.१५ नोव्हेंबरपर्यंत गाळपास आलेल्या ऊसासाठी प्रति मेट्रीक टन २,७५० रुपये इतका एफआरपी पोटी पहिला हप्ता (१ डिसेंबर) शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याची माहिती कारखान्याकडून देण्यात आली.

सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस वेळेत गाळप करणे व पेमेंट वेळेवर अदा करणे ही परंपरा कारखान्याने कायम ठेवली आहे.

त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांकडून कारखान्यास ऊस पुरवठ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

मांजरा कारखान्याने १५ नोव्हेंबरपर्यंत गाळपास आलेल्या ऊसाचे प्रति मेट्रीक टन रु. २,७५० प्रमाणे एफआरपीचा पहिला हप्ता आज बँकेत वर्ग करण्यास सुरुवात केली आहे.

शेतकरी कारखाना यांचे अतूट नाते जपून कारखान्यास जास्तीत जास्त ऊस पुरवठा करण्याचे आवाहन जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी केले.

## बालदिनानिमित्त विविध स्पर्धा, विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
वडगाव सिद्धेश्वर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत अक्षरवेल महिला साहित्य मंडळातर्फे बालदिनानिमित्त नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. चित्रकला, निबंध व सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व प्रार्थनेने झाली. अध्यक्ष डॉ. सुलभा देशमुख, मुख्याध्यापिका ज्योती राऊत-कावरे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना साहित्यिक व मूल्याधिष्ठित मार्गदर्शन करण्यात आले. कथाकथन, कविता सादरीकरण यांना मुलांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

लहान व मोठ्या गटातील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके वितरीत करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरोजा पाटील यांनी तर आभार प्रदर्शन सुचिता शेलार यांनी केले. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

## तेरखेडा येथे लघुउद्योग भारतीची नवीन ईकाई स्थापीत; तय्यब दारुवाला अध्यक्षपदी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० नोव्हेंबर -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे (दि. २९ नोव्हेंबर) लघुउद्योग भारतीची नवीन ईकाई शाखा स्थापन करण्यात आली. या स्थापना कार्यक्रमाला मराठवाडा सहमंत्री निशांत होनमुटे, तसेच महाराष्ट्र प्रदेश सहमंत्री प्रवीण काळे आणि संजय देशमाने यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अशोक काळे होते.

कार्यक्रमाला गावाचे सरपंच दिलीप घोलप, लघुउद्योग भारती मराठवाडा अध्यक्ष पृथ्वीराज शहा, सचिव अविनाश देशपांडे, तसेच प्रदेश सहमंत्री प्रवीण काळे आणि सदस्य संजय देशमाने उपस्थित होते.

यावेळी तेरखेडा येथील ३२ उद्योजकांनी नोंदणी करून संघटनेची औपचारिक स्थापना करण्यात आली. नव्याने स्थापन झालेल्या लघुउद्योग भारती तेरखेडा शाखेच्या अध्यक्षपदी दादा फायर वर्क्सचे उद्योजक तय्यब दारूवाला यांची निवड करण्यात आली.

## खामसवाडी-मोहा रस्त्यावर अपघातांची मालिका; बांधकाम विभागाकडे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.३० नोव्हेंबर -**
कळंब तालुक्यातील खामसवाडी-मोहा रस्त्यावर अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून नागरिकांतून बांधकाम विभागाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

खामसवाडी व मोहा परिसरात ऊस गुळपिटी कारखाने असल्याने गोविंदपुर-मोहा मार्गासह मोहा-खामसवाडी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ऊस वाहतूक सुरू असते. तेरणा कारखाना (ढोकी), नॅचरल कारखाना (रांजणी), हावरगाव कारखाना आदी ठिकाणी जाणारी ट्रॅक्टर-ट्रॉली व अवजड वाहने याच मार्गावरून जात असल्याने रस्ता सतत वाहतूक दाबाखाली असतो.



गोविंदपुर-मोहा रस्त्याचे नुकतेच डांबरीकरण झाले असले तरी मोहा पासून पुढील तीन किमी रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण आहे. त्यामुळे वाहनचालकांना कसरत करत मार्ग काढावा लागत आहे. गोविंदपुर-खामसवाडी ते सिद्धिविनायक कारखाना रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले असले तरी रस्ता अत्यंत अरुंद आहे. अवजड वाहन जात असताना दुसऱ्या वाहनाला बाजू देणे कठीण होत असून अपघाताचे प्रमाण वाढत आहे.

दि. २८ च्या मध्यरात्री ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर बाजू देताना रस्त्यात आडवा झाला, चालकाने उडी मारून जीव वाचवला. याच अपघातात दुचाकीस्वार ट्रॅक्टरला धडकून गंभीर जखमी झाला असल्याचे समजते. काही महिन्यांपूर्वी गोविंदपुरजवळ पिकअप व दुचाकीच्या भीषण धडकेत एकाचा मृत्यू झाला होता.

खामसवाडी येथील साठे चौक अत्यंत धोकादायक झोन बनला आहे. येथे दुचाकीस्वार वाहनं रस्त्यामध्येच उभी करतात. बाहेरगावी जाणारे विद्यार्थी येथे गर्दी करतात. सिद्धिविनायक कारखान्याने चौकात एक सुरक्षा रक्षक नेमला असला तरी काही टवाळखोर त्याच्याशी अरेरावीने वागत असल्याचे निदर्शनास येत आहे.

दुर्लक्ष, अरुंद रस्ता आणि अवजड वाहतूक यामुळे या मार्गावर कधीही भीषण अपघात होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

या रस्त्याने प्रवास करणारे शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर व महिला जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. म्हणून कळंब बांधकाम विभागाने तातडीने रस्त्याचे रुंदीकरण व दुरुस्ती करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेवर युतीची सत्ता येणारच : आकांक्षा चौगुले



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० नोव्हेंबर -**
महायुती सरकारच्या काळात नळदुर्ग शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाल्याने आगामी निवडणुकीत नळदुर्ग नगरपालिकेवर युतीची सत्ता येणार हे निश्चित असल्याचे मत युवा सेनेच्या मराठवाडा निरीक्षक आकांक्षा चौगुले यांनी व्यक्त केले. प्रभाग क्र.२ मध्ये युतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर सभेत त्या बोलत होत्या.

नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक रंगतदार टप्प्यात असून सर्वच पक्षांचे तसेच अपक्ष उमेदवारांचा प्रचार जोरात सुरू आहे. दि.२ डिसेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. दि.२९ नोव्हेंबर रोजी प्रभाग क्र.२ मधील युतीचे उमेदवार शंकर वाघमारे व सुमन ठाकुर यांच्या प्रचारार्थ पदयात्रा आयोजित करण्यात आली. इंदिरानगर परिसरात काढलेल्या या पदयात्रेदरम्यान प्रत्येक घरापर्यंत जाऊन उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

यानंतर झालेल्या कॉर्नर सभेत आकांक्षा चौगुले म्हणाल्या की, या निवडणुकीत नळदुर्ग नगरपालिकेवर भाजप-शिवसेना (शिंदे गट) युतीचा झेंडा फडकणारच आहे. महायुती सरकारच्या काळात नळदुर्गमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. आजही अनेक कामे सुरू असून यातील विशेष पाणीपुरवठा योजना शहरासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

या सभेला भाजपचे जिल्हासरचिटणीस साहेबराव घुगे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष प्रतीक रोचकरी, शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बसवराज धरणे, माजी नगरसेवक विनायक अहंकारी, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

### महिला ताब्यात

**ढोकी, दि.३० नोव्हेंबर -**
अवैध मद्यविक्रीसाठी गावठी दारू बाळगल्याप्रकरणी रामवाडी येथील एका महिलेला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राणी पवार (वय २५) ही दि.२९ नोव्हेंबर रोजी रामवाडी ते भंडारवाडी रोडवरील पत्र्याच्या शेडसमोर ७० लिटर गावठी दारू अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचे आढळून आले.

## रूपामाता विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

### विद्यार्थ्यांना इतिहास, संस्कृती, शेती व सागरी जीवनाचा अभ्यासपूर्ण अनुभव



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व्यंकटराव गुंड यांच्या प्रेरणेने आणि रूपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश मनसुळे यांच्या मार्गदर्शनाने आयोजित शैक्षणिक सहल उत्साहात आणि शिस्तबद्धतेने पार पडली. सहल नियोजन समितीतील सर्व शिक्षकांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल, कृषीशास्त्र, समाजसुधारणा तसेच सागरी आणि सांस्कृतिक जीवनाचा प्रत्यक्ष परिचय मिळाला.

रयत शिक्षण संस्था (सातारा), महाबळेश्वर, प्रतापगड, रायगड, महाड, पालगड, महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे जन्मस्थान, मुरुड समुद्रकिनारा, हर्णे मच्छी मार्केट, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, पाली- महड गणपती, एकविरा देवी, कार्ला लेणी, शिरगाव मंदिर व देहु मंदिर विद्यार्थ्यांनी या सहलीत खालील प्रमुख स्थळांना भेट दिली

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा केंद्रात ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. महाबळेश्वरचे निसर्गसौंदर्य, प्रतापगड व रायगड येथील शिवकालीन इतिहास यांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे सत्याग्रहाचे ऐतिहासिक स्थान, तसेच पूज्य साने गुरुजींच्या स्मृती निवासाला भेट देऊन विद्यार्थ्यांनी 'खरा तो एकची धर्म' ही प्रार्थना सादर केली. स्त्री शिक्षणाचे प्रणेते भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनकार्याची उजळणी विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्मारकात केली. मुरुड समुद्रकिनारा तसेच हर्णे मच्छी मार्केट येथील भेटीद्वारे विद्यार्थ्यांनी सागरी जीवनशैली, मत्स्य व्यवसाय आणि किनारी भागातील अर्थव्यवस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण केले.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ भेट ही सहलीतील अत्यंत महत्त्वाची ठरली. पाली व महड गणपती, एकविरा आई, कार्ला लेणी, शिरगाव मंदिर आणि देहू मंदिर या स्थळांमधून विद्यार्थ्यांनी धार्मिक परंपरा, बौद्ध वास्तुकला आणि संत परंपरेचा वारसा जाणून घेतला.

सहल यशस्वीपणे पार पडण्यासाठी मुख्याध्यापक सुरेश मनसुळे, सहल प्रमुख बापू शेख, सचिन यादव, निमेश गावित, नागनाथ गोरे, प्रा. भीमराव जावळे, प्रा. सचिन सोनकटले, प्रा. श्रीमती गुंड, शिक्षकेतर कर्मचारी आर. बी. पवार व दयानंद थोरात यांनी काटेकोर नियोजन केले.

## जि.प.ची एकही शाळा बंद पडू देणार नाही : अनिल बारकुल

### मुख्याध्यापक बारकुल यांचा सेवेनिवृत्ती समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.३० नोव्हेंबर -**
येरमाळा येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अनिल बारकुल यांचा सेवा निवृत्ती समारंभ दि.२९ डिसेंबर रोजी शाळा प्रांगणात उत्साहात पार पडला. शिक्षक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, शैक्षणिक अधिकारी आणि विविध संघटनांचे मान्यवर यांच्या उपस्थितीमुळे परिसर गजबजून गेला होता.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संभाजीराव थोरात होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाळकृष्ण तांबारे, संतोष देशपांडे, सोमनाथ टकले, धर्मराज काळमाते, प्रशांत घुटे, संतोष माळी, संभाजीराव जगदाळे, सोमनाथ चंदनशिव, कैलास दहातोंडे, सुहास हजारे, डॉ. संदीप तांबारे, तसेच मा. पं.स. सभापती विकास बारकुल, सरपंच प्रिया बारकुल, उपसरपंच गणेश बारकुल आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिक्षण व्यवस्थेतील अनेक मुद्द्यांवर भाष्य करत थोरात म्हणाले, राज्यातील जिल्हा परिषदेची एकही शाळा बंद पडू देणार नाही. शासनाने शाळा बंद करण्याचे धोरण राबवले, तर शिक्षक संघटना रस्त्यावर उतरून मोठा लढा उभारेल असे त्यांनी सांगितले.




समारंभात मान्यवरांनी बारकुल सरांच्या आडोतीस वर्षांच्या कर्तृत्वपूर्ण सेवाप्रवासाचा आढावा घेत प्रशंसोद्गार काढले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी राबवलेले उपक्रम, शिस्तप्रिय कार्यपद्धती आणि शाळेच्या प्रगतीसाठी दाखवलेले समर्पण याची उपस्थितांनी प्रशंसा केली.

शाळेच्या वतीने त्यांना शाल, श्रीफळ, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी आणि सहकारी शिक्षकांनी त्यांच्या आठवणी उजाळताना वातावरण भावूक झाले. उत्तरपर भाषणात बारकुल म्हणाले, शिक्षक म्हणून केलेली सेवा ही माझ्या आयुष्याची मोठी कमाई आहे. मिळालेला सन्मान पुढील आयुष्याचा प्रेरणादायी ठेवा ठरेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिवाणे, सूत्रसंचालन प्रशांत जाधवर आणि प्रशांत घूटे यांनी केले. समारंभाचे आयोजन कळंब तालुका शिक्षक संघ, सहकारी शिक्षक आणि रिंकल मित्र मंडळ यांच्या सहकार्याने करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अहमदपूर शहरात पोलिसांचे 'शांतता मार्च'!

## नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे पथसंचलन



**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३० नोव्हेंबर :** अहमदपूर नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि मतदारांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी अहमदपूर पोलिसांच्या वतीने पथसंचलन करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अहमदपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांच्या नेतृत्वात हे संचलन पार पडले.

अहमदपूर पोलिसांनी संपूर्ण शहरातून संचलन करत निवडणुकीच्या काळात शांतता राखण्याचे आवाहन केले. या संचलनाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरून झाली. त्यानंतर सावरकर चौक, किनगावकर हॉस्पिटल, भाग्यनगर, मोंढा चौक, काळेगाव रोड, हिना चौक, हनुमान मंदिर, आझाद चौक या प्रमुख मार्गांवरून हे संचलन पुढे सरकले.

पथसंचलनाची सांगता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आली. या ठिकाणी पोलिसांनी दंगा काबू योजनेचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले. निवडणुकीदरम्यान कोणताही तणावपूर्ण किंवा अनुचित प्रसंग उद्भवल्यास परिस्थिती त्वरित कशी हाताळायची, याची तयारी या प्रात्यक्षिकातून दर्शविण्यात आली. या महत्त्वपूर्ण प्रात्यक्षिकानंतर संचलनाची यशस्वी सांगता झाली. नगरपालिकेसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, मतमोजणी व निकाल ३ डिसेंबर रोजी घोषित करण्यात येणार आहे. या संवेदनशील काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

या पथसंचलनात पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि होमगार्ड यांनी मोठा सहभाग नोंदवला. यात सहायक पोलीस निरीक्षक केदासे, पोलीस उपनिरीक्षक स्मिता जाधव, पोलीस हेड कॉन्स्टेबल सुकेश केंद्रे यांच्यासह अन्य पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड सहभागी होते.

# औसेकर विकासासोबतच राहणार : पाटील

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, ३० नोव्हेंबर :** औसा शहरात १०० खाटांचे अत्याधुनिक पाचमजली उपजिल्हा रुग्णालय उभारून अभिमन्यू पवार यांनी आरोग्य सुविधेत ऐतिहासिक वाढ केली आहे. त्याचबरोबर तालुक्यात शेतरस्त्यांचे विस्तृत जाळे विणले आहे. शहरातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना अशी अनेक विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे मत मागण्याचा नैतिक व विकासाधिष्ठित अधिकार आमच्याकडे अधिक आहे.असे मत माजी मंत्री व भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी भाजप-शिवसेना-रिपाई महायुतीच्या अधिकृत उमेदवार डॉ. ज्योती महादेव बनसुडे यांच्या प्रचारार्थ सभेत व्यक्त केले.

जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील म्हणाले, विकासातूनच औशाची स्वतंत्र ओळख राज्यात निर्माण झाली आहे.त्यामुळे ही निवडणूक विकासाची आहे. विरोधकांनी आरोप-प्रत्यारोप न करता आपण पदावर असताना लोकांसाठी कोणती कामे केली, यावर बोलावे. आम्ही विकासाची कामे मांडतो तेव्हा लोक आम्हाला पुन्हा पुन्हा संधी देतात.

आमदार अभिमन्यू पवार यांनी आपल्या पदाला खऱ्या अर्थाने न्याय देत मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधा आणि विकासनिधीतून प्रकल्प उभारले. त्यामुळे औसा आज झपाट्याने प्रगती करत आहे. औसेकर नेहमीच विकासाच्या बाजूने उभे राहिले आहेत आणि या निवडणुकीतही उभे राहतील, असा ठाम विश्वास माजी मंत्री बसवराज पाटील यांनी व्यक्त केला. महायुतीचे उमेदवार नगरपरिषदेत निवडून आल्यास यापेक्षाही मोठी विकासकामे उभी राहतील, असे त्यांनी यावेळी सांगितले. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योती बनसुडे, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**शहराच्या विकासाला वेग देण्यासाठी संधी द्या : आ. पवार**

विरोधकांकडे विकासावर बोलण्यासारखा एकही मुद्दा नाही. यामुळे निवडणूक जातीवर खेचण्याचा प्रयत्न करत आहेत. मतदारांची दिशाभूल करण्यासाठी आमिषे दाखवून त्यांना गोंधळवण्याचे काम विरोधकांकडून सुरू आहे. मात्र औशाची जनता सुजाण आहे आणि ती विकासालाच साथ देईल, जातिभेदाचे राजकारण जनता कधीच स्वीकारणार नाही. तुम्ही मला आमदार म्हणून सहा वर्षांपूर्वी संधी दिली आणि मी त्या काळात तालुक्याचा कायापालट केला.याचप्रमाणे शहराच्या विकासाला वेग देण्यासाठी संधी द्या आसे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी केले.

# उदयगिरी महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा



**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० नोव्हेंबर :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. गुणानुक्रमे मुंडकर अपेक्षा दत्तात्रेय यांनी प्रथम, केंद्रे नेहा विष्णू यांनी द्वितीय, तर आदित्य अनिल सोमवंशी यांनी तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. विजेत्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के आणि दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश लांडगे यांच्या हस्ते संविधानाच्या उद्देशपत्रिकेची प्रत देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ. गौरव जेवळीकर यांनी केले. यावेळी प्रा. स्वामी फुलवळकर, प्रा. संजय बिबीनवरे तसेच प्राध्यापक उपस्थित होते.

# महावितरणच्या कारभाराविरोधात रयत क्रांती'चे हलगी आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३० नोव्हेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुका विज मंडळ कार्यालयातील झोपेचे सोंग घेतलेल्या कर्मचाऱ्यांना जागे करण्यासाठी रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिवाजीराव समर्थ पेटे यांच्या नेतृत्वाखाली तालुका कार्यालयासमोर प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराच्या विरोधात उलटी हालगी वाजवून तब्बल तीन तास आंदोलन करण्यात आले.

तालुका विज मंडळ कार्यालयाकडून तालुक्यातील येरोळ, लक्कडजवळगा, हिप्पळगाव, आरी, रापका, उमरदरा, थेरगाव,साकोळ, तळेगाव, कानेगाव सह सर्व गावांमध्ये घरगुती विज वापर करणाऱ्या ग्राहकांना विनाकारण ग्राहकाची




आर्थिक लुट करण्याचा चंग विजमंडळाने बांधला असून घरगुती ग्राहकांना आवरेज विज बिल देणे,विज मीटर सुरुळीत चालू असताना फॉल्टी आहे म्हणून नवीन स्मार्ट विज मीटर बसवून ग्राहकांना अधिकचे विज बिल देऊन बेसुमार लुट केली जात आहे. यामुळे सर्व सामान्य ग्राहक मेटाकुटीला आला आहे. विज मंडळाकडून मागील चार महिन्यांपासून अधिकचे आवरेज दिलेले विज बिल रद्द करावे,व स्मार्ट विज मीटर बसवलेले काढून घेऊन जावे,विज आकार ४रु२८ पैसे पर युनिट असताना अगाऊ चार्जेस लाऊन करण्यात आलेली लुट थांबवावे.या व इतर मागण्या आंदोलकाकडून मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले आसता या आंदोलनाला विज मंडळाचे उपअभियंता मुजाहिद सिद्दीकीने आंदोलक ग्राहकांना आंदोलन मागे घेण्याची विनंती करित लेखी पत्रातून मागण्याची पुर्तता करण्याची हमी दिले.

दिलेल्या पत्रात नुमुद केले आहे की, स्मार्ट विज मीटर वरिष्ठांना कळवून काढून घेण्याची कार्यवाही करु,चार महिन्यांपासूनचे आवरेज बिल दिले ती जवाबदारी महावितरणची असून ते बिल रद्द करुन दिले जाईल. यापुढे स्मार्ट मीटर बसविणे थांबविण्यात येईल असे लेखी दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

यावेळी आंदोलनात सहभागी हणमंत चामले, विनोद कुंभार, गोविंद मादळे,बालाजी कुंभार,बालाजी पांचाळ, माधव झरकर, संदीपान भांगे,महादेव लिंबापुरे, रामदास गायकवाड, अण्णाराव जाधव, रामदास पेटे यांच्या सह शेकडो विज ग्राहक नागरिक उपस्थित होते.



# होंडाळा खंडोबा यात्रेत जंगी कुस्त्यांचा थरार

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३० नोव्हेंबर :** येथुन जवळच असलेल्या होंडाळा येथील खंडोबा देवाच्या यात्रेच्या निमित्ताने जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेनिमित्त कुस्त्यांचे आयोजन समस्त गावकरी करतात. पहिली कुस्ती ५० रुपये ते शेवटची कुस्ती ५ हजार १५१ रुपयांची झाली. या कुस्तीच्या मैदानात अनेक गावचे पैलवान उतरले होते. यात परभणी, नांदेड, लातूर, हिंगोली, बीड, धाराशिव, संभाजीनगर, सातारा, सांगली या जिल्ह्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्यातील पैलवान उतरले होते.

अनेक पैलवान जिंकून आपल्या गुरुला नमण करून आनंदोत्सव साजरा करत होते. तर तुरळकच पैलवानांना बोरोबरीत कुस्ती सोडण्याचा निर्णय पंचांनी घेतल्यामुळे प्रेक्षकांच्या नाराजीच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळत होत्या. शेवटची कुस्ती लातूर जिल्ह्यातील नळेगाव येथील पै.अयुब शेख यांनी परभणी येथील रमेश तुडमे यांना चित्तपट करून पाच हजार एकशे एकावन्न रुपयांची कुस्ती खेळुन जिंकली. त्यामुळे होंडाळा नगरीचे सरपंच उमाकांत येंडे, उपसरपंच संदीप सुर्यवंशी, दिगांबर सोनटक्के, कल्याण सुर्यवंशी, गोलंदाज सोनकांबळे, बाबुराव फसमल्ले, शिवा महाराज सांगवीकर, शिवाजी पाटील, नामदेव गुडमे यांनी यथोचित सन्मान देवून पै. अयुब शेख याचा सत्कार करण्यात आला. यांच्या सहकार्याला रामराव कोंडामंगले, भगवान सोनटक्के, बसवेश्र्वर पाटील, बालाजी कोंडामंगले, भाजपा शाखा अध्यक्ष रमाकांत चाकोरे सह इत्यादी कुस्ती प्रेमींनी परिश्रम घेवून कुस्त्यांचे आयोजन केले होते.

# शिरूर अनंतपाळ तहसीलमध्ये संविधान दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३० नोव्हेंबर :** दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी शिरूर अनंतपाळ तहसील परिसरात तालुका विधायक कृती समितीच्या वतीने संविधान दिन उत्साहात आणि शिस्तबद्धपणे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका विधायक कृती समितीचे अध्यक्ष प्रा. राम काकडे होते. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक रमेश सोनवणे यांनी करताना संविधानाचे महत्व, त्याची आजच्या काळातील गरज आणि त्यातील मूलभूत तत्त्वांचा उहापोह केला. प्रा. राम काकडे यांनी संविधानावर सविस्तर प्रकाश टाकला.कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांमध्ये हिपळगावचे सरपंच ज्ञानोबा माऊली, पत्रकार रहीम पाटील, माजी सभापती उद्धव जाधव, उत्तम कदम, निवृत्ती सूर्यवंशी, माधव कुंडे, नागनाथ कांबळे, उजेड, सुभाष कांबळे, सचिन गायकवाड आदींचा समावेश होता.

# कलापंढरीच्या वतीने बालकांची अभ्यास सहल

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, २९ नोव्हेंबर :** बालकांना बाल संरक्षण यंत्रणाची माहीती व्हावी तसेच विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य माहीती व्हावे तसेच विज्ञान ही एक चळवळ असल्याची जाणिव व्हावी म्हणून कलापंढरी सामाजीक संस्थेच्या वतीने बालकांची जिल्हा स्तरीय अभ्यास सहलीचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष बी पी सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८ नोव्हेंबर रोजी लातूर येथील विधीसेवा प्राधिकरण, बालकल्याण समिती, बालन्याय मंडळ आणि स्टेम एज्यूकेशन सेंटरला या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते.

या वेळी अनेक जणांना विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडून मोफत कायदेशीर मदत मिळते या मध्ये स्त्री, पुरुष, बालक, दिव्यांग व्यक्ती, तस्करीचा बळी, कैदी, अनूसुचीत जातीचा, अनुसुचित जमातीचा, औद्योगीक



कामगार, आपत्ती, जातीय किंवा अनुसुचित जमातीचा सदस्य आदी या विधिसेवा प्राधिकरणाकडून मिळत मिळवू शकतात अशी माहीती दिली.

या नंतर विज्ञान प्रयोग शाळेला भेट देऊन ग्रह, उपग्रह, तारे, तारांगण आदी विषयी सविस्तर माहीती करुन घेतली. विशेषता: या प्रयोग शाळेत आकाशीतील चंद्राविषयी सविस्तर माहीती घेतली. विज्ञानाची चळवळ ही सर्वांपर्यंत गेली पाहीजेत आणि त्याचा उपयोग विशेषतः विद्यार्थांना व्हावा म्हणून ही या ठिकाणी प्रयोग शाळेची पहाणी करुन सविस्तर माहीती प्रयोग शाळेतील तानाजी कदम यांनी विद्यार्थांनी दिली. बालकल्याण समितीच्या सदस्या स्वाती तोडकरी यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या जिल्हा स्तरीय अभ्यास सहलीसाठी पानगाव,बिटरगाव, वडवळ, नांदगाव आदी सह अनेक गावांतील किशोर व किशोरी सहभागी झाल्या होत्या. यशस्वीतेसाठी मंगल मगर, सुनैना ठाकूर, जयवंत जंगापल्ले, धनराज पवार, मधुकर गालफाडे, फरहाना शेख, सुप्रिया रामदासी, सोनी ढेंपे, संध्याराणी गालफाडे आदींनी परीश्रम घेतले.

# शिवलिंगेश्वर फार्मसीचे संशोधन स्पर्धेत यश


**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, ३० नोव्हेंबर :** औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसी व फार्म. डी च्या विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ आयोजित विद्यापीठस्तरीय विद्यार्थी संशोधन अधिवेशन अन्वेषण संशोधन प्रकल्पात सहभाग नोंदवुन प्रभावीपणे सादरीकरण केले.त्यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले आहे. स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. डॉ. अशोक महाजन नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, डॉ. एस.एस. पेक्कमवार, डॉ. एच.एस. फडेवार, डॉ. वसंत वाघ, डॉ. बाबुराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. भारतीय विद्यापीठाच्या वतीने देशभर राबविण्यात येणारा अन्वेषण उपक्रम विद्यार्थ्यामध्ये संशोधन संस्कृती जोपासण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असल्याचे मत कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले. शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या विशाल वाडेकर, अचल मुलगीर, गौतम दुर्गम, सोफिया पठाण, अस्मिता इंगळे, गायत्री वाघमारे, साक्षी चामे, संजीवनी फुले, मयुरी थोटे, संजना गुप्ता, अजीज बागवान या विद्यार्थीनी संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण करुन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले.

# लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० नोव्हेंबर :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील खेळाडुंची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.महाराष्ट्र खो - खो असोसिएशनची ५१ वी कुमार - मुली राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा बुऱ्हाणनगर जि.अहिल्यानगर येथे दिनांक ४ ते ७ डिसेंबर २०२५ या कालावधीत संपन्न होणार आहे. या स्पर्धेत लातूर जिल्हा खो-खो असोसिएशनचा संघ सहभागी होणार आहे. त्यापूर्वी



लातूर येथे लातूर जिल्ह्याची निवड चाचणी घेण्यात आली असून या निवड चाचणीमध्ये लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील कु.भाग्यश्री निलेवाड चि.नागेश जंगमवाड, चि.वेदांत येनगे यांची निवड झाली आहे.

या खेळाडुंना क्रीडाशिक्षक संतोष कोले यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

या यशस्वी खेळाडुंचे स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह शंकरराव लासूणे शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार किरण नेमट माधव मठवाले यांसहित सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# महापरिनिर्वाण दिनी पानगावात उसळणार भीम अनुयायांचा जनसागर!

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० नोव्हेंबर :** पानगाव ता. रेणापुर जिल्हा लातुर येथे बौद्ध अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी कलशाला अभिवादन करण्याकरिता दर ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी मराठवाडयासह सिमावर्ती आंध्र प्रदेश, तेंलगना, कर्नाटक भागातुन लाखों आंबेडकरी आनुयांयी अभिवादनाकरिता येत असतात येणाऱ्या अनुयांयीची संख्या दरवर्षी वाढत जात असल्याने येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टच्या वतीने येणाऱ्या अनुयांयीची अभिवादनाची गैरसोय होऊ नये म्हणून जय्यत तयारी केली असुन विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

६ डिसेंबर १९५६ रोजी बहुजणांचे मुक्ती दाते महामानव पं.पु.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाले.आंबेडकरी अनुयांयीसह सारा देश शोकसागरात बुडाला. बाबासाहेबांच्या निर्वाणाची बातमी आकाशवाणी रेडीओ वरून प्रसारीत करण्यात आली. ही दुखःद बातमी पानगांव ता.रेणापूर जि.लातूर येथील

लिंबाजी आचार्य, दगडू आचार्य, प्रभाकर आचार्य, किशन आचार्य, वैजनाथ आचार्य, सुर्यभान आचार्य, यादव आचार्य यांना कळताच बाबासाहेबाचे अंतिम दर्शन घेण्या करिता मुंबईला गेले होते. येताना त्यांनी तेथील अस्थी पानगांवात आणल्या त्याच अस्थीनां अभिवादन करण्यासाठी दर ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी




लांखो आनुयांयी उपस्थित रहातात. येणाऱ्या अनुयांयीची गैरसोय होऊ नये म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टच्या वतीने जय्यत तयारी केली गेली आहे. त्याचप्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे. दि.६ डिसेंबर रोजीच्या ००.०१ मिनिटाला अस्थी कलशास पुष्पचक्र अर्पन (भंदत डॉ.उपगुप्त महाथेरो, भंदत पय्यानंद थेरो हे सामुहिक पंचशिल-त्रिशरण, बुद्धवंदना घेवुन अभिवादनाची सुरवात करतील.) मा. मिनाताई मोटाडे (सरपंच पानगाव) यांच्या हस्ते सकाळी १०.०० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे ध्वजारोहन (निळा ध्वज अर्ध्यावर) करण्यात येईल. प्रशांत थोरात (रेणापुर तहसीलदार) यांच्या हस्ते सकाळी १०.४० वाजता डॉ.आंबेडकर नगरात असलेल्या अस्थी कलशा जवळ ध्वजारोहन पार पडणार आहे.

दुपारी अस्थी स्थळावरूनच भिक्कू संघ धम्म देसना देणार आहेत. रात्री ९.०० वाजता अस्थी स्थळी परिसरातील विविध कला संचाचा भिम गितांचा कार्यक्रम होणार असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टचे भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो (अध्यक्ष) भदंत पय्यानंद थेरो, आबासाहेब चव्हाण, व्ही.बी. आचार्य (सचिव), एन. एल. आचार्य (उपाध्यक्ष), सुर्यभान आचार्य (अस्थी आणणारे) डी. एन. आचार्य (सहसचिव), पी. आर. रोडे (सहसचिव), के. ई. हरीदास, आयु. डि.बी. आचार्य, सुभाष आचार्य, गोरोबा आचार्य, जे.सी. पानगांवकर, किशोर आचार्य, नागनाथ चव्हाण, विष्णु आचार्य, पंडीत आचार्य, आयु. सुकेश भंडारे, गौतम आचार्य, क्षितीज रोडे, तुकाराम कांबळे, रमेश तिगोटे, नारायण आचार्य, रत्नराज आचार्य, रणजित आचार्य, महेंदकुमार आचार्य, विश्वजीत आचार्य, आण्णाराव आचार्य, किसन चव्हाण, भानुदास आचार्य, तुकाराम कांबळे, आयु. राजकुमार साळवे, गौतम गोडबोले, सत्यशिला आचार्य, प्रजावती आचार्य यांनी कळविले आहे.

# धरण विरोधकांनी निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम बंद पाडले; कामावरील वाहनांवर दगडफेक

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ३० नोव्हेंबर-**

मराठवाडा-विदर्भाच्या सिमेवरुन वाहणाऱ्या पैनगंगा नदीवर होऊ घातलेल्या निम्न पैनगंगा प्रकल्प ऊर्फ चिमटा धरणाचे सुरू असलेले काम आज शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या घाटंजी तालुक्यातील खडका येथील प्रकल्प स्थळी हजारोच्या संख्येने एकवटलेल्या धरण विरोधकांनी प्रशासनाला दिलेल्या अल्टीमेटमप्रमाणे पुन्हाएकदा बंद पाडले.





तब्बल २९ वर्षांपासून प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांसह विस्थापित होणाऱ्या नागरिकांचा धरण विरोधी संघर्ष समितीच्या दिमतीने सुरू असलेला प्रचंड विरोधाचा लढा आता शिगेला पोहचला असून,प्राण जाए पर,जमिन न जाए! अशा ठाम निर्धाराने जान की बाजी लावण्यापर्यंत धरणाला विरोध वाढला असल्याचे आजच्या धरणविरोधकांच्या आक्रमकतेवरुन दिसून येत आहे.

निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने दिनांक २४ नोव्हेंबर सोमवार रोजी प्रकल्याचे सुरू असलेले काम बंद करण्याबाबत रीतसर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, कार्यकारी अभियंता, पोलीस स्टेशन पारवा, पोलीस स्टेशन मांडवी यांना लिखित निवेदन देऊन काम बंद करण्याची विनंती केली होती. मात्र पाटबंधारे विभागाने काम बंद न केल्यामुळे दिनांक २९ नोव्हेंबर शनिवारला निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या प्रकल्प स्थळी धरण विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने काम बंद आंदोलन करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने जमा झाले असता अशाही परिस्थितीत धरणाचे काम सुरूच असल्यामुळे प्रकल्पग्रस्त प्रचंड संतप्त झाले. त्यांनी कामावर असलेल्या जेसीबी व टिप्परच्या काचा फोडल्या व त्या वाहनांवर तुफान दगडफेक केली.

दि.२८ नोव्हेंबरला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे यवतमाळ येथे आले असता धरण विरोधी समितीच्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा केली असता त्यांनी मी आर्णी व किनवट विधानसभा प्रचारा दरम्यान प्रकल्पाबाबत जे आश्वासन दिले होते त्यावर मी कायम आहे! असे सांगितले.

शनिवारी पोलीस बंदोबस्तात कार्यकारी जलसंपदा विभाग, यवतमाळ अभियंता सुरज राठोड,अनिकेत गुल्हाने, टेमरे या अधीकाकाऱ्यांसोबत चर्चा झाली. त्यांनी काम बंद करण्याचे आश्वासनही दिले. परंतु, कायमस्वरूपी काम बंद करण्याचे आश्वासन लेखी स्वरूपात देण्यास असमर्थता दर्शविल्याने मोठ्या संख्येने उपस्थित प्रकल्पग्रस्त ज्या ठिकाणी काम चालू होते तेथे गेले.त्यातील काहींनी नंबर नसलेल्या टिप्परचे काचा फोडल्या व उभ्या वाहनांवर तुफान दगडफेक केली.

त्यानंतर जोपर्यत प्रकल्प स्थळावरून उभ्या असलेल्या जेसीबी व टिप्पर हलविण्यात येणार नाहीत तोपर्यंत आम्ही येथेच ठिय्या मांडू असा आक्रमक पवित्रा धरण विरोधी लोकांनी घेतल्यामुळे पोलीसांनी कामावरील सर्व वाहने पोलिस बंदोबस्तात प्रकल्प स्थळावरून हलविल्यानंतर आंदोलक आपापल्या गावाकडे परतले.

आजच्या आंदोलनात विदर्भ मराठवाडयातील चार ते पाच हजार महिला पुरुष मंडळी धरणाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी जमा झाले होते.आजच्या आंदोलनात धरण विरोधी संघर्ष समितीचे प्रल्हाद पाटील जगताप, मुबारक तंवर, बंडुसिंग नाईक, विजय पाटील राऊत, प्रल्हादराव गावंडे सर, बंटी पाटील जोमदे, जयराम मिश्रा, गजानन डाखोरे,

डॉ.बाबा डाखोरे,गुलाब मेश्राम,विजय पाझारे, शंकर सिडाम यासह हजारो प्रकल्पग्रस्त शेतकरी, धरण विरोधक उपस्थित होते.

आता आजच्या या धरणविरोधकांच्या आक्रमक पवित्र्यापुढे काहिसे नरमलेले प्रशासन पुढे काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, प्रचंड कडाक्याच्या थंडीतही चिमटा धरणावरुन प्रशासनाच्या विरोधातील धरण विरोधी संघर्ष समितीच्या गरमागरमीमुळे प्रकल्प क्षेत्रातील वातावरण चांगलेच तापले असल्याचे दिसून येत आहे.

## स्वारातीम विद्यापीठाच्या १ व २ डिसेंबरच्या परीक्षा रद्द

**नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या हिवाळी-२०२५ परीक्षांना ११ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली आहे. दरम्यान, दि. २ डिसेंबर रोजी नगरपरिषद व नगरपंचायत सार्वजनिक निवडणुकीसाठी मतदान होत असल्याने आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या काही महाविद्यालयांचा मतदान केंद्र म्हणून वापर होत असल्यामुळे दि. १ डिसेंबर व २ डिसेंबर २०२५ रोजी नियोजित परीक्षा रद्द करण्यात आल्याची माहिती परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे यांनी दिली. रद्द झालेल्या परीक्षा संबंधित अभ्यासक्रमाच्या शेवटच्या दिवशी आयोजित करण्यात येणार असून याबाबत सर्व विद्यार्थ्यांनी अद्ययावत वेळापत्रकाची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, तसेच ही सूचना सर्व संबंधित विद्यार्थी, प्राध्यापक आणि महाविद्यालयांपर्यंत पोहोचवावी, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## कार्यक्रम अधिकारी विश्वास वाघमारे यांना पदोन्नती

**नांदेड** - आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रमाधिकारी विश्वास वाघमारे आणि प्रसारण अधिकारी राहुल आत्राम यांची नुकतीच पदोन्नती झाली असून वाघमारे यांची सहाय्यक निदेशक म्हणून तर राहुल आत्राम यांची कार्यक्रम अधिकारी म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. नांदेड आकाशवाणी केंद्र येथे २०१५ मध्ये कार्यक्रम अधिकारी म्हणून रुजू झालेले विश्वास वाघमारे हे गेल्या दहा वर्षापासून माहिती , मनोरंजन आणि शिक्षण ही त्रिसूत्री घेऊन आकाशवाणी केंद्राच्या माध्यमातून श्रोत्यांची सेवा केली आहे तर याचवेळी २००९ मध्ये नांदेड आकाशवाणी केंद्रात प्रसारण अधिकारी म्हणून रुजू झालेले राहुल आत्राम यांनीही आकाशवाणी मध्ये भरीव असे योगदान दिले आहे. सर्वच कार्यक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेणाऱ्या आत्राम यांनी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमही राहुल आहेत . दोन्ही अधिकाऱ्यांची नुकतीच पदोन्नती करण्यात आली आहे. प्रसार भारती महानिदेशालय आकाशवाणी दिल्ली यांनी या पदोन्नत्या केल्या असून कार्यक्रमाधिकारी विश्वास वाघमारे यांची सहाय्यक निदेशक म्हणून तर प्रसारन अधिकारी राहुल आत्राम यांना कार्यक्रम अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे . पदोन्नती मिळालयाबदल दोन्ही अधिकाऱ्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आणि आकाशवाणी नांदेड केंद्रातील नैमित्तिक निवेदकांनी स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान नांदेड आकाशवाणी केंद्राचे नैतिक उद्घोषक मिलिंद व्यवहारे, प्रदीप भद्रे, मधुकर गजभारे, आनंद गोडबोले ,शेख हसीना ,शेख अहमद, नम्रता वावळे , जीवक खंदारे , राम तरटे, दिनेश कवडे , किरण टेकाळे आदींनी दोन्ही अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.



## मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड** -जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूकीच्या मतदानाच्या दिवस मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी सर्व मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जिल्हादंडाधिकारी राहूल कर्डिले यांनी निर्गमीत केले आहेत. या नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणूक मतदानाच्या दिवशी २ डिसेंबर रोजी मतदान सुरु झाल्यापासून ते मतदान संपेपर्यन्त हा आदेश अंमलात राहणार आहे. नांदेड जिल्ह्यातील नगरपरिषद/ नगरपंचायत-बिलोली, देगलुर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर, कंधार, कुंडलवाडी, मुदखेड, मुखेड, उमरी, भोकर, किनवट, लोहा या निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी ज्या ठिकाणी मतदान होणार आहे त्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, निवडणुकीच्या कामाव्यतीरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूकीच्या कामाव्यतीरीक्त व्यक्तीस प्रवेश करण्याकरीता मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

## गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपींनाअटक

**नांदेड** -अर्धापूर तालुक्यातील दाभड येथील आकाश साहेबराव सूर्यवंशी व तरोडा नाका नांदेड येथील राजेश उर्फ राजू देवराव बगाटे यांच्यावर बलात्कार व पोक्सो असे गंभीर गुन्हे दाखल होते. हे दोघेही मागील तीन वर्षांपासून फरार होते. भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, नरेश वाडेवाले यांचे पथक गस्त घालत असताना हे दोघे आरोपी दाभड या गावात असल्याची गोपनिय माहिती त्यांना मिळाली. या माहितीवरुन पोलिसांनी दाभड येथे जावून आकाश सूर्यवंशी यास ताब्यात घेतले. त्यास राजेश बगाटे याच्याविषयी विचारले असता त्याने राजेश बगाटे हा कल्याणनगर येथे असल्याची माहिती सांगितली. या माहितीवरुन पोलिसांनी राजेश बगाटे याला देखील अटक केली आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख हे करीत आहेत. हि कारवाई पोलीस निरीक्षक संतोष तांबे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, नरेश वाडेवाले, पोहेकॉ. विशाल माळवे, गजानन किडे, विष्णूकांत मुंढे, राहुल लाठकर, नागनाथ चापके, देवीसिंग सिंघल, राजू घुले, अदनान पठाण, अंकुश कांबळे यांच्या पथकाने केली.

# नगरपंचायतीवर भगवा फडकवा : गुलाबराव पाटील



**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ३० नोव्हेंबर-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू करून राज्यातील लाखो महिलांना आर्थिक बळ देणारे मुख्यमंत्री एकनाथभाई शिंदे यांनी महिलांच्या विकासाचे नवे पर्वच सुरू केले. या योजनेमुळे लाडक्या बहिणींनी महायुतीला उदंड पाठिंबा दिला. ही योजना पुढेही कायम राहणार आहे. मात्र हिमायतनगरचा नगराध्यक्ष 'आपल्या विचारांचा' असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी केले.

दिनांक २८ रोज शुक्रवारी येथील श्री परमेश्वर मंदिर मैदानात झालेल्या जाहीर सभेत प्रचंड उत्साहात बोलताना ना. पाटील म्हणाले कि, ३० वर्षे शिवसेनेची पताका खांद्यावर घेऊन काम करणाऱ्या राम ठाकरे यांना शिवसेनेने नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली आहे. खऱ्या अर्थाने हिमायतनगरला रामराज्य आणायचे असेल तर 'धनुष्यबाण' या निशाणीवरील बटन दाबून नगरपंचायतीवर भगवा फडकवा! असे आवाहन त्यांनी जनतेला केले.

सभेत विरोधकांना लक्ष्य करताना ना. पाटील यांनी खा. अशोकराव चव्हाण यांच्यावर तीव्र टीका केली.

ते म्हणाले कि, तुमच्या पिढ्यान् पिढ्या राजकारणात असताना या भागाची इतकी दुर्दशा का? जनतेत संभ्रम निर्माण करण्याचे राजकारण आता चालणार नाही.

यावेळी बोलताना आमदार बाबुराव कदम कोहळीकर म्हणाले कि, राज्यात एकनाथभाई यांच्या नेतृत्वात मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. हा वेग कायम ठेवायचा असेल तर हिमायतनगरातील सर्व शिवसेना उमेदवारांना विजयी करा. कार्यक्रमास शिवसेनेचे उपनेते आमदार हेमंत भाऊ पाटील, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, विकास पाटील देवसरकर, विजय वळसे पाटील, तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला-पुरुष मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. भीमराव केराम यांचे संबोधन : १८० कोटींच्या विकासकामांची वचनपूर्ती, वचननामा जाहीर

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. ३० नोव्हेंबर-**

शहराचा सर्वांगीण विकास ही आमची बांधिलकी असून १८० कोटी रुपयांच्या विकासकामांची वचनपूर्ती आम्ही यशस्वीरीत्या केली आहे. आगामी काळातही वचननाम्यातील प्रत्येक मुद्दा पूर्णत्वास नेऊ, असे स्पष्ट विधान आमदार भीमराव केराम यांनी विशेष सभेमध्ये केले. या सभेत महायुतीचे पदाधिकारी, माजी नगराध्यक्ष, ज्येष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेला तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष बाळू पाटील, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी नगराध्यक्ष साजिद खान, रमण जयभये, माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, बाळकृष्ण कदम, विश्वस्व कोल्हारीकर, बाबुराव केंद्रे, वैजनाथ करपुडे, नारायणराव सीडम आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.





**महायुतीचे २१ नगरसेवक म्हणजे विकासाचे शिलेदार**

आमदार केराम म्हणाले की, शहरातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. महायुतीद्वारे निवडून येणारे २१ नगरसेवक हेच माझ्या वचनपूर्तीचे शिलेदार ठरणार आहेत.

ते पुढे म्हणाले, विरोधकांनी उभा केलेला उमेदवार हा केविलवाणा प्रयत्न असून ही निवडणूक एकतर्फी आहे. शहरातील कॉस्मोपॉलिटन वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न काही जण करत आहेत; मात्र जनता विकासाच्या बाजूने उभी आहे.

**पहिल्या कार्यकाळातील कामांचा ठसा**

आपल्या पहिल्या कार्यकाळाचा उल्लेख करताना त्यांनी स्व. प्रकाश नगराळे यांचे विशेष स्मरण केले. सभागृहात एकमेव नगरसेवक असतानाही आम्ही कोणताही दूजाभाव न ठेवता गाळे विकसित केले, नागझरी तलावातून पिण्याचे पाणी आणले आणि शहराचा विकास साधला, असे त्यांनी नमूद केले.

**माझं शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रगतिशील असलं पाहिजे**

आमदार केराम म्हणाले, किनवट शहर स्वच्छ, सुंदर आणि आधुनिक सुविधांनी समृद्ध राहिले पाहिजे. यासाठी प्रामाणिकपणे काम करत आहोत. लोकसहभागातून विकासाला गती मिळाली तर आगामी पाच वर्षांत किनवट शहर आदर्श नगरपरिषद ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सभेच्या शेवटी त्यांनी पुन्हा एकदा नागरिकांना आवाहन केले की, भाजपाचे सर्व २१ उमेदवार दणदणीत बहुमताने निवडून द्या. आमचे वचननामेतील सर्व मुद्दे १००% प्रत्यक्षात आणू.

# हजारों युवकांच्या गराड्यात युवा नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २९ नोव्हेंबर-**

शहरातील व तालुक्यातील युवक कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव काल दिनांक २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता बाबा सरकार सोनापीर दर्गा परिसरात अनेक गणमान्य स्नेहांकितांच्या उपस्थिती मध्ये हजारो युवकांच्या गराडयात माहूर चे युवा नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

माहूर शहरातील विकासाचे व्हिजन असलेले मितभाषी व सर्वसमावेश राजकीय व्यक्तीत्व म्हणून ओळख निर्माण केलेले कार्यसम्राट नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित अभिष्टचिंतन कार्यक्रमात केक कापण्यापूर्वी दिवंगत आमदार प्रदीप नाईक यांच्या आठवणीना स्मरण करून वराडी कवी मिर्झा रफी अहमद बेग यांना शब्दसुमनाने श्रद्धांजली अर्पित केल्या नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या बेबी ताई नाईक,युवा नेते कपिल नाईक, जिपचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव,

किनवट चे तालुकाध्यक्ष प्रकाश राठोड,माहूर चे तालुकाध्यक्ष मेघराज जाधव,सभापती दत्तराव मोहिते,माजी सभापती उस्मान खान चांद खा



यांनी नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी यांचा शाल पुष्पगुच्छ व भेट वस्तू देऊन वाढदिवसानिमित शुभेच्छा दिल्या व त्या नंतर केक कापण्यात आले.या वेळी बेबी ताई नाईक,शिवसेना उबठा गटाचे जिल्हा प्रमुख ज्योतिबादादा खराटे ,युवा नेते कपिल नाईक, जिप चे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव यांचा दोसानी परिवाराच्या वतीने संयुक्त सत्कार करण्यात आला.त्या नंतर सुप्रसिद्ध कव्वाल अपसर साबरी यांच्या बहारदार सुफी संगीताचा कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. दुसऱ्या बाजूने हितचिंतक व चाहत्यांनी फिरोज दोसानी यांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती. अमरावतीचे माजी उपमहापौर जाफर भाई, यवतमाळ येथील राष्ट्रवादीचे नेते भाई अमन,युवा नेते अर्चित नाईक, ऍड राहुल नाईक,उपनगराध्यक्ष नाना लाड,माजी जीप सदस्य बंडू नाईक,विनोद राठोड, युवासेनेचे जिल्हाध्यक्ष यश खराटे, नगरपंचायत चे मुख्याधिकारी विवेक कांदे, सिने अभिनेता संजय नेम्मानीवर, अनिल कराळे, भाजपा नेते धरमसिंग राठोड राहुल नाईक किनवटकर , अनिल रुणवाल, मारुती रेकुलवार, नितीन कन्नलवार, बंडू पाटील भुसारे, कुंदन पाटील,माजी जिप सदस्य साहेबराव कदम पाटील हिवरेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके, तलाठी चंद्रकांत बाबर, कार्यालयीन अधीक्षक वैजनाथ स्वामी, अभियंता राहूल नाईक, संदीप गजलवाड, विशाल ढोरे, देविदास सिडाम,भारतीय स्टेट बँकेचे शाखा अधिकारी कमलेश कुमार,शिवम चव्हाण, विनोद पाटील सूर्यवंशी शिरूबाई चिखलीकर, रोहिदास जाधव, पंडित राठोड,आशिष नाईक, उकंडराव जाधव, संदीप सिद्धेवार, गोंडवडसा येथील माजी सरपंच अमजदभाई यांच्यासह हजारो चाहते, हितचिंतक,समाजबांधव, व व्यापारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन सैफ दोसानी मित्र मंडळाकडून अमित येवतीकर, इरफान सय्यद,अमजद खान आझाद खान, राजू चव्हाण, अब्दुल रहमान शेख आली, व मित्रमंडळी यांनी केले होते संचलन मनोज कीर्तने यांनी तर आभार सरफराज दोसानी यांनी मानले.

# महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव ४ डिसेंबर पासुन सुरू

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३० नोव्हेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. या भव्य क्रीडा महोत्सवासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या स्थापन करून तयारी जोरात सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर आज दि. २८ नोव्हेंबर रोजी मा. राज्यपाल नियुक्त मा. राजभवन स्पर्धा परीक्षा निरीक्षण समितीने विद्यापीठाच्या क्रीडा सुविधांचे निरीक्षण केले. समितीने विविध विभागांकडून अद्यावत माहिती घेत संपूर्ण तयारीचे परीक्षण केले. या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून दापोली येथील डॉ. अरुण माने, तर सदस्य म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सचिन देशमुख आणि मुंबई येथील आदित्य कुलकर्णी उपस्थित होते.

विद्यापीठातील क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी समितीसमोर क्रीडा महोत्सवाच्या तयारीचा विस्तृत आढावा सादर केला.

या क्रीडा महोत्सवात कब्बडी, खो-खो, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ आणि थलेटिक्स यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांचा समावेश असून, राज्यभरातील विद्यापीठांमधून अंदाजे ५००० खेळाडू सहभागी होणार आहेत. अशा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत कुलगुरू डॉ. चासकर आणि क्रीडा संचालक डॉ. माने यांनी व्यक्त केले आहे.

क्रीडांगणे अद्ययावत करण्यासाठी कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर यांच्यासह डॉ. मनोज पैजने, हिरामण वाघमारे, राजासाहेब बोराळे, अरुण इंगोले, केशव कल्याणकर, प्रदीप बिडला तसेच विविध समित्यांचे अध्यक्ष, सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी परिश्रमपूर्वक कार्यरत आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० नोव्हेंबर-**

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा नुकताच घेण्यात आला. या बैठकीत सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक तसेच 'मैत्री' आणि 'नॅशनल डेअरी स्कीम' अंतर्गत कार्यरत सेवादाते उपस्थित होते.



बैठकीत नांदेड जिल्ह्यातील पशुप्रजनन कार्य, दुग्ध उत्पादन वाढीसाठी विदर्भमराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाबी तसेच किसान क्रेडिट कार्ड, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन कायदा इत्यादी योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

प्रजननक्षम गाय व म्हैसवर्गीय जनावरांच्या वंध्यत्व निवारण शिबिरांचे आयोजन करून कृत्रिम रेतनाची टक्केवारी वाढविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी दिल्या. जास्त दूध उत्पादन देणाऱ्या जनावरांची निर्मिती करण्यासाठी लिंगवर्गीकृत रेत मात्राचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला. दुग्ध उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रकल्पाचा कृती आराखडा तयार करून काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच पशुधनातील लसीकरणाची स्थितीचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीवर आधारित अर्थव्यवस्था दोलायमान झाल्यामुळे पशुसंवर्धन व्यवसाय हाच शाश्वत आर्थिक लाभ देऊ शकतो, असे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. पुढील काळात स्वतः आणि अधिनस्त सर्व यंत्रणा पशुसंवर्धन क्षेत्राला प्राधान्य देऊन शेतकरी व पशुपालकांना आवश्यक सहकार्य करतील, असे त्यांनी सांगितले. दरमहा पशुसंवर्धन विभागाचा नियमित आढावा घेण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

नांदेड जिल्ह्यातील कृत्रिम रेतनाचे कार्य दुप्पट करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या नियंत्रित प्रजनन कार्यक्रमाची प्रगती पाहून एक गाव एक फार्म या संकल्पनेवर आधारित प्रकल्प राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२५२०२६ अंतर्गत चारा उत्पादन योजनेतून मका, ज्वारी व बाजरी बियाण्यांचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

बैठकीस जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. राजकुमार पाडिले, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रविणकुमार घुले, डॉ. विजय काटकाडे, डॉ. अरविंद गायकवाड, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी श्री. सोनकांबळे, जिल्हा उद्योग केंद्राचे श्री. प्रविण चव्हाण, जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी श्री. अनिल चव्हाण, नॅशनल डेअरी स्कीमचे प्रकल्प समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर सोनटक्के, विदर्भमराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. सतीश खिल्लारे तसेच सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्ह्यात ओसरलेला थंडीचा कडाका पुन्हा परतला !

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** मागच्या काही दिवसापूर्वी लातूर जिल्ह्यातून ओसरलेला थंडीचा कडाका आता पुन्हा परतला आहे. अचानक वाढलेल्या या थंडीने नागरिक चांगलेच गारठून जाताना दिसत आहेत. मध्यंतरी चक्रीवादळाच्या परिणामामुळे जिल्ह्यात सुरु झालेली थंडी अचानक ओसरली होती.अपेक्षेप्रमाणे वातावरणात झालेला हा बदल काही दिवसांचाच ठरला. मागच्या काही दिवसात जिल्ह्याच्या अनेक भागात थंडी कमी झाली होती. मात्र यावर्षी पावसाळ्यात चांगला पाऊस झाल्याने जिल्हाभरात हा हिवाळा चांगलाच जाणवणार असल्याचे संकेत मिळाले होते. त्यानुसार नागरिकांनी अगोदरपासून थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर्स, गरम कपड्यांची खरेदी करून ठेवली असल्याचे पाहावयास मिळाले. काही दिवसांच्या चढ – उतारानंतर आता किमान डिसेंबर जानेवारी असे दोन महिने तरी कडाक्याची थंडी पडणार असल्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. जिल्ह्याच्या अनेक भागात यावर्षी अगदी हुडहुडी भरणारीथंडी जाणवणार असल्याचेही हवामान तज्ञांचे मत आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्याला यावर्षी प्रदीर्घ कालखंडानंतर हुडहुडी भरवणाऱ्या थंडीचा सामना करावा लागणार आहे.



# लातूर पोलीस दलाचा व्यापक रुटमार्च

## ४५ पोलीस अधिकाऱ्यांसह ५०० हून अधिक पोलीस कर्मचारी–होमगार्ड सक्रिय

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर जिल्ह्यातील चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत होणाऱ्या नगर परिषद व नगर पंचायत निवडणूक मतदानाच्या पार्श्र्वभूमीवर रविवारी रुट मार्च काढण्यात आला. या निवडणूक प्रक्रियेसाठी ४५ पोलीस अधिकारी, राज्य राखीव दलाच्या सहा तुकड्या होमगार्डसह एकूण ५०० पोलीस कर्मचारी–होमगार्डच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने हा रुटमार्च केला.

जिल्हाभरात मतदान प्रक्रिया शांततेत, सुरक्षिततेत आणि निष्पक्ष वातावरणात पार पडावी, तसेच कोणतीही अनुचित प्रकार अथवा कायदा व व्यवस्था धोक्यात आणणारी परिस्थिती उद्भवू नये म्हणून जिल्हाभरात रूट मार्च, बंदोबस्त, निगराणी व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. लातूर जिल्ह्यात उदगीर, अहमदपूर, औसा आणि निलंगा पोलीस ठाण्यांमध्ये एकाचवेळी प्रभावी रूट मार्च काढण्यात आला. गुन्हेगार, समाजकंटक, गोंधळ निर्माण करणारे घटक व बेकायदेशीर कृत्यांवर अंकुश आणून नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा भाव निर्माण करून कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणू शकणाऱ्या शक्यतांना आधीच नियंत्रणात आणणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

सदरच्या रूट मार्चमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी, पोलीस कर्मचारी,होमगार्ड,दंगा नियंत्रण पथक, शीघ्र कृती दलाचे जवान, राज्य राखीव दलाचे जवान यांनी सहभागी होऊन विविध संवेदनशील भागातून हा मार्च काढला. सदर निवडणूक प्रक्रिया लातूर जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रे (बूथ) चे वर्गीकरण करून वर्गवारीनुसार अतिरिक्त बंदोबस्त व विशेष गस्त ठेवण्यात आली आहे.निवडणूक बंदोबस्त करिता २५ पोलीस निरीक्षक सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाचे २७ पोलीस अधिकारी, पाच पोलीस उपाधीक्षक, ५५० पोलिस अंमलदार, ४२५ होमगार्ड, राज्य राखीव दलाच्या सहा तुकड्यांचा समावेश आहे.

महिला पोलिसांचा स्वतंत्र ताफा महिलांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आला आहे. ०५ उपविभागीय पोलीस अधिकारी स्वतः फील्डवर उतरून सतत पेट्रोलिंगवर असणार असून विशेष गस्त पथके निवडणूक काळात दिवसरात्र कार्यरत राहणार आहेत. ज्या ठिकाणी पूर्वी तणावजन्य घटना घडल्या आहेत किंवा मतदारसंघात स्पर्धा अधिक तीव्र आहे, त्या भागात अतिरिक्त पोलीस तैनात केले आहेत.







**समाज माध्यमावर करडी नजर**

निवडणूक काळात खोटी माहिती, धार्मिक किंवा जातीय भावना भडकवणारे संदेश, एडिटेड व्हिडिओ/पोस्ट, बॅनर किंवा फेक न्यूज पसरल्यास त्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, संशयास्पद पोस्ट/मेसेज त्वरित पोलिसांना कळवा. आचारसंहितेचा भंग करणारी सामग्री शेअर करू नये.

तणाव वाढविणारे फेक मेसेज, व्हिडिओ, कटिंग्स याबाबत सतर्क राहावे. कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारात गुंतल्यास कठोर कायदेशीर कारवाई होणार आहे. सायबर शाखा, विशेष देखरेख पथक आणि नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत आहेत.

जामिनावर असलेले गुन्हेगार, गुनाहगार प्रवृत्तीचे व्यक्ती, बदमाशांवर विशेष नजर असून हद्दपारी प्रस्ताव, प्रतिबंधक कलमे, तडीपारी, शस्त्र जप्ती आदी उपाययोजना दारूबंदी व मटका, सट्टा यावर विशेष छापे, मतदान केंद्र परिसरात परिघ नियंत्रण, वाहन तपासणी नाके–महत्त्वाच्या मुख्य रस्त्यांवर कडक तपासणी करण्यात येत असून मोजणी केंद्रांवर स्वतंत्र पोलिस बंदोबस्त तयार करण्यात आलेला आहे. एकंदरीत लातूर जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका निर्विघ्न, निष्पक्ष आणि सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण लातूर पोलीस दल पूर्ण क्षमतेने तैनात असून मतदान व मतमोजणी या दोन्ही प्रक्रिया सुरक्षिततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगण्यात आले.

## एमईएच्या वतीने व्यावसायिक, उद्योजकांचा आज मेळावा

### विविध मान्यवरांची उपस्थिती : व्यवसाय वाढीसंदर्भात होणार मार्गदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांच्या हितासाठी काम करणाजया मराठा इंटरप्रिनियर्स असोसिएशनच्या वतीने लातूर जिल्ह्यातील व्यावसायिक व उद्योजकांचा मेळावा आज दि. १ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात व्यवसाय व उद्योग विस्ताराच्या संधीवर मार्गदर्शन होणार असून या मेळाव्यासाठी विविध मान्यवरांची उपस्थितीत राहणार आहे. या मेळाव्यास जिल्ह्यातील मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन एमईएच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतात व्यवसाय व उद्योगाच्या विविध संधी समोर येत आहेत. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दृष्टीने भारताची वाटचालसुरु असून यामध्ये व्यावसायिक व उद्योजकांचा मोठा हातभार आहे. त्यामुळेच मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांच्या हितासाठी महाराष्ट्रात मराठा इंटरप्रिनियर्स असोसिएशन दहा वर्ष पासून कार्यरत आहे. या असोसिएशनच्या माध्यमातून राज्यभरातील मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांना मार्गदर्शन करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून लातूर येथे आज दि. १ डिसेंबर रोजी लातूर जिल्ह्यातील मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यासाठी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी मंत्री आ. अमित देशमुख, आ. विक्रम काळे, आ. अभिमन्यू पवार, माजी आ. धिरज देशमुख यांच्यासह नॅचरल शुगरचे चेअरमन बी.व्ही. ठोंबरे व प्रसिध्द वास्तू विशारद गोपाळ शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे. हा मेळावा औसा रोडवरील छत्रपती चौक, वाडा हॉटेल येथे दुपारी २ ते ५ या वेळेत पार पडणार आहे.

या मेळाव्यात व्यावसायिक व उद्योजकांना विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन होणार असून आपला व्यवसाय व उद्योग वाढविण्यासाठी वेगवेगळ्या संधीबाबत विस्तृत चर्चा होणार आहे. या मेळाव्यास जिल्ह्यातील व्यावसायिक व उद्योजकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन एमईएचे अध्यक्ष विक्रम गायकवाड, संजय शिंदे, विक्रम नरसाळे, सिद्राम साठे यांनी केले आहे.

## जि.प. अतिरिक्त शिक्षकांच्या संयोजनाची प्रक्रिया सुरू

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त शिक्षकांच्या संयोजनाची प्रक्रिया सुरु झाली असून दि. २ व दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी तालुका आणि जिल्हा स्तरावर समायोजन केले जाणार आहे. यामधून अपंग शिक्षकांना सूट देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांपैकी २०२४ –२५ च्या संचमान्यतेमुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन कारण्यासंबहद्दीची प्रक्रिया दि. २९ नोव्हेंबरपासून सुरु झाली आहे.

मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी तालुकास्तरावर तर दि. ४ डिसेंबर रोजी जिल्हा स्तरावर ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रतिवर्षी सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येअभावी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबात शासनाने निर्देश आहेत. त्या अनुषंगाने २०२४ –२५ च्या संचमान्यतेप्रमाणे विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्र्चित झाली असल्याने आपआपल्या तालुक्यातील अतिरकीत ठरत असलेल्या शिक्षकांचे समायोजन केले जात आहे.

तालुक्यातील अतिरिक्त शिक्षकांची यादी प्रसिद्ध झाली असून सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांकडून आक्षेप मागविले जाणार आहेत. अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे तालुकास्तरावर दि. २ डिसेंबरला समायोजन केले जाणार आहे. तालुकास्तरावर समायोजन प्रक्रिया पार पडल्यानंतर तालुक्यात पद शिल्लक नसल्याने अतिरिक्त शिक्षकांची यादी मंगळवारीच प्राथमिक शिक्षण विभागाकडे सादर करण्यात येणार आहे. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे आता आपल्याला कोणत्या जागेवर कार्यान्वित होण्याचे आदेश दिले जातात याकडे लक्ष लागून राहिल्याचे निदर्शनास येत आहे.

## जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी शिक्षक संघाचे धरणे आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी व टीईटी अनिवार्यतेसंबंधी झालेले नवीन संशोधन रद्द करून शिक्षण अधिकार कायदा लागू होण्यापूर्वीच्या शिक्षकांना सेवेत संरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी शिक्षकांनी नुकतेच नवी दिल्लीतील जंतरमंतर याठिकाणी धरणे आंदोलन केले.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १ सप्टेंबर रोजी शिक्षकांच्या पात्रतेविषयी दिलेल्या निकालात २ वर्षात ज्या शिक्षकांची सेवा पाच वर्षापेक्षा अधिक शिल्लक आहे, त्यांच्यासाठी टीईटी अनिवार्य केली आहे. यावर शिक्षक संघाच्यावतीने केंद्राने यात हस्तक्षेप करून शिक्षकांच्या सेवेचे संरक्षण केले जावे, सेवाशर्तींच्या आधारे झालेल्या निवडी कायम ठेवण्यात याव्यात अशी मागणी लावून धरली आहे. अन्य कोणत्याही कर्मचाऱ्यांना नियुक्तीनंतर पात्रता परीक्षा लागू नाही. मग ती केवळ शिक्षणाचं का? असा सवालही शिक्षक संघाने उपस्थित केला आहे. यावेळी शिक्षक संघाचे प्रदेश उपाध्यक्ष परमेश्वर बालकुंदे, विभागीय अध्यक्ष सुनील हाके, सुनील बिराजदार, गोविंद कांदे, अनिल हुलगे, बंकट जाधव, रंगनाथ सगर, बालाजी बिडवे, भाग्यश्री चव्हाण, विजयकुमार चव्हाण, नागेश लोहार, विलास मेहत्रे, संगमेश्वर शिवणे, पांडुरंग येलमटे माधव अंकुशने, रवी भोसले यांसह अनेकांची उपस्थित होती.

## विजेच्या लपंडावाने बाभळगाव परिसरातील नागरिक वैतागले

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या बाभळगाव परिसरातील नागरिक मागच्या काही दिवसात सततच्या विजेच्या लपंडावाने अक्षरशः वैतागून गेले आहेत. महावितरणच्या कार्यालयात याची तक्रार करायला गेल्यावरही तेथे कोणीही भेटत नसल्याची तक्रार नागरिकांनी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्याकडे केली आहे.

बाभळगाव येथील ३३ केव्ही उपकेंद्रांतर्गत बाभळगाव, सारोळा, सोनावती, धनेगाव, शिवणी, सेलू, सिरसी, कटापुर व शिकणादर आदी गावांना वीज पुरवठा केला जातो. मात्र मागच्या काही दिवसांपासून या गावचे नागरिक सततच्या वीज जाण्याने अक्षरशः त्रस्त झाले आहेत. कधी वीज जाईल किंवा गेलेली वीज कधी परत येईल याची शाश्वती नसल्याने नागरिकांची ससेहोलपट होत आहे. तासनतास वीज गुल असल्याने प्रत्येक व्यावसायिकही महावितरणच्या कार्यपद्धतीला कमालीचा वैतागला असल्याचे दिसून येत आहे.

ग्रामीण भागात सतत विजेच्या लपंडावाने शेतकऱ्यांनाही पिकांना पाणी देण्यासाठी देवाप्रमाणे लाईटची वाट बघत बसावे लागत आहे. लाईटची वाट पाहण्यात वेळ जाण्याने शेतकऱ्यांना त्यांच्या अन्य कामांकडे लक्ष देणे कठीण होत आहे. सततच्या वीज जाण्याने त्रस्त झालेल्या नागरिकांनी महावितरणच्या कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्याबाबतची समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु अगदी दुपारच्या वेळीही महावितरणच्या कार्यालयात एकही जबाबदार



अधिकारी अथवा कर्मचारी भेटत नसल्याच्या तक्रारी आहेत. महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या या मनमानी कारभाराची तक्रार नागरिकांनी आ. अमित देशमुख यांच्याकडेही एका निवेदनाव्दारे केली आहे.

## लातूर जिल्हा इंजिनियर असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर जिल्हा इंजिनियर असोसिएशन (एसीईए) ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून नव्या पदाधिकाऱ्यांनी शहराच्या विकासात अभियंत्यांची भूमिका अधिक प्रभावीपणे बजावण्याचे आश्वासन दिले आहे. अभियंता म्हणून समाजाशी, नागरिकांशी आणि स्थानिक प्रशासनाशी सुसंवाद ठेवत दर्जेदार व पारदर्शक कामे करण्याची बांधिलकी नव्या कार्यकारिणीने व्यक्त केली.

असोसिएशनच्या बैठकीत सर्वानुमते कार्यकारिणीची रचना करण्यात आली. नव्या कार्यकारिणीत अध्यक्ष मनोज देशमुख, उपाध्यक्ष संतोष नाशिककर, सचिव वसीम शेख, सहसचिव अरुण पंचगल्ले, कोषाध्यक्ष अमोल सेलूकर, सहकोषाध्यक्ष ऋषिकेश निगडीकर यांच्यासह रिझवान गडीवाले, संदीप उच्चेकर, सिद्धलिंग सोरडे, विठ्ठल भोसले, दिनेश सरवडीकर यांची कार्यकारिणी विशेष सदस्य म्हणून निवड करण्यात आली. नवीन टीममध्ये अनुभवी तसेच तरुण अभियंत्यांचा समतोल साधण्यात आला असून अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध शाखांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले आहे.



निवडीनंतर बोलताना नूतन पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, लातूर शहराच्या विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी अभियंत्यांची जबाबदारी महत्त्वाची आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, बांधकाम गुणवत्ता, सार्वजनिक प्रकल्प, तांत्रिक सल्ला, आपत्ती व्यवस्थापन, सुरक्षा नियमांचे पालन अशा अनेक क्षेत्रांमध्ये अभियंते थेट भूमिका बजावतात. त्यामुळे नागरिकांसाठी सर्वोत्तम अभियांत्रिकी सेवा उपलब्ध व्हाव्यात, ही आमची प्राथमिकता असेल.

### नागरिकांसाठी उत्तरदायी अभियांत्रिकी सेवांचे आश्वासन

यावेळी पदाधिकाऱ्यांनी शहरातील वाढत्या नागरी मागण्यांचा अभ्यास, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि टिकाऊ प्रकल्पांना प्राधान्य, नागरिकांसाठी अभियांत्रिकी मार्गदर्शन केंद्र उभारण्याचा विचार, तरुण अभियंत्यांसाठी कौशल्यवर्धन कार्यशाळा, मानक दर्जानुसार कामांची पडताळणी आणि जनजागृती, पर्यावरणपूरक बांधकामांसाठी प्रोत्साहन याबाबत काम करण्यासंदर्भात बैठकीत चर्चा केली.

अभियंता असोसिएशन ही केवळ तांत्रिक संस्था नसून सामाजिक जबाबदारी पार पाडणारा घटक होत आहे, असेही पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. लातूरमध्ये दर्जेदार व सुरक्षित पायाभूत सुविधा उभारण्याच्या उद्दिष्टाने नवी कार्यकारिणी सज्ज झाली असून आगामी काळात नागरिक–अभियंता संवाद वाढवण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एसीईएची नवी टीम कार्यरत होताच शहराच्या तांत्रिक विकासाला नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## लातुरात पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर येथील व्हीएस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने टिपू सुलतान जयंती सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हीएस पँथर्सचे जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख हे होते. या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून संघटनेचे संपर्क प्रमुख आनंद जाधव, देवा गायकवाड, विलास कसबे, स्वप्नील कांबळे, गौस शेख, युनूस शेख आदी मान्यवरांची उपस्थिती होती. व्हीएस पँथर्सचे संस्थापक अध्यक्ष युवा नेते विनोद खटके, प्रदेशाध्यक्ष सचिन मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात टिपू सुलतान जयंती सप्ताह साजरा करण्यात आला. त्यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. चित्रकला स्पर्धेत सदाफ युनूस सय्यद याने २१०० रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकावले. द्वितीय पारितोषिकविराजविशाल गव्हाणे यानेतर तृतीय पारितोषिक शाफाही फर्जंद शेख याने पटकावले. वक्तृत्व स्पर्धेत साकिफ शफिक शेख याने प्रथम, ज्ञानेश्वरी भगवान जामगे हिने पटकावले. आर्वी देविदास राठोड, लक्ष्मी राजू कांबळे, महेश भैया, मोहम्मद शेख, अक्रम कुरेशी, फातिमा शेख, सदाफ सय्यद, सृष्टी जगताप यांनाही उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.